सहकार भारतीचे मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

ISBN 978-81-940842-0-4

# सहकार सुगंध

PRGI NO. MAHMUL/2005/16099

• पुणे • वर्ष : २१ • अंक ११ • फेब्रुवारी २०२६ • पृष्ठे ४४ • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी

## केंद्रीय अर्थसंकल्पात सहकाराला पाठबळ












## सहकार तत्त्वावरील देशातील पहिल्या ‘भारत टॅक्सी’ सेवेचा शुभारंभ

## सहकारी संस्थांच्या प्रभावी कामकाजासाठी प्रशिक्षण गरजेचे - सहकार आयुक्त दीपक तावरे







दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर
31 वर्षे विश्वासाचे
आपला परिवार, आपली संस्था !
जनमानसाचा
विश्वास...
धरमपेठ महिला!
गेली ३१ वर्षे विश्वासार्ह अर्थसेवेने जनसामान्यांचे जीवनमान उंचाविण्यात धरमपेठ महिला नेहमीच अग्रेसर राहिली आहे. समृद्ध अशा ३१ वर्षांच्या प्रवासाचा आरंभ झाला आणि आज देशभरातील २१ शाखा, ५०००+ कोटींहून अधिक व्यवसाय व १.२५ लाखांहून अधिक समाधानी ग्राहकवर्ग हा अर्थसमृद्ध वटवृक्ष निर्माण झाला.
प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतानाच जनसामान्यांच्या मनात उज्वल भविष्याची आशा व विश्वासार्हता निर्माण करणं हेच धरमपेठ महिलाचं प्रमुख उद्दिष्ट्य आहे.
आनंदी क्षणांचा सोबती...
सीताराम भवन
ऑडिटोरियम
आणि गेस्ट हाऊस
। वाढदिवस । मुंज । साक्षगंध । सांस्कृतिक कार्यक्रम । कॉन्फरन्स
सोने कर्ज
Gold Loan
सोन्यासारख्या लेकींसाठी...
हक्काचा आधार !
कमीतकमी
कागदपत्रे
त्वरित कर्जमंजुरी
गोल्ड लोन
0.90%
तुमच्या सेवेत सदैव तत्पर !
LOCKERS सुविधा
SMS अलर्ट
DEPOSIT सुविधा
NEFT, RTGS सुविधा
MOBILE BANKING
LOAN सेवा सुविधा
GOLD LOAN उपलब्ध
CORE BANKING
LIC /GIC पॉलिसी काढण्याची प्रीमियम भरण्याची व नुतनीकरणाची सुविधा
MSEDCL वीजबिल भरणा केंद्र
IRCTS आरक्षण सुविधा
५००० कोटींच्या व्यवसायाकडे यशस्वी वाटचाल...
मुख्य कार्यालय : प्लॉट नं ४२-अ, सीताराम भवन, हनुमान मंदीर समोर, रामनगर चौक, शिवाजीनगर, नागपूर-४४००१०.
(0712)-2524336 / 2520303
info@dpmahila.com
Follow us on :
महाराष्ट्र । छत्तिसगढ । मध्यप्रदेश
www.dpmahila.com



राजर्षी शाहू मल्टीस्टेट
र.नं. ८१९
19 फेब्रुवारी
छत्रपती शिवाजी महाराज
जयंती तसेच महाशिवरात्री
निमित्त सर्वांना
मंगलमय
शुभेच्छा..!
रा.ल. उपारव्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
तुमच्या सेवेत सदैव तत्पर..!
संदीप शेळके
अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
संस्थेची वैशिष्ट्ये
१. एकूण ६९ शाखेचा विस्तार
२. १००० कोटींचा व्यवसाय
३. १,५०,००० सभासद संख्या
४. 'शाहू पे हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ६० हजार महिलांना २५० कोटी रुपयाचे कर्ज वाटप.
६. ९० कोटी रु. सोने तारण कर्ज वाटप.
LOCKERS सुविधा
NEFT,RTGS सुविधा उपलब्ध
SMS अलर्ट
DOORSTEP बँकिंग
MOBILE बँकिंग
DEPOSITE सुविधा
LOAN सुविधा
CORE बँकिंग
NET बँकिंग
GOLD LOAN उपलब्ध
MSEDCL
MSEDCL वीज बिल भरणा केंद्र
अनेक प्रकारच्या पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था, FCBA पुरस्कार प्राप्त संस्था,
मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
बँको पुरस्कार प्राप्त संस्था
कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा
सौ.मालती शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट
को. ऑफ क्रेडीट सोसा. मर्या. बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com
9359941853


netwin
Ideas to Life
आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सह स्मार्ट बँकिंगचा नवा अनुभव!
शासकीय नियमावलीवर आधारित अत्याधुनिक कोअर बँकिंग सोल्यूशन
NPA व्यवस्थापन आणि सुबक रिपोर्ट्सची सुविधा
सुलभ कर्ज अर्ज – सुरक्षित, सोपी आणि जलद डिजिटल प्रक्रिया!
संस्थेच्या वाढीसाठी NetPay UPI QR कोड सुविधा
Certification
netwin
SCAN & PAY
BHIM UPI
netwin
Ideas to Life
नाविन्य, विश्वास आणि गुणवत्तेचं प्रतीक.
AI-सक्षम प्रणालीद्वारे आधुनिक आणि गतिमान बँकिंग सेवा
तुमचा चेहरा तुमची ओळख – खाते उघडण्यासाठी फक्त एक सेल्फी पुरेशी!
आधार OTP आणि डिजिटल ई-केवायसी द्वारे खाते सुरू करा
बायोमेट्रिक वर आधारित अचूक प्रमाणीकरण
स्मार्ट डॅशबोर्ड्स आणि रिअल टाईम डेटा नियंत्रणाची सुविधा
संपूर्णतः पेपरलेस, जलद आणि सुरक्षित व्यवहार अनुभव
आजच आपल्या संस्थेला बनवा AI-सक्षम!
०२५३ ६६५ १५००
अधिक माहितीसाठी स्कॅन करा
sales@netwinindia.in
www.netwin.in

स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र

# आरंभ

## मुदत ठेव योजना

सुरक्षित बचत, नव्या सुरुवातीसाठी



आर्कषक व्याजदर
**10.25%** प्रतिवर्ष

कालावधी १५ महिने
किमान गुंतवणूक रू.१०,०००/-
ज्येष्ठ नागरिकांना ०.५०% अतिरिक्त व्याजदर

* नियम व अटी लागू, योजना फक्त सभासदांसाठी

स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र

महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : डॉ. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 | lokmanyasociety.org

Bharat Connect

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक

*Bharose ka Bank Bhavishya ka Bank*

# सर्व प्रकारच्या बिलांकरीता टीजेएसबी बँकेची

## सुलभ, विश्वासार्ह आणि सुरक्षित बिल भरणा सुविधा!




- वीज
- गॅस
- पाणी
- टेलिफोन / मोबाईल
- डी.टी.एच / केबल
- शिक्षण शुल्क
- हॉस्पिटल
- विमा
- फास्टॅग रिचार्ज
- कर्जाचे मासिक हफ्ते

इतर संकलन सुविधा उपलब्ध

*नियम व अटी लागू

www.tjsbbank.co.in | ✆ : 022-48897210

|| बिना संस्कार नहीं सहकार । बिना सहकार नहीं उद्धार ||

# सहकार सुगंध


ISBN : 978-81-940842-0-4

फेब्रुवारी २०२६ (वर्ष २१, अंक ११)


## अनुक्रम


* केंद्रीय अर्थसंकल्पात सहकार क्षेत्राच्या विकासासाठी पाठबळ ........ ०९
* बँकिंगसाठी दिशा, सहकारासाठी आत्मपरीक्षणाची वेळ ........ १०
* सहकाराची डिजिटल अर्थव्यवस्थेकडे वाटचाल ........ ११
* केंद्रीय अर्थसंकल्प : अर्थव्यवस्थेची ऐतिहासिक वाटचाल आणि सहकाराचे नवे क्षितिज ... १२
* 'सहकार से समृद्धी'ला विशेष बळ! ........ १४
* देशातील पहिल्या सहकार तत्त्वावरील 'भारत टॅक्सी'चा शुभारंभ ........ १५
* सहकार चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी खुले व्यासपीठ – सहकार भारती! ........ १६
* परिवर्तनाच्या उंबरठ्यावर सहकार चळवळ ........ १७
* सहकार चळवळीमुळे महाराष्ट्र समृद्ध, विकसित झाला – साहेबराव खामकर ........ १८
* प्रशिक्षण व संस्कारातून सहकार रुजवणे हे सहकार भारतीचे काम ........ १९
* सहकार भारती, पिंपरी-चिंचवड व सारस्वत बँकेच्या वतीने वर्धापनदिन साजरा ........ २०
* सहकाराचा संवेदनशील शिल्पकार हरपला ........ २१
* नवीन सहकार धोरणाविषयी चर्चासत्रात विविध विषयांवर चर्चा ........ २२
* सहकार भारती अमरावती जिल्ह्याच्या वतीने नवीन सहकार धोरणावर चर्चासत्र ........ २३
* दत्त नागरी संस्थेची नवीन योजना सुरू – सागाव शाखेचा वर्धापनदिन साजरा ........ २४
* सहकारात बँकेचे मूल्यांकन आकडेवारीत नव्हे तर सामाजिक कार्यात देखील व्हावे........ २५
* कॉसमॉस बँकेने दिली अंध युवकांना रोजगाराची संधी........ २६
* पत्रकार संघाच्या कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल जिल्हाध्यक्ष महाजन सन्मानित ........ २७
* बाळासाहेब पांडे नागरी सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी जयंत पांडे ........ २८
* राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या उपस्थितीत नागरी बँक कार्यशाळा संपन्न ........ २९
* कर्ज वितरणाच्या नविन संधी व पतसंस्थानी बदल स्विकारायला हवेत........ ३०
* आदर्श पतसंस्थेने एक हजार कोटी एकत्रित व्यवसायाचा टप्पा ओलांडला........ ३१
* सहकारी पतसंस्थांच्या कामकाजासाठी प्रशिक्षण गरजेचे – सहकार आयुक्त दीपक तावरे.... ३२
* नव्या नागरी सहकारी बँकांना परवाना – स्वप्न की वास्तव? ........ ३४
* बँक खात्यातील व्यवहाराबाबत जागरूकता आवश्यक ........ ३५



**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**



**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे

**दि. १ जानेवारी २०२५ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ७००/- फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १८००/- फक्त
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

**कृपया चेक / डीडी 'सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.' या नावाने पाठवावा. (पुणे येथे देय असलेला)**



**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com



**'सहकार सुगंध'** हे मासिक **मालक,** सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी **प्रकाशक** भालचंद्र वसंत कुलकर्णी यांनी **मुद्रक** विवेक श्रीधर देशपांडे यांच्या श्रीपाद प्रिंटर्स, शॉप नं.२, कोणार्क उद्योग, स.नं. १७७, एरंडवणा, पुणे ४११ ००४ येथे छापून ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. **संपादक** – भालचंद्र वसंत कुलकर्णी

**'Sahakar Sugandha'** monthly is owned by Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., Published by Bhalchandra Vasant Kulkarni at Office No. 15, Vishnu Priya Apartment, Ganeshmala, Sinhagad Road, Pune 411 030 Printed by Vivek Shridhar Deshpande at Shripad Printers, Shop No. 2, Konark Udyog, S.N. 177, Erandwane, Pune 411 004. **Editor :** Bhalchandra Vasant Kulkarni

# अर्थसंकल्पातून सहकार चळवळीला पाठबळ!

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ मध्ये सहकारी क्षेत्रासाठी मोठा दिलासा मिळाला आहे. यात प्राथमिक सहकारी संस्था, आंतर-सहकारी संस्था तसेच राष्ट्रीय सहकारी महासंघ यांना बळकटी देण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले आहे. या उपाययोजनांमुळे सहकारी संस्थांची आर्थिक शाश्वतता वाढेल, तरलतेत सुधारणा होईल आणि दुहेरी कर आकारणी टाळली जाईल, असे वाटते. लाभांशावरील दुहेरी कर टाळण्यासाठी महत्त्वपूर्ण सुधारणा यावेळी करण्यात आली आहे. नवीन कर प्रणालीअंतर्गत लाभांशाच्या कर आकारणीबाबत असलेली अडचण दूर करण्यासाठी अर्थमंत्र्यांनी महत्त्वपूर्ण सुधारणा प्रस्तावित केली आहे. एका सहकारी संस्थेला दुसऱ्या सहकारी संस्थेकडून मिळणाऱ्या लाभांश उत्पन्नावर वजावट देण्यात येणार आहे. मात्र यात अट अशी आहे की, सदरचा लाभांश पुढे सभासदांना वितरित केला जावा.

यंदाचा २०२६ चा केंद्रीय अर्थसंकल्प हा भारताच्या दीर्घकालीन आर्थिक दिशेचा जाहीरनामा म्हणावा असा आहे. गेल्या काही वर्षांत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था हे लक्ष्य राजकीय घोषणा म्हणून जास्त आणि प्रत्यक्ष वास्तव म्हणून कमी वाटत होते. मात्र २०२६ च्या अर्थसंकल्पातील धोरणात्मक प्राधान्यक्रम पाहता, हे लक्ष्य आता आकांक्षेपेक्षा वास्तवाच्या अधिक जवळ येताना दिसते. ५ ट्रिलियन डॉलरकडे भारताची वाटचाल यातून स्पष्टपणे दिसून येते. डिजिटल आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्था हेच यापुढचे लक्ष असल्याचेही यंदाच्या अर्थसंकल्पात स्पष्टपणे दिसते आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, फिनटेक, स्टार्ट-अप्स आणि स्किल डेव्हलपमेंट यांना अर्थसंकल्पात दिलेले महत्त्व हे भारताच्या भविष्यातील डिजिटल आर्थिक स्वरूपाची दिशा दाखवते.

विकसित भारताचे स्वप्न २०४७ पर्यंत पूर्ण करण्यासाठी प्रत्येक क्षेत्राचे योगदान महत्त्वाचे आहे. सद्य:स्थितीमधील असलेल्या बँकिंग व्यवस्थेचे भविष्यकालीन नियोजन करण्याच्या दृष्टीने तसेच बँकिंग व्यवस्थेचे पुनरावलोकन करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. ही समिती बँकिंग क्षेत्रातील सध्याच्या कायद्याचे पुनरावलोकन करेल आणि काल सुसंगत सुधारणांसाठी शिफारस करेल. ही समिती बँकिंग क्षेत्राची संरचना कार्यक्षेत्र आणि त्यातील आवश्यक बदल यावर भाष्य करेल. नव्याने येणारी समिती बँकिंग क्षेत्राचा सखोल आढावा घेऊन त्यामध्ये योग्य ते बदल सुचवू शकेल. नियामकांची भूमिका हा देखील समितीच्या अभ्यासाचा विषय असेल. बँकिंग क्षेत्राची भविष्यात होणारी वाढ, बँकांच्या खातेदारांचे योग्य संरक्षण आणि त्यांना देण्यात येणारे स्थैर्य या सर्व बाबी समितीच्या कक्षेत येतील. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे एकत्रीकरण हा विषयही समितीच्या कार्यकक्षेचा भाग असेल. यंदाच्या अर्थसंकल्पातून बँकिंगच्या विकासाला योग्य दिशा देण्यासाठी योग्य ते पाऊल उचलण्यात आले आहे.

एकूणच, केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ मधील विविध तरतुदी सहकारी क्षेत्रावरील करभार कमी करतील, असे दिसते. ग्रामीण विकास व समावेशक आर्थिक वाढीसाठी सहकारी संस्थांची भूमिका यंदाच्या अर्थसंकल्पात अधिक ठळकपणे दिसून आली आहे. या घोषणांमधून सहकार चळवळी प्रती केंद्र सरकारची सहकारातून समृद्धीकडे जाणारी दिशा स्पष्टपणे अधोरेखित होतांना दिसते.

**सहकाराचा चेहरा असलेले अजितदादा !**

जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आकस्मिक झालेले अपघाती निधन फारच चटका लावून गेले. अजितदादांकडे अर्थमंत्री म्हणून महत्त्वाची जबाबदारी होती. गेल्या काही वर्षांत त्यांनी सहकार क्षेत्रासाठी विशेष योगदान दिले. सहकाराचा चेहरा म्हणून अजितदादांकडे पाहिले जात होते. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा कायापालट अजितदादांनीच केला. सहकार क्षेत्राच्या विकासासाठी त्यांनी खूप चांगले निर्णय घेतले होते.

सहकार क्षेत्रातील प्रशासकीय व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सहकार विभाग संकुल विस्ताराचा निर्णय घेण्यात आला होता. सहकारी पतसंस्थेतील ठेवीदारांच्या ठेवींना विमा संरक्षण मिळावे यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. सहकार क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान उपलब्ध व्हावे आणि त्याचा वापर वाढावा. बारामती परिसरात एआय 'कृत्रिम बुद्धिमत्ता', तंत्रज्ञान थेट शेतीच्या बांधावर नेण्याचा प्रयोग हा सहकार क्षेत्रासाठी दिशादर्शक ठरला. राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पतपुरवठा करणाऱ्या विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीसाठी रद्द करण्यात आलेले गटसचिवांचे केडर पूर्ववत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यामुळे राज्यातील सुमारे ७ हजार गटसचिवांना केडर दर्जा मिळाला आहे. आर्थिकदृष्ट्या अडचणीत असणाऱ्या नाशिक, धाराशिव, नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या सक्षमीकरणासाठी सुमारे ८०० कोटी रुपये आणि उर्वरित जिल्हा बँकांसाठी सुमारे ६०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. याखेरीज ग्रामीण भागाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सहकार क्षेत्राला अनेकविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्या पार्श्वभूमीवर सहकारी साखर उद्योगाचे पुनरुज्जीवन कर्जमाफी, सहकारी बँकांचे सक्षमीकरण आणि नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार याबाबत दूरगामी परिणाम करणारे निर्णय घेण्यात आले. राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना राज्य सहकारी बँकेच्या मदतीने आर्थिक मदत करण्याला मूर्त स्वरूप देण्यात अजितदादांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. त्यांच्या या कार्याची आठवण सातत्याने होत राहील. सहकार सुगंधच्या वतीने अजितदादांना भावपूर्ण श्रध्दांजली!



**संपादकीय...**

# केंद्रीय अर्थसंकल्पात सहकार क्षेत्राच्या विकासासाठी पाठबळ

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नुकताच केंद्रीय अर्थसंकल्प लोकसभेत सादर केला. यामध्ये सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी आणि विस्तारासाठी काही ठळक तरतुदी करण्यात आल्या आहेत. याबाबतच्या निवडक प्रतिक्रिया...**




**✼ केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ –**



केंद्रीय अर्थसंकल्पात सहकार क्षेत्राला चालना देण्यात आली आहे ही बाब स्वागतार्ह आहे. प्राथमिक सहकारी संस्थांना कर सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे या संस्था आर्थिकदृष्ट्या मजबूत होतील. एका सहकारी संस्थेला दुसऱ्या सहकारी संस्थेतून मिळालेल्या लाभांशावर करसवलत (डिडक्शन) घेता येईल. त्यामुळे दुहेरी कर आकारणी टळेल. सूचीबद्ध राष्ट्रीय सहकारी महासंघांना त्यांनी कंपनीत केलेल्या गुंतवणुकीवर मिळालेल्या लाभांशावर काही अटींवर तीन वर्षांसाठी करमुक्ती दिली जाईल. त्यासह महासंघांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. राष्ट्रीय सहकार विकास महामंडळासाठीच्या निधीमध्ये भरीव वाढ केली जाणार असून त्यामुळे सहकारी संस्थांना अधिक निधी उपलब्ध होईल.

**✼ विवेक जुगादे – सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश महामंत्री –**



केंद्रीय अर्थसंकल्पात सहकारी संस्थांसाठी जाहीर केलेल्या सवलती आणि तरतुदी सहकार क्षेत्राला नवी ऊर्जा देणाऱ्या आहेत. नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनला ५०० कोटींचे अनुदान आणि ६८ हजार संस्थांच्या डिजिटलायझेशनसाठी ३६४ कोटींचा निधी उपलब्ध करून दिल्याने हे क्षेत्र अधिक सुदृढ होईल. विशेषतः सहकार शिक्षणासाठी त्रिभुवन विद्यापीठाला दिलेले ३०० कोटींचे अर्थबळ या क्षेत्राच्या भविष्यातील प्रगतीसाठी गौरवास्पद आहे. आंतर-सहकारी संस्था लाभांशावरील वजावट आणि बँकिंग क्षेत्रावरील भर यामुळे विकसित भारत घडवण्याच्या प्रक्रियेत सहकार क्षेत्राचे योगदान मोलाचे ठरेल.

**✼ शरद जाधव – सहकार भारती, प्रदेश संघटन प्रमुख –**



या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात सहकारी क्षेत्राला विशेष प्राथमिकता दिलेली आहे. ग्रामीण उत्पादनाकरिता बाजार सुविधा, कर सूट तथा डिजिटायझेशन माध्यमातून सहकारी संस्थांना सशक्त बनवण्याच्या हेतूने विशेष प्रोत्साहन दिले गेलेले आहे.

सहकारी संस्थांकरिता विशेष करात सूट आणि डिव्हिडंट देण्याच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था सुदृढ करण्याची घोषणा केलेली आहे. डिजिटल सहकारी मंत्रालयाच्या अंतर्गत राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सहकारी संस्थांचे कॉम्प्युटर आणि डिजिटल करण्याकरिता अनुदान प्रदान करण्याची प्रणाली वाढविण्यात येणार आहे. कृषी उत्पादन

**पुढील पानावर...**

**नागरी सहकारी पतसंस्था** (Non-Banking Urban Credit Societies) **आणि पगारदार संस्था** (Salary Earners' Societies) **यांच्यासाठी अर्थसंकल्प २०२६-२७ आणि सहकार मंत्रालयाच्या नवीन तरतुदी खालीलप्रमाणे आहेत :**

**१. नागरी सहकारी पतसंस्था** (Urban Credit Societies) **यासाठी मुख्य बदल खालीलप्रमाणे आहेत –**

**✼ रोकड व्यवहार मर्यादा** (Cash Withdrawal) **:** नागरी पतसंस्थांना बँकेतून रोख रक्कम काढण्याची मर्यादा ३ कोटींपर्यंत वाढवण्यात आली आहे, ज्यावर टीडीएस (TDS) आकारला जाणार नाही. यामुळे सदस्यांना रोख कर्ज वाटप करणे सोपे होईल

**✼ कलम 80P अंतर्गत वजावट :** नागरी पतसंस्थांना त्यांच्या सभासदांकडून मिळणाऱ्या व्याजाच्या उत्पन्नावर मिळणारी १००% कर वजावट कायम ठेवण्यात आली आहे. यामुळे संस्थांचा निव्वळ नफा सुरक्षित राहण्यास मदत होईल.

**✼ डिजिटायझेशन :** ✼ नागरी पतसंस्थांना आता 'नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेटाबेस'शी जोडले जात आहे. यामुळे संस्थांचे कामकाज अधिक पारदर्शक होऊन त्यांच्या विश्वासार्हतेत वाढ होईल.

**✼ २. पगारदार नोकरांच्या सहकारी संस्था** (Salary Earners' Societies)

**✼ सभासदांना कर सवलतीचा फायदा :** ✼ नवीन आयकर कायद्यानुसार (१ एप्रिल २०२६ पासून) १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न प्रभावीपणे करमुक्त झाल्यामुळे पगारदार सदस्यांकडे अधिक 'डिस्पोजेबल इन्कम' राहील. याचा फायदा असा होईल, की सदस्य संस्थेमध्ये अधिक ठेवी (Deposits) ठेवू शकतील.

**✼ लाभांश** (Dividend) **वितरण :** ✼ एका सहकारी संस्थेने दुसऱ्या सहकारी संस्थेला (उदा. जिल्हा बँक किंवा फेडरेशन) दिलेल्या लाभांशावर दुहेरी कर आकारणी टाळण्यासाठी सवलत जाहीर करण्यात आली आहे. याचा सकारात्मक परिणाम पगारदार संस्थांच्या उत्पन्नावर होईल.

**✼ प्रशासकीय सुधारणा :** ✼ पगारदार संस्थांच्या ऑडिट आणि निवडणूक प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेटाबेसमधील माहितीचा वापर केला जाईल, ज्यामुळे प्रशासकीय विलंब कमी होईल.

**✼ ३. दोन्ही संस्थांसाठी महत्त्वाचे** (Common Impact) ✼

**✼ किमान पर्यायी कर** (MAT) : ✼ सहकारी संस्थांसाठी 'मॅट'चा दर १८.५% वरून कमी करून १५% करण्यात आला आहे, ज्यामुळे या संस्थांवरील कराचा बोजा कमी झाला आहे.

✼ ITR **सुधारण्याची मुदत :** ✼ आयकर विवरणपत्रात काही चूक झाल्यास ते सुधारण्यासाठी (Updated ITR) मुदत आता ३१ मार्चपर्यंत वाढवण्यात आली आहे, ज्यामुळे संस्थांना तांत्रिक चुका दुरुस्त करण्यास अधिक वेळ मिळेल.

# बँकिंगसाठी दिशा, सहकारासाठी आत्मपरीक्षणाची वेळ

अर्थसंकल्प हा आकड्यांचा खेळ असला,तरी त्यामागे सरकारची आर्थिक भूमिका, प्राधान्यक्रम आणि पुढील दिशानिर्देश स्पष्टपणे दिसून येतात. यंदाच्या अर्थसंकल्पात बँकिंग क्षेत्राला चालना देणारे काही निर्णय स्वागतार्ह आहेत. मात्र सहकारी बँकिंगच्या दृष्टीने पाहता हा अर्थसंकल्प थेट आश्वासनांपेक्षा अप्रत्यक्ष संदेश अधिक देतो, असे म्हणावे लागेल.



व्यंकटेश कुळकर्णी
९४०३० ८०७५१

पायाभूत सुविधा, MSME क्षेत्र, डिजिटल व्यवहार आणि सर्व क्षेत्रांत भेदभावविरहित समान संधी – ज्याला आपण Financial Inclusion म्हणतो – यावर दिलेला भर हा बँकिंग व्यवसायासाठी नक्कीच सकारात्मक आहे. कर्जवाढीला प्रोत्साहन देणारे धोरण, उत्पादनाधारित वाढीवर भर आणि औपचारिक अर्थव्यवस्थेकडे झुकणारा कल हे बँकिंग व्यवसाय वाढीसाठी पूरक घटक आहेत. त्यामुळे पुढील कार्यकाळात बँकिंग प्रणालीची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे. या प्रक्रियेत सहकारी बँकांचा सहभाग अपेक्षित आहे. कारण ग्रामीण व निमशहरी अर्थव्यवस्थेचा कणा आजही मोठ्या प्रमाणात सहकारी संस्थांवर अवलंबून आहे.

मात्र येथे एक वास्तव स्वीकारावे लागेल की, अर्थसंकल्पात सहकारी बँकिंगसाठी स्वतंत्र, ठोस उपाययोजना किंवा विशेष सवलतींचा अभाव स्पष्टपणे जाणवतो (Direct benefits to cooperative sector). सरकारची भूमिका स्पष्ट आहे. सहकारी बँका या वित्तीय प्रणालीचा अविभाज्य भाग असल्याने त्यांच्याकडूनही तीच शिस्त, तेच नियमन आणि तीच पारदर्शकता अपेक्षित आहे. ही अपेक्षा चुकीची नाही. परंतु अनेक लहान व मध्यम सहकारी बँकांसाठी भांडवली पर्याप्तता, तंत्रज्ञानावरील वाढता खर्च आणि कठोर नियामक शिस्त पाळण्यासाठीचे नियम हे वास्तवात मोठे आव्हान ठरत आहेत.

याचा प्रतिकूल परिणाम सहकार क्षेत्रातील चांगला कारभार व व्यवस्थित व्यवसाय करणाऱ्या सहकारी बँकांवर होत आहे. म्हणजे आमचे क्षेत्र आमच्यासाठी बाधक ठरत आहे. यावर सहकार क्षेत्राने आत्मचिंतन करणे अत्यावश्यक आहे. एकीकडे सहकार मंत्रालय सहकारी बँकिंगचा विस्तार आवश्यक असल्याचे सांगते आणि त्या दिशेने पावले टाकत आहे, तर दुसरीकडे आमचा नियामक RBI मात्र आपली मूळ चाल बदलत नाही. फक्त आम्हीही सकारात्मक आहोत, हे दाखवण्यापुरती भूमिका घेतली जाते.

ही तथाकथित सकारात्मकता प्रत्यक्षात नकारात्मक दृष्टीकोनातून येते, हे काढण्यात आलेल्या draft circular आणि नवीन बँक परवाना धोरणातून स्पष्ट होते. नवीन बँका स्थापन करण्यासाठी किमान भांडवल मर्यादा रुपये ३०० कोटी असावी, असे सुचवले जाते. म्हणजे सरकार म्हणते नवीन परवाने द्या, तर RBI म्हणते नक्कीच देऊ, परंतु अशी अट घालून की ती प्रत्यक्षात कोणीही पूर्ण करू शकणार नाही. लालफीतशाही (bureaucracy) कशी काम करते याचे हे एक सुंदर उदाहरण आहे. सहकारी बँकिंगबाबत अशी अनेक उदाहरणे देता येतील. मात्र तो आजचा विषय नाही.

बँकिंग व्यवसायावर अर्थसंकल्पाचा परिणाम केवळ कर्जपुरवठ्यापुरता मर्यादित नसतो. शेअर बाजारातील सकारात्मक वातावरणामुळे गुंतवणूक वाढते, व्यवहार वाढतात आणि वित्तीय प्रणालीला गती मिळते. मात्र बाजारातील अस्थिरता वाढल्यास त्याचा परिणाम गुंतवणूकदारांच्या मानसिकतेवर तसेच बँकांच्या निधी व्यवस्थापनावर होतो. सोने-चांदीच्या किमतींमधील चढ-उतारांचा परिणाम गोल्ड लोन व्यवसायावर आणि बँकांच्या निधी व्यवस्थापनावर थेट होतो–कधी संधी म्हणून, तर कधी जोखीम म्हणून.

एकूणच पाहता हा अर्थसंकल्प बँकिंग क्षेत्राला विस्ताराची संधी देतो; मात्र सहकारी बँकांना आत्मपरीक्षणाचा स्पष्ट संदेशही देतो. केवळ स्वतः पुरते न पाहता संपूर्ण सहकारी क्षेत्रात एकत्रित सुधारणा करणे आवश्यक आहे. त्या सुधारणा झाल्या, तरच भविष्यात सहकार क्षेत्रासाठी चांगल्या संधी उपलब्ध होतील. अन्यथा काही संस्थांमुळे चांगल्या व सक्षम सहकारी बँकांनाही भविष्यात अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

केवळ परंपरेच्या जोरावर व्यवसाय टिकवण्याचा काळ आता संपत चालला आहे. सुशासन, व्यावसायिक व्यवस्थापन, जोखीम नियंत्रण आणि ग्राहक-केंद्रित सेवा या बाबी पर्याय राहिलेल्या नाहीत, तर अपरिहार्य गरज बनल्या आहेत. चांगले निर्णय स्वीकारणे आणि चुकीच्या धोरणांवर ठामपणे टीका करणे – या दोन्हींचा समतोल राखत सहकारी बँकांनी पुढील वाटचाल केली, तरच बदलत्या आर्थिक वातावरणात त्यांचे अस्तित्व आणि विश्वासार्हता टिकून राहील. अर्थसंकल्प दिशा दाखवतो. त्या दिशेने योग्य पावले टाकणे हे सहकारी बँकिंगच्या नेतृत्त्वावर अवलंबून आहे.

**– व्यंकटेश कुळकर्णी.**
**सहकार भारती प्रशिक्षण केंद्र प्रमुख.**
**मो.नं. – ९४०३० ८०७५१**

*****

मागील पानावरून...

## केंद्रीय अर्थसंकल्पात सहकार क्षेत्राच्या विकासासाठी पाठबळ

वाढवणे आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या हेतूने काजू, कोको इत्यादींकरिता विशेष प्रोत्साहन योजनेची घोषणा केली गेलेली आहे. मत्स्य उद्योगातील सहकारी संस्था सशक्त बनवण्याच्या हेतूने नाबार्ड आणि राष्ट्रीय सहकारी विकास निगम यांच्या माध्यमातून विशेष अनुदान देण्यात येईल.

राष्ट्रीय ग्रामीण सहकारी बँकांच्या महासंघाच्या अंतर्गत ग्रामीण सहकारी बँकेची संरचना सुदृढ करण्याच्या दृष्टीने घोषणा केली आहे. सर्व प्रोत्साहनदायक योजनांना विशेष रूप दिल्याने ग्रामीण विकासात सहकारी संस्थांची भागीदारी प्रोत्साहित होईल. 'सहकार से समृद्धी' हे लक्ष्य साध्य करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून बजेटमध्ये विशेष योजना दिली गेली आहे.

**✻ ॲड. सुभाष मोहिते – मानद सचिव, पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशन –**

केंद्रीय अर्थसंकल्पातून नागरी सहकारी बँकांना कलम ८० पी अनुसार आयकर सवलत, सायबर सुरक्षा व डिजिटायझेशनसाठी भरीव मदत मिळणे, नागरी सहकारी बँकांना म्युच्युअल फंड वितरक व सरकारी योजना राबविण्यास अधिकृत केल्यास वित्तीय समावेशन अधिक बळकट होईल. पॅक्सना बिझनेस करस्पाँडंट म्हणून नेमण्याची मुभा दिल्यास ग्रामीण व निमशहरी भागात बँकिंग सेवा प्रभावीपणे पोहोचतील. या मागण्यांचा सकारात्मक विचार करावा अशी अपेक्षा होती. परंतु त्याबाबत काहीही उल्लेख अर्थसंकल्पात नाही. तथापि बँकांच्या संदर्भात उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे, ही बाब स्वागतार्ह आहे. तथापि या समितीत सहकारी बँकिंगमध्ये काम करणाऱ्या तज्ज्ञांचा समावेश असणे आवश्यक आहे.



# सहकाराची डिजिटल अर्थव्यवस्थेकडे वाटचाल

**केंद्रीय अर्थसंकल्पात केंद्राने जाहीर केलेल्या राष्ट्रीय सहकार धोरणाच्या अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पीय पाठबळाची घोषणा पूर्ण करण्यात आली आहे. त्यामुळे दोन लाख सहकारी विविध कार्यकारी सहकारी संस्थांची उभारणी, बहुउद्देशीय सहकारी सेवा केंद्र म्हणून मान्यता, त्यांचे व्यावसायिक व्यवस्थापन व तंत्रज्ञानांवर आधारित कामकाज यामुळे ग्रामीण भागात सहकाराची उपस्थिती वाढणार आहे. या वेळचा अर्थसंकल्प सहकार क्षेत्राला थेट अनुदान अथवा सवलत देणारा नसला, तरी संरचनात्मक बळ देणार आहे.**




यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प हा सहकार क्षेत्राला थेट अनुदान अथवा सवलत देणारा नसला, तरी संरचानात्मक बळ देणारा ठरेल, अशी अपेक्षा आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था डिजिटल वित्तीय प्रणालीच्या माध्यमातून सक्षम करण्यासंदर्भात अर्थसंकल्पात महत्त्वाच्या तरतुदी आहेत. ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सहकार क्षेत्राला नवीन संधी उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. डिजिटल वित्तीय प्रणाली यशस्वी करण्याची जबाबदारी पार पाडत असतानाच सहकाराची पारंपरिक तत्त्वे जपण्यासाठी सहकार क्षेत्राला तारेवरची कसरत करावी लागणार असून, व्यावसायिकता आचरणात आणताना सहकाराचा गाभा सुरक्षित ठेवण्याची फार मोठी जबाबदारी सहकार क्षेत्रावर आहे.



विद्याधर अनास्कर

**※ सहकारच्या माहितीचा राजकारणासाठी तर उपयोग होणार नाही ना?**

सरकार 'को-ऑपरेटिव्ह स्टॅक' नावाचा डिजिटल एकात्मिक प्लॅटफॉर्म विकसित करीत आहे. त्यामध्ये विविध कार्यकारी संस्थांचा सदस्य डेटा, कर्ज माहिती, अनुदान योजना, कृषिसाठा व सेवा बँकिंग लिंक इत्यादींचा समावेश होणार आहे. यामुळे डेटा पारदर्शकता, जलद कर्ज निर्णय, दुहेरी फायदे थांबविणे, लेखापरीक्षणातील दोष दुरुस्तीवरील पूर्तता अधिक सुलभ होईल. त्रिस्तरीय रचनेतील इतर सहकारी बँकांची म्हणजेच जिल्हा बँका व राज्य बँका यांची जोखीम निश्चितच कमी होईल. परंतु राज्याच्या अखत्यारीतील 'सहकार' विषयाच्या संदर्भात या माहितीचा केंद्र पातळीवर राजकारणासाठी उपयोग होणार तर नाही ना ? या शंकेचे निरसन आपल्या कृतीतून केंद्र शासनास करावे लागेल.

**※ अर्थसंकल्पात थेट सवलत –**

केंद्र शासनाने नुकतेच जाहीर केलेले 'केंद्रीय सहकार धोरण : २०२६' त्या अनुषंगाने विविध राज्यांनी केंद्रीय धोरणाशी सुसंगत असे राज्याचे सहकार धोरण तयार करण्यासाठी निश्चित केलेला कालबद्ध कार्यक्रम, सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेने या वर्षाच्या सुरुवातीलाच कायद्यामध्ये बदल करीत सहकारी बँकांबद्दल स्वीकारलेले व्यावसायिक धोरण इत्यादींच्या पार्श्वभूमीवर सहकार क्षेत्राला यंदाच्या अर्थसंकल्पात थेट सवलत, अनुदान अथवा निधी मिळणार नाही, असा अंदाज होताच. त्याचप्रमाणे अशी कोणतीही भरीव व थेट सवलत सहकारी बँकिंग क्षेत्राला व एकूणच सहकार क्षेत्राला मिळालेली नाही.

परंतु, ग्रामीण अर्थव्यवस्था डिजिटल वित्तीय प्रणालीच्या माध्यमातून सक्षम करण्यासंदर्भात अर्थसंकल्पात महत्त्वाच्या तरतुदी असल्याने, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सहकार क्षेत्राला यामधून नवीन संधी उपलब्ध होतील. तसेच डिजिटल वित्तीय प्रणाली यशस्वी करण्यासाठी त्यांच्यावरील दबावही वाढेल, यात शंका नाही. डिजिटल वित्तीय प्रणाली यशस्वी करण्याची जबाबदारी पार पाडत असतानाच सहकाराची पारंपरिक तत्त्वे जपण्यासाठी सहकार क्षेत्राला तारेवरची कसरत करावी लागणार आहे. केंद्र सरकारला अपेक्षित असणारी 'व्यावसायिकता' आचरणात आणताना सहकाराचा गाभा सुरक्षित ठेवण्याची फार मोठी जबाबदारी सहकार क्षेत्रावर आहे.

**※ उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा फायदेशीर?**

बँकिंग संरचनेचा आढावा घेण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली आहे. याचा सहकारी बँकांना फायदा होणार का धोरणात्मक तोटा होणार, हे काळच ठरवेल. सध्या केंद्र शासनाचे व रिझर्व्ह बँकेचे धोरण पाहता सहकारी बँकांची भविष्यातील स्थिती ही 'बाहेरून सहकारी, आतून मात्र व्यापारी' अशीच होणार असल्याचे दर्शविते. सहकारी बँकांना व्यापारी बँकांचे त्यांच्या संचालक मंडळाची रचना, कार्यपद्धतीबाबतचे नियम इत्यादी बाबतीतही व्यापारी बँकांचेच नियम लागू करण्यात येत असल्याने भविष्यात या बँका केवळ नावालाच सहकारी बँका राहतील. परंतु त्यांचे कामकाज मात्र पूर्णतः व्यापारी बँकांप्रमाणेच चालेल, असे धाडसी विधान करायला निश्चितच वाव आहे.

करसंबंधित सहकार क्षेत्राला मिळालेला थेट दिलासा म्हणजे एका सहकारी संस्थेला दुसऱ्या सहकारी संस्थेकडून मिळणाऱ्या लाभांशावर कर सवलत देण्याची तरतूद होय. यामुळे निश्चितच सहकारी संस्थांमधील आर्थिक प्रवाह सुलभ होईल, दुहेरी कर टळेल, गुंतवणूकदार संस्थेच्या सदस्यांना अधिक लाभांश देता येईल. परंतु, त्यासाठी एका सहकारी संस्थेला निबंधकाच्या परवानगीशिवाय दुसऱ्या सहकारी संस्थेचे सदस्यत्त्व घेता येणार नाही, ही राज्याच्या कायद्यातील, जिचा उल्लेख रिझर्व्ह बँक वारंवार आपल्या तपासणी अहवालात करते, ती रद्द करणे गरजेचे होते. वास्तविक लाभांशाबरोबरच ही सवलत सहकारी संस्थांच्या गुंतवणुकीवर त्यांना दुसऱ्या सहकारी संस्थेकडून मिळणाऱ्या व्याजावरसुद्धा देणे अपेक्षित होते.

**※ नवीन सहकारी संस्थांची उभारणी शक्य –**

या अर्थसंकल्पात केंद्र सरकारने जाहीर केलेल्या राष्ट्रीय सहकार धोरणाच्या अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पीय पाठबळाची घोषणा पूर्ण केली आहे. त्यामुळे दोन लाख सहकारी विविध कार्यकारी संस्थांची उभारणी, त्यांना बहुउद्देशीय सहकारी सेवा केंद्र म्हणून मान्यता, त्यांचे व्यावसायिक व्यवस्थापन व तंत्रज्ञानावर आधारित कामकाज इत्यादींमुळे ग्रामीण भागात सहकाराची उपस्थिती निश्चितच वाढेल. सहकारी बँकांना नवीन व्यवसाय संधी उपलब्ध होतील व तळापासूनच म्हणजे विविध कार्यकारी संस्थापासूनच सहकाराची वाटचाल तंत्रज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेकडे सुरू होईल. यामुळे ग्रामीण भागात सहकाराच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती होईल. परंतु, राजकारणाशी अतूट नाते असलेले सहकार क्षेत्र या सर्व गोष्टींचा फायदा कसा उठवेल हे पाहणे महत्त्वाचे आहे.

**※ अर्थसंकल्प संरचनात्मक बळ देणारा –**

वरील पार्श्वभूमीवर यंदाचा अर्थसंकल्प हा सहकार क्षेत्राला थेट अनुदान अथवा सवलत देणारा नसला, तरी संरचानात्मक बळ देणारा ठरेल. लाभांशावरील कर सवलत, डिजिटल एकात्मीकरण, ग्रामीण भागातील कर्ज विस्तार, राष्ट्रीय सहकार धोरणास आर्थिक पाठबळ यांच्या एकत्रीकरणामुळे सहकार क्षेत्रासाठी भविष्यातील पायाभरणी मजबूत होईल, असा आशावाद या निमित्ताने मी व्यक्त करू इच्छितो.

**– विद्याधर अनास्कर**

**– प्रशासक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई**

****

# केंद्रीय अर्थसंकल्प : अर्थव्यवस्थेची ऐतिहासिक वाटचाल आणि सहकाराचे नवे क्षितिज

‘नेमेचि येतो पावसाळा’ या उक्तीप्रमाणे दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात केंद्रीय अर्थसंकल्प जाहीर केला जातो आणि संपूर्ण देशाचे लक्ष या एका दस्तऐवजाकडे लागलेले असते. समाजातील प्रत्येक घटकाला मग तो वैयक्तिक करदाता असो की एखादी व्यावसायिक संस्था, या अंदाजपत्रकाबाबत प्रचंड उत्सुकता असते. प्रत्येकाच्या अपेक्षा व्यक्तिसापेक्ष असतात; प्रत्येकाला जाणून घ्यायचे असते की यातून ‘मला नेमकं काय मिळणार आणि मी काय गमावणार?’ मात्र, हा विचार करताना आपण अनेकदा केवळ तात्कालिक परिणामांचाच विचार करतो. खऱ्या अर्थाने विचार करायचा झाला, तर अर्थसंकल्पाचे दीर्घकालीन आणि अदृश्य परिणाम आपल्या व्यवसायवृद्धीवर किंवा वैयक्तिक आयुष्यावर कसे होणार, हे समजून घेणे महत्त्वाचे असते. अंदाजपत्रकाला नेहमीच दोन बाजू असतात आणि ज्या बाजूने आपण त्याकडे पाहतो, तशीच प्रतिमा आपल्याला दिसत असते. राजकीय प्रतिक्रिया नेहमीच एकांगी असल्या, तरी ‘संकल्प’ या शब्दाचा खरा अर्थ म्हणजे ‘निर्णय’. माणसाच्या निर्णयक्षमतेला अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि हाच निर्णय जेव्हा देशाच्या तिजोरीबाबत घेतला जातो, तेव्हा तो कोट्यवधी लोकांचे भविष्य ठरवतो.



गणेश निमकर
९८२२५ ६८५५०

**※ अर्थसंकल्पाची सुरूवात –**

विशिष्ट आर्थिक परिस्थितीने लादलेल्या मर्यादांनुसार जमा-खर्चाची तोंडमिळवणी करण्याची कला म्हणजे अर्थसंकल्प. ही केवळ सरकारची जबाबदारी नाही, तर प्रत्येक व्यक्तीला आणि संघटनेला स्वतःचा अर्थसंकल्प आखावा लागतो. शासनाच्या बाबतीत बोलायचे झाले, तर पुढील आर्थिक वर्षातील शासकीय जमा-खर्चाचे वार्षिक विवरणपत्र म्हणजे अर्थसंकल्प होय. याला इंग्रजीमध्ये ‘बजेट’ असे म्हणतात, ज्याचा उगम १७३३ मध्ये इंग्लंडमध्ये झाला. भारताच्या अर्थसंकल्पीय प्रवासाची सुरुवात स्वातंत्र्यापूर्वीच ७ एप्रिल १८६० रोजी जेम्स विल्सन यांनी केली होती. तर स्वतंत्र भारताचे पहिले बजेट २६ नोव्हेंबर १९४७ रोजी आर. के. षण्मुखम चेट्टी यांनी मांडले.




**※ अर्थसंकल्पाचे दोन मुख्य भाग –**

भारत सरकारचा अर्थसंकल्प मुख्यत्वे दोन भागात विभागलेला असतो : महसुली आणि भांडवली. महसुली विभागात प्रशासकीय खर्च कर, व्याज आणि लाभांश यांचा समावेश होतो, तर भांडवली विभागात नवीन मालमत्ता निर्माण करण्यासाठी होणारा खर्च आणि कर्ज उभारणीचा विचार केला जातो. जेव्हा खर्च उत्पन्नापेक्षा जास्त असतो. तेव्हा ‘तुटीचा अर्थसंकल्प’ जन्म घेतो, जो भारतासारख्या विकसनशील देशासाठी आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी एक आवश्यक साधन मानला जातो.

यंदाचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प जेव्हा सादर झाला, तेव्हा तो केवळ आकडेवारीचा खेळ नव्हता तर तो ‘विकसित भारत’ घडवण्याच्या दिशेने टाकलेले एक खंबीर पाऊल होते.

**※ कृषी क्षेत्रासाठी विक्रमी तरतूद –**

यंदाच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी १,६२,६७१ कोटी रुपयांची विक्रमी तरतूद करण्यात आली आहे, जी ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करण्यासाठी महत्त्वाची ठरेल. पीएम किसान सन्मान निधीसाठी ६३,५०० कोटी आणि पीक विम्यासाठी १५,००० कोटी रुपयांची तरतूद हे सिद्ध करते, की सरकारचा रोख कृषी सक्षमीकरणावर आहे. विशेषतः ‘कृषी पायाभूत सुविधा निधी’ (AIF) अंतर्गत काढणीपश्चात व्यवस्थापनासाठी (Post-harvest management) दिलेला भर आणि ‘नॅचरल फार्मिंग’साठी १ कोटी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय ग्रामीण भागात नवीन आर्थिक समीकरणे मांडणार आहे. शेतकरी आता केवळ अन्न पिकवणारा घटक राहिला नसून तो ‘ऊर्जादाता’ आणि ‘उद्योजक’ बनत आहे. ‘पीएम-कुसुम’ आणि सौर ऊर्जेच्या योजनांमुळे शेतकरी स्वतःची वीज निर्माण करून ती विकू शकणार आहेत, ज्यामुळे त्यांच्या शाश्वत उत्पन्नात मोठी वाढ होईल.

**※ ठेवींचे प्रमाण वाढणे शक्य –**

जेव्हा या विविध योजनांमुळे शेतकऱ्यांच्या खिशात जास्तीचे पैसे येतील, तेव्हा ग्रामीण भागातील आर्थिक संस्थांकडे येणारा ठेवींचा ओघही नक्कीच वाढणार आहे. मात्र, यासोबतच एक ‘गोड’ आव्हानही उभे ठाकले आहे. ते म्हणजे शेतकरी ‘आत्मनिर्भर’ झाल्यामुळे त्याला आता केवळ गरजा भागवण्यासाठी लागणाऱ्या ‘खावटी कर्जाची’ किंवा जास्त व्याजाच्या कर्जाची फारशी गरज उरणार नाही. शेतकऱ्यांच्या हातात खेळता पैसा वाढल्याने आर्थिक संस्थांना आता केवळ पारंपरिक सावकारी पद्धतीचे कर्जवाटप करून चालणार नाही. अशा वेळी आर्थिक संस्थांना ‘डिजिटल क्रॉप लोन’ आणि ‘कृषी प्रक्रिया उद्योगांसाठी लागणाऱ्या नवीन कर्ज योजनांमध्ये बदल करून, शेतकऱ्यांच्या बदलत्या आधुनिक गरजांनुसार आपली उत्पादने नव्याने तयार करावी लागतील. थोडक्यात सांगायचे तर शेतकरी बदललाय, आता बँकांनी आणि पतसंस्थांनी स्वतःची जुनी 'कात' टाकणे गरजेचे आहे.

**※ ‘एकमेकां सहाय्य करू आणि अपडेट राहू’ –**

सहकार क्षेत्राचा विचार करता, ‘एकमेका साहाय्य करू’ हे सूत्र आता डिजिटल युगात ‘एकमेकां साहाय्य करू आणि अपडेट राहू’ असे बदलले आहे. सहकारी बँका आणि पतसंस्थांसाठी हा अर्थसंकल्प आधुनिक ‘शस्त्रे’ घेऊन आला आहे. बँकिंग संरचनेसाठी नेमलेल्या उच्चस्तरीय समितीने दिलेला ‘भांडवल सक्षमीकरणाचा’ सल्ला आता केवळ कागदावर न राहता अनिवार्य झाला आहे. आता केवळ ओळखीच्या जोरावर संचालक बनणे किंवा नियमांना बगल देऊन कर्ज वाटप करणे शक्य होणार नाही.

व्यावसायिक व्यवस्थापन (Professional Management) ही आता अस्तित्वाची लढाई बनली आहे. डिजिटल इंडियाचा वारा आता गावपातळीवरील छोट्या आर्थिक संस्थांपर्यंत पोहोचला असून, सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केलेले ‘डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर’ (DPI) या संस्थांसाठी गेम चेंजर ठरणार आहे. ज्या संस्था आजही जुन्या पद्धतीवर अडून राहतील, त्यांना आधुनिक खासगी बँकांच्या ‘चकाचक’ ॲप्सशी स्पर्धा करणे कठीण जाईल. आजच्या तरुण पिढीला बँकिंग व्यवहारांसाठी शाखेत येण्यापेक्षा मोबाइलवर व्यवहार करणे अधिक भावते, त्यामुळे यूपीआय (UPI) आणि डिजिटल पेमेंट सेवांकडे वळणे ही आता सोय नसून गरज आहे. रिझर्व्ह बँकेचा ‘डिजिटल रुपया’ (CBDC) हा रोख

हाताळणीचा खर्च कमी करण्यासाठी एक उत्तम पर्याय म्हणून समोर आला आहे. मात्र, या डिजिटल प्रवासात 'सायबर सुरक्षेसाठी' अर्थसंकल्पात केलेली तरतूद आणि डेटा संरक्षणाचे नियम पाळणे ही देखील प्रगतीचीच दुसरी बाजू आहे, हे या संस्थांनी विसरून चालणार नाही.

**❊ सहकारी संस्थांना मोठा दिलासा? –**

अर्थसंकल्पातील कर सवलतींनी सहकारी संस्थांना मोठा दिलासा दिला असला, तरी प्रत्यक्षात ही सवलत म्हणजे 'दिसतं तसं नसतं' या उक्तीप्रमाणेच आहे. आयकर कायद्याच्या कलम ८०पी (Section 80P) मध्ये केलेल्या सुधारणांमुळे लाभांशावर वजावट मिळून निव्वळ नफा वाढणार असला, तरी प्रशासकीय अंमलबजावणीचा पेच अजूनही सुटलेला नाही. कागदावर टॅक्स रिफंडची प्रक्रिया सोपी झाल्याचे भासले, तरी प्रत्यक्ष परिस्थिती आजही 'सरकारी काम आणि नऊ महिने थांब' अशीच आहे. अनेक सहकारी संस्थांना त्यांच्या हक्काचा इन्कमटॅक्स रिफंड मिळवण्यासाठी आजही न्यायालयाचे दरवाजे ठोठावून अक्षरशः 'वनवास' भोगावा लागतो. नवीन आयकर कायद्यात केवळ सवलतींची घोषणा करून चालणार नाही, तर त्यांच्या पारदर्शक आणि वेगवान अंमलबजावणीबद्दल स्पष्ट तरतूद असणे अपेक्षित आहे; अन्यथा या सवलती म्हणजे एखाद्या उपोषणकर्त्याला 'लवकरच जेवण मिळेल' असे आश्वासन देऊन ताट मात्र रिकामेच ठेवण्यासारखा प्रकार होईल. जर अंमलबजावणीत स्पष्टता नसेल, तर या सवलती फक्त सरकारी फाइल्सची शोभा वाढवतील आणि सहकारी संस्थांच्या पदरात मात्र 'तारीख पे तारीख'च पडत राहील.

**❊ पशुधन आणि मत्स्य व्यवसायाला प्राधान्य –**

ग्रामीण भागात पशुधन आणि मत्स्य व्यवसायाला जे प्रोत्साहन दिले जात आहे, त्यातून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत. विशेषतः २० हजार नवीन पशुवैद्यकीय डॉक्टरांची नियुक्ती करण्याचा निर्णय ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारा ठरेल. उच्च मूल्य असलेल्या कृषी उत्पादनांवर, जसे की काजू आणि कोको, यांच्या लागवडीवर यंदा विशेष भर देण्यात आला आहे. यामुळे भारतीय उत्पादने जागतिक बाजारपेठेत आपले स्थान निर्माण करतील. महिला उद्योजकांसाठी 'लखपती दीदी' कार्यक्रमांतर्गत सुरू होणारे 'SHE मार्ट' महिला सक्षमीकरणाला नवी दिशा देतील. या सर्व उपक्रमांमुळे ग्रामीण भागात पैशाचे फिरणे (Circulation) वाढणार आहे, ज्याचा थेट फायदा सहकारी बँकिंग क्षेत्रालाच होणार असल्याने आता या संस्थांनी या संधीचा फायदा घेऊन महिला बचत गट आणि छोट्या व्यावसायिकांना आधुनिक पद्धतीने कर्जपुरवठा केला पाहिजे.

**❊ आधुनिकतेचा वारसा जोपासण्याची गरज –**

शेवटी, अर्थसंकल्पीय तूट भरून काढण्यासाठी नवीन चलननिर्मिती किंवा रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेणे हे पर्याय असले, तरी सरकारी अंदाजपत्रकाचा मुख्य उद्देश केवळ पैसे मिळवणे हा नसून राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार आणि समाजात आर्थिक स्थैर्य राखणे हा आहे. सरकारी अंदाजपत्रकातील उत्पन्न व खर्च ही केवळ 'साध्ये' नसून ती आर्थिक विकास साधण्याची 'साधने' आहेत. सहकारी संस्थांसमोर सर्वांत मोठे आव्हान खासगी बँकांच्या चकचकीत





जाहिरातींचे असले, तरी विश्वासाच्या बळावर आणि तंत्रज्ञानाच्या जोडीवर त्या यशस्वी होऊ शकतात. आपण फक्त जुने आणि विश्वासू आहोत असे सांगण्यापेक्षा आम्ही आधुनिक आणि सुरक्षित आहोत, हे सांगण्याची आता वेळ आली आहे. सायबर सुरक्षेचे कडक संरक्षण आणि बदलत्या अर्थनीतीचा स्वीकार हेच सहकारी क्षेत्राच्या यशाचे गमक आहे.

अर्थसंकल्प म्हणजे नेमका लग्नातल्या जेवणासारखा असतो. ज्याप्रमाणे लग्नाच्या पंगतीत सर्वच पदार्थ प्रत्येकाच्या आवडीचे किंवा प्रकृतीला (पथ्याला) मानवणारे नसतात, तसेच अर्थसंकल्पाचेही आहे. एखाद्याला 'इन्कम टॅक्स'मधील सवलत गोड वाटत असली, तरी दुसऱ्याला वाढलेली 'महागाई' तिखट लागू शकते. कोणाला भांडवली गुंतवणुकीचे पदार्थ पचायला जड वाटतात, तर कोणाला तुटीच्या अर्थसंकल्पाचा बेत आपल्या पथ्यातला वाटत नाही. पंगतीत जसे काही लोक फक्त उणिवा काढण्यात मग्न असतात, तद्वतच अर्थसंकल्पाकडे केवळ राजकीय चष्म्यातून पाहून टीका करणारेही अनेक असतात. परंतु, एक सजग नागरिक म्हणून आपले कर्तव्य हे आहे, की ताटात वाढलेल्या सर्व पदार्थांकडे (तरतुदींकडे) तक्रारीच्या सुरात न पाहता, त्यातील जे पोषक आणि विकासासाठी पूरक आहे, त्याचा सकारात्मक स्वीकार करावा आणि देशाच्या प्रगतीच्या प्रवासात आपला खारीचा वाटा उचलावा.

सहकारी बँका आणि पतसंस्था हे भारतीय अर्थव्यवस्थेचे पाय आहेत. या अर्थसंकल्पाने त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे 'बूट' आणि कर सवलतींची 'काठी' दोन्ही दिले आहे. आता फक्त या संस्थांनी अडखळत न राहता वेळेत धावणे शिकले पाहिजे.

**❊ होमवर्क पूर्ण केला तरच प्रगती –**

बँकिंग सुधारणांच्या शिफारशी म्हणजे एखाद्या कठोर शिक्षकाने दिलेल्या 'होमवर्क'सारख्या आहेत, जो पूर्ण केला तरच प्रगती होईल, अन्यथा 'दंड' अटळ आहे. अर्थसंकल्पात यंदा सहकार क्षेत्रासाठी स्वतंत्र 'राष्ट्रीय डेटाबेस' आणि 'संगणकीकरण' यांवर दिलेला भर म्हणजे या संस्थांना जागतिक स्पर्धेत टिकवण्यासाठी दिलेले बळच आहे. सहकार क्षेत्राने आता जुन्या साच्यातून बाहेर पडून 'कॉर्पोरेट' स्टाईलने पण 'सहकारी' भावनेने काम केले, तरच भविष्यात तग धरता येईल. शेतकरी जेव्हा 'डिजिटल' होईल आणि आर्थिक संस्था जेव्हा 'स्मार्ट' होतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने 'विकसित भारत' साकार होईल.

या लेखात सांगितलेले सर्व बदल हे केवळ तांत्रिक नसून ते आपल्या मानसिकतेशी जोडलेले आहेत. सहकाराचा कणा असलेला सामान्य माणूस जोपर्यंत तंत्रज्ञानाने सुसज्ज होत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने 'विकसित भारत' होणे केवळ दिवास्वप्न ठरेल.

**– गणेश रामचंद्र निमकर, पुणे.**
**बँकिंग सल्लागार मोबाईल – ९८२२५ ६८५५०**
**बी. कॉम, जी. जीडीसीए, सी.ए.आय.आय.बी.**
**ई मेल –** nimkarganeshgmail.com

*****

केंद्रीय अर्थसंकल्प विशेष...

# ‘सहकार से समृद्धी’ला विशेष बळ!

**देशातील सहकार क्षेत्राची व्याप्ती प्रचंड मोठी असून, अनेकांना रोजगार देण्याची क्षमता त्यामध्ये आहे. त्यामुळे या क्षेत्राचा विकासच पर्यायाने गावाचा विकासाचा आरंभ ठरतो. हेच लक्षात ठेवून यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये सहकार क्षेत्रासाठी नवीन योजनांच्या घोषणा करण्यात आल्या. या सगळ्यांचा सहकारीतेवर होणारा परिणाम आणि होणाऱ्या लाभाचा घेतलेला आढावा...**




शरद जाधव
९४२२७ ६१६९९


या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात केंद्र सरकारने सहकारी या क्षेत्राला विशेष प्राथमिकता दिली आहे. ग्रामीण भागातील उत्पादनाकरिता बाजार सुविधा, कर सवलत तथा डिजिटलायझेशनच्या माध्यमातून सहकारी संस्थांना सशक्त बनवण्याच्या हेतूनेही विशेष प्रोत्साहन दिले गेलेले आहे.

※ **शेतकऱ्यांकरिता :** कृषी उत्पादन वाढवणे आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या हेतूने, काजू-कोको इत्यादी करिता विशेष प्रोत्साहन योजनेची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

※ **आर्थिक सशक्तीकरण :** सहकारी संस्थांकरिता विशेष करात सवलत देण्यात आली असून, लाभांशाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था सुदृढ करण्याचीही घोषणा अर्थसंकल्पात आहे. डिजिटल सहकारी मंत्रालयाच्या अंतर्गत राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये, सहकारी संस्थांच्या डिजिटलीकरणाकरिताची अनुदान प्रणालीचाही विस्तार होणार आहे.

सहकार क्षेत्राकरिता यावर्षीच्या अंदाजपत्रकात एक हजार, ७४४.७४ कोटी इतकी भरगोस तरतूद करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ म्हणजे गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पात ती एक हजार, १८६.२९ कोटी इतकी होती. म्हणजे यावर्षी ५५८.४५ कोटी रुपये एवढी अधिक तरतूद करण्यात आली आहे. यावर्षीच्या अंदाजपत्रकातील रुपये एक हजार, ७४४.७४ कोटींच्या तरतूदीपैकी ४७.७७कोटी रुपये एस्टॅब्लिशमेंट खर्चाकरिता आहे. ५०० कोटी रुपये नॅशनल, को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन अर्थात एनसीडीसीकरिता, तर ४५० कोटी रुपये नॅशनल को-ऑपरेटिव्ह एक्सपोर्ट लिमिटेड अर्थात एनसीईएलकरिता आहेत. यामध्ये को-ऑपरेटिव्ह एक्सपोर्ट, तसेच आंतरराष्ट्रीय बाजाराकरितादेखील तरतूद करण्यात आली आहे. ३६४ कोटी इतकी रक्कम भारतातील ६७ हजार, ९३० कार्यरत असलेल्या ‘प्रायमरी ॲग्रीकल्चर क्रेडिट सोसायटी’ करिता असून, ४६.९६ कोटी इतकी तरतूद नॅशनल कौन्सिल फॉर को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग व दहा कोटी इतकी रक्कम वैकुंठभाई मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंटकरिता करण्यात आली आहे. गेल्या चार वर्षांपेक्षा यावर्षी सहकार क्षेत्राला अधिक पुढे नेण्याकरिता नवीन योजना व प्रयत्न केले जात असून, यामुळे इकोनॉमिक रोल व सहकार क्षेत्र अधिक सक्षम होण्याला मदत होईल.

※ **मत्स्यपालन :** मत्स्य उद्योगातील सहकारी संस्था सशक्त बनवण्याच्या हेतूने नाबार्ड आणि राष्ट्रीय सहकारी विकास निगमच्या माध्यमातून विशेष अनुदान देण्यात येणार आहे.




**१. ग्रामीण बँकिंग :** राष्ट्रीय ग्रामीण सहकारी बँकांच्या महासंघाच्या अंतर्गत ग्रामीण सहकारी बँकेची संरचना सुदृढ करण्याच्या दृष्टीनेही घोषणा करण्यात आली आहे.

**※ नागरी सहकारी पतसंस्थेसाठी करण्यात आलेले मुख्य बदल खालीलप्रमाणे आहेत :**

※ **रोकड व्यवहार मर्यादा :** नागरी पतसंस्थांना बँकेतून रोख रक्कम काढण्याची मर्यादा तीन कोटींपर्यंत वाढवण्यात आली असून, ज्यावर ’टीडीएस’ आकारला जाणार नाही. यामुळे सदस्यांना रोख कर्जवाटप करणे सोपे होईल.

※ **‘कलम ८०पी’ अंतर्गत वजावट :** नागरी पतसंस्थांना त्यांच्या सभासदांकडून मिळणाऱ्या व्याजाच्या उत्पन्नावर मिळणारी १०० टक्के कर वजावट कायम ठेवण्यात आली आहे. यामुळे संस्थांचा निव्वळ नफा सुरक्षित राहण्यास मदत होईल.

※ **डिजिटलायझेशन :** नागरी पतसंस्थांना आता ‘नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेटाबेस’शी जोडले जात आहे. यामुळे संस्थांचे कामकाज अधिक पारदर्शक होऊन त्यांच्या विश्वासार्हतेत वाढ होईल.

**२. पगारदार नोकरांच्या सहकारी संस्था सभासदांना करसवलतीचा फायदा :** नवीन आयकर कायद्यानुसार (दि. १ एप्रिल २०२६ पासून) १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न प्रभावीपणे करमुक्त झाल्याने, पगारदार सदस्यांकडे अधिक ‘डिस्पोजेबल इन्कम’ राहील. याचा फायदा असा होईल की, सदस्य संस्थेमधील ठेवींच्या संख्येत वाढ होईल.

※ **लाभांश (डिव्हिडंड) वितरण :** एका सहकारी संस्थेने दुसऱ्या सहकारी संस्थेला (उदा. जिल्हा बँक किंवा फेडरेशन) दिलेल्या लाभांशावर दुहेरी करआकारणी टाळण्याची सवलत जाहीर करण्यात आली आहे. याचा सकारात्मक परिणाम पगारदार संस्थांच्या उत्पन्नावर होईल.

※ **प्रशासकीय सुधारणा :** पगारदार संस्थांच्या ऑडिट आणि निवडणूक प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी, ‘नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेटाबेस’मधील माहितीचा वापर करण्यात येणार असून, यामुळे प्रशासकीय विलंब कमी होईल.

**३. दोन्ही संस्थांसाठी महत्त्वाचे असलेले सामाईक परिणाम पुढीलप्रमाणे : किमान पर्यायी कर :** सहकारी संस्थांसाठी ‘मॅट’चा दर १८.५ टक्क्यांवरून कमी करून १५ टक्के करण्यात आला आहे, ज्यामुळे या संस्थांवरील कराचा बोजा कमी झाला आहे.

※ **‘आयटीआर’ सुधारण्याची मुदत :** आयकर विवरणपत्रात काही चूक झाल्यास ते सुधारण्यासाठीची मुदत आता दि. ३१ मार्चपर्यंत वाढवण्यात आली आहे. यामुळे संस्थांना तांत्रिक चुका दुरुस्त करण्यास अधिक वेळ मिळेल.

वरील सर्व प्रोत्साहनात्मक योजनांना विशेष रूप दिल्याने ग्रामीण विकासात सहकारी संस्थांची भागीदारी प्रोत्साहित होईल. ’सहकार से समृद्धी’ हे लक्ष साध्य करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवूनच, यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये विशेष सवलती जाहीर केल्याचे नक्कीच म्हणता येईल.

**(लेखक ‘सहकार भारती’च्या महाराष्ट्र प्रदेश संघटनेच्या प्रमुखपदी कार्यरत आहेत.)**

# देशातील पहिल्या सहकार तत्त्वावरील 'भारत टॅक्सी'चा शुभारंभ

**नवी दिल्ली –** देशामध्ये प्रथमच सहकारी तत्त्वावर आधारित टॅक्सी सेवेचा प्रारंभ करण्यात आला आहे. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते या नवीन योजना कार्यरत करण्यात आली आहे. ही टॅक्सीसेवा नवी दिल्ली येथील राष्ट्रीय राजधानी परिसर एनसीआर आणि गुजरात या ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

गेल्या दोन महिन्यापासून भारत टॅक्सी सेवा प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली होती. या उपक्रमास उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यानंतर या अभिनव सुविधेचे उद्घाटन करण्यात आले. साधारणपणे येत्या तीन वर्षाच्या कालावधीत ही टॅक्सी सेवा देशाच्या विविध राज्यात उपलब्ध करण्यात येणार आहे, असे केंद्रीय सहकार मंत्री शहा यांनी सांगितले. अमूल समुहासह सहकार क्षेत्रातील आठ संस्थांच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या सेवेचे प्रारूप हे शून्य उत्सर्जन आणि किफायतशीर भाडे असे असणार आहे.

ही टॅक्सी सेवा को – ऑपरेटिव्ह माध्यमातून चालविण्यात येणार




आहे. तसेच रिक्षा, चार चाकी मोटार आणि दुचाकी या स्वरुपात ही सेवा उपलब्ध असणार आहे. वाहन चालकांना अपघात विमा योजना लागू करण्यात आली आहे आणि वाहन चालकांना प्राप्त झालेल्या १०० रूपयातील ८० रुपये थेट त्याच्या बँक खात्यामध्ये जमा होणार आहेत.

# सहकार क्षेत्राला करसवलती देणारा अर्थसंकल्प

- **यंदा सहकार मंत्रालयासाठी ११८३ कोटी रुपयांची तरतूद केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.**
- **प्राथमिक कृषी पतसंस्थांच्या (पॅक्स) सक्षमीकरणावर मुख्य भर देण्यात आला आहे.**
- **देशभरातील ६३ हजारांवर प्राथमिक कृषी पतसंस्थांचे संगणकीकरण करण्यासाठी निधी दिला जाणार**
- **नवे राष्ट्रीय सहकारी धोरण लागू केले जाणार**
- **देशभरातील सहकारी संस्थांचा एकत्रित डेटाबेस तयार केला जाणार**

प्राथमिक सहकारी संस्थांसाठी अर्थसंकल्पात अनेक प्रोत्साहनपर लाभ अर्थ करण्यात करण्यात आली आहे. 'सहकारातून समृद्धी' या धोरणाला अनुसरून या अर्थसंकल्पात सहकार क्षेत्राकडे विशेष लक्ष पुरवण्यात आले आहे.

या सहकारी संस्थांच्या सदस्यांनी उत्पादित केलेले पशुखाद्य आणि कापूस बियाण्यांच्या (सरकी) पुरवठ्यासाठी दिली जाणारी वजावट वाढवण्याचा प्रस्ताव केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडला. सध्या ही वजावट फक्त उत्पादित तेलबिया, फळे किंवा भाजीपाला आणि दूध पुरवणाऱ्या प्राथमिक सहकारी संस्थांना ही वजावट दिली जाते. याशिवाय, अर्थमंत्रांनी नवीन करप्रणालीद्वारे आंतर-सहकारी संस्था लाभांश उत्पन्नावरही वजावट देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. अर्थात, हा लाभांश सदस्यांना वितरित केला जाणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय सहकारी महासंघांना पाठबळ देण्यासाठी एक अतिरिक्त उपाय म्हणून ३१ जानेवारीपर्यंत कंपन्यांमध्ये केलेल्या गुंतवणुकीवर अधिसूचित राष्ट्रीय सहकारी महासंघाला मिळालेल्या लाभांश उत्पन्नासाठी तीन वर्षांच्या कालावधीसाठी सवलत देण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

**✻ प्राथमिक कृषी पतसंस्थाचे सक्षमीकरण –**

देशातील ६३,००० कार्यरत प्राथमिक कृषी पतसंस्थांचे पूर्णपणे संगणकीकरण करण्यासाठी विशेष निधी दिला जाईल. यामुळे कर्ज वाटप प्रक्रियेत पारदर्शकता येईल.

या संस्थांना कर्ज देण्यापुरते मर्यादित न ठेवता त्यांना डेअरी, मत्स्यव्यवसाय आणि साठवणूक (गोदामे) केंद्रांशी जोडले जाईल. त्याद्वारे त्यांच्या कार्याचा विस्तार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. 'जगातील सर्वांत मोठी धान्य साठवणूक योजना' सहकार क्षेत्राच्या माध्यमातून राबवण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना त्यांचा माल साठवून ठेवता येईल आणि योग्य भाव मिळाल्यावर विकता येईल.

**✻ नवीन राष्ट्रीय सहकार धोरण आणि डेटाबेस –**

सर्व सहकारी संस्थांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी 'नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेटाबेस' पूर्ण क्षमतेने सुरू केला जाईल. सहकार क्षेत्राच्या जलद वाढीसाठी नवीन 'राष्ट्रीय सहकार धोरण' लागू करण्यात येणार आहे.

**✻ कर सवलती देणार –**

– सहकारी संस्थांना खाजगी कंपन्यांच्या बरोबरीने संधी मिळावी, यासाठी कररचनेत बदल सुचवण्यात आले आहेत.

– सहकारी संस्थांसाठी किमान पर्यायी कराचा (मॅट) दर १८.५ टक्क्यांवरून कमी करून १५ टक्के करण्यात आला आहे.

– या संस्थांना आता तीन कोटी रुपयांपर्यंतच्या रोख रकमा बँक खात्यातून करकपातीविना (विना टीडीएस) काढता येणार आहेत.

– साखर कारखान्यांनी २०१५-१६ पूर्वी दिलेल्या उसाच्या बिलांना आता 'खर्च' म्हणून दाखवण्याची परवानगी मिळाली आहे. ज्यामुळे कारखान्यांना सुमारे १०,००० कोटी रुपयांचा लाभ मिळेल.

**✻ विशेष प्रोत्साहन योजना –**

सहकारी संस्थांच्या माध्यमातून पाच कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीकडे वळवण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्रांत नवीन सहकारी संस्था स्थापण्यासाठी विशेष निधी आणि तांत्रिक मदत देण्यात येणार आहे.

**✻ 'सहकाराला चालना' –**

'कर सवलतींमुळे प्राथमिक सहकारी संस्था आर्थिक सक्षम होतील. एका संस्थेला दुसऱ्या संस्थेकडून मिळणाऱ्या लाभांशावर करसवलत घेता येणार असल्याने दुहेरी कर आकारणी टळेल. राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाच्या निधीमध्ये भरीव वाढ होणार असल्याने सहकारी संस्थांना अधिक निधी उपलब्ध होईल, अशी प्रतिक्रिया केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केली.

✻✻✻✻✻

# सहकार चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी खुले व्यासपीठ - सहकार भारती!

**सहकार क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणारी संस्था म्हणजे सहकार भारती. संस्थेचा आज वर्धापनदिन. त्यानिमित्त सहकार भारतीच्या वाटचालीचा हा आढावा...**

सहकाराच्या माध्यमातून आर्थिक विकास व आर्थिक विकासातून तळागाळातल्या शेवटच्या माणसाची सेवा म्हणजे सहकार चळवळ. समाजाच्या उन्नतीसाठी एक महत्त्वाचे हे एक साधन आहे. सहकाराच्या माध्यमातून व लोकसहभागातून आज देशाच्या अनेक ठिकाणी आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य, सांस्कृतिक इतर क्षेत्रांत भरीव कार्य करणाऱ्या संस्था उभ्या राहिलेल्या पाहत आहोत व या संस्थांच्या माध्यमातून निरलस, निःस्वार्थी वृत्तीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण झाले आहे. भारतीय जीवनपरंपरा व कुटुंबव्यवस्था सहकाराचे उत्तम उदाहरण आहे. याच भावनेने सहकारी संस्थांचे कामकाज करणाऱ्या अनेक संस्थांचे ग्रामीण विकासात व जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात महत्त्वाचे योगदान आहे. या महत्त्वपूर्ण चळवळीला व्यापक व भरीव रूपात उभे करण्यासाठी सहकार भारती ही स्वयंसेवी संघटना कार्यरत आहे. दि. ११ जानेवारी, १९७९ साली स्थापन झालेल्या सहकार भारतीचा वर्धापनदिन! 'विना संस्कार नहीं सहकार, विना सहकार नहीं उद्धार' हा मूलमंत्र घेऊन याच मंत्रांचा प्रत्यक्ष व्यवहारात आचरणाचा आग्रह धरणारी राष्ट्रव्यापी संघटना म्हणजे सहकार भारती होय. सहकार क्षेत्रात सकारात्मक व संस्कृतीवर आधारित प्रवाह निर्माण करण्यात सदैव प्रयत्नशील असणारी, सहकार क्षेत्रात नवीन झळाळी प्रस्थापित असणारी कार्यरत संघटना म्हणजे सहकार भारती!



**दिलीप पाटील**
**८७८८३ ९००३२**

सहकार चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी दैनंदिन व्यवहारात सात मुद्द्यांची अंमलबजावणी केली पाहिजे, असा सहकार भारती आग्रह करते. आपण ज्या सहकारी संस्थेत कार्यरत आहोत, तेथे लोकशाही जपली पाहिजे, संस्थेची सदस्यता सर्वांना खुली असावी. प्रत्येक सभासदाचा आर्थिक सहभाग असला पाहिजे.

संस्थेने सामाजिक बांधिलकीचा भाव जपला पाहिजे, सभासदांचे सातत्याने प्रशिक्षण व्हावे, जेणेकरून त्यांचा संस्थेत प्रत्यक्ष सहभाग वृद्धिंगत होऊन संस्थेच्या विकासात त्यांचा हातभार लागेल. सहकारी संस्था स्वायत्त असली, तरी सहकारी संस्थांनी सर्व सहकारी संस्थांच्या परस्पर सहकार्याची भावना जपली पाहिजे; या ७ मुद्द्यांच्या आधारे प्रत्येक सहकारी संस्थेने व्यवहार करावा, असा सहकार भारतीचा आग्रह असतो. सहकार क्षेत्राला नवीन ऊर्जा देणारे व त्याचे पावित्र्य जपणारे कार्यकर्ते घडविण्यासाठी सहकार भारती काम करते.



१९७५ साली आपल्या देशात आणीबाणी लादून लोकशाही तत्त्वांची पायमल्ली करण्यात आली व याविरुद्ध आवाज उठविणाऱ्या सर्वच विचारसरणीच्या कार्यकर्त्यांना, नेत्यांना अमर्यादित काळासाठी तुरुंगात डांबण्यात आले. गावोगावातील असंख्य कार्यकर्त्यांची त्यांची धरपकड करून त्यांच्या सर्वच कार्यक्रमांवर बंदी घालण्यात आली. अनिश्चित काळासाठी तुरुंगात जेरबंद असलेल्या कार्यकर्त्यांच्या आंतरिक इच्छाशक्तीला अधिक बळ मिळाले. गजाआड असलेले व कार्यकर्ते समाजव्यवस्था व आगामी दिशा यावर चिंतन करू लागले. या मंथनातून सहकार क्षेत्राला बळकटी देऊन सहकाराच्या समाजातील माध्यमातून शेवटच्या माणसाचा आर्थिक व सामाजिक विकास होऊ शकतो, असा ठाम विश्वास व्यक्त करून सहकार भारती या नावाने संघटन उभे करावे, असा काही कार्यकर्त्यांनी निर्धार केला. आणीबाणीचा काळाकुट्ट कालावधी सहकार चळवळीला दिशा देणारा ठरला. आणीबाणी उठल्यावर देशात सत्तापरिवर्तन जरूर झाले पण समाजपरिवर्तनाचा नवविचार घेऊन तुरुंगातून बाहेर पडलेल्या राष्ट्रप्रेमी कार्यकर्त्यांचा सत्तापरिवर्तन ही तात्पुरती मलमपट्टी आहे, राष्ट्र विकासासाठी समाजपरिवर्तनच आवश्यक आहे, यावर ठाम विश्वास होता. या विचारातून सहकार भारती या संघटनेची भूमिका, कार्यपद्धती, रचना इत्यादीवर मंथन होऊन ११ मार्च १९७२ रोजी रीतसर संघटनेचे नोंदणीपत्र प्राप्त झाले.

**❊ सतीश मराठेंकडे जबाबदारी –**

या संघटनेची प्रारंभी धुरा अ. भा. विद्यार्थी परिषदेचे मुंबईतील कार्यकर्ते सतीश मराठे यांच्याकडे सोपविण्यात आली. त्यांनी सातत्याने प्रवास करून, या क्षेत्रातील अनुभवी दिग्गज कार्यकर्त्यांशी चर्चा करून कामाला सुरुवात केली. त्यांच्यासोबत माधवराव भागवत, विष्णुजी बोबडे, अनंतराव कुळकर्णी, स्व. वसंतराव देवधर या मंडळींनी कंबर कसली.

संघाच्या स्वयंसेवकांनी मंथनातून, चर्चेतून, दूरगामी विकासाची दृष्टी ठेवून, स्वकर्तृत्वाने या कामाला प्रारंभ केला. आज देशभरातील सर्व राज्यांमध्ये ६५० जिल्ह्यांमध्ये सहकार भारतीचे काम सुरू आहे. रा. स्व. संघाचे आजन्म प्रचारक असलेले ॲड. लक्ष्मणराव इनामदार यांनी या कामात लक्ष घातले. स्व. लक्ष्मणरावांना सहकार क्षेत्राचा अनुभव होता असे नाही पण समाज उद्धाराची दृष्टी असलेल्या लक्ष्मणरावांनी सहकारी संस्थेच्या सभासदांचे नियमित प्रशिक्षण व्हावे असा आग्रही मुद्दा मांडला, सहकाराच्या चिंतनातून समाज व विशेषतः ग्रामीण क्षेत्र विकसित होईल, असा दृढ विश्वास त्यांनी कार्यकर्त्यांसमोर व्यक्त केला व त्याप्रमाणे सहकार भारतीचे काम सुरुवातीला महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक या राज्यांत सुरू झाले. सतत प्रवास करून कार्यकर्त्यांची मांदियाळी उभी राहिली.

आज सहकार भारतीच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून सहकार क्षेत्राला नवीन दिशा देण्याचे कार्य सुरू आहे. सहकार भारती स्वयंसेवी संघटना असल्यामुळे देशात, राज्यात सरकार कुणाचेही असो. सहकार क्षेत्राच्या बळकटीसाठी, निकोप वाढीसाठी सहकार भारतीने अभ्यासपूर्ण असे विवेचन व मांडणी केली. सहकार कायदा काळानुरूप असावा, सहकार सहकार क्षेत्र स्वायत्त असावे, नियमित प्रशिक्षणाची सोय व्हावी असा सातत्याने आग्रह केला, यादृष्टीने देशभरात संमेलने, चर्चासत्र, परिसंवाद, सहकार सप्ताह इ. च्या माध्यमातून सहकार वृद्धीचे नवनीत त्या त्या वेळच्या सरकारांपुढे मांडले.

**❊ प्रशिक्षण संस्थेची स्थापना –**

सहकार चळवळीतील कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्रात सहकार भारती प्रशिक्षण संस्था स्थापन करून आदर्श पायंडा पाडला. या संस्थेमार्फत चालणारे प्रशिक्षण पाहून २००४ साली महाराष्ट्र शासनाने या संस्थेस शासनमान्य प्रशिक्षण संस्था म्हणून मान्यता दिली.

सहकार भारतीची दर तीन वर्षांनी राष्ट्रीय व प्रांत अधिवेशने होतात. ६५० जिल्ह्यांपैकी जवळजवळ ५५० जिल्ह्यांमध्ये नियमित जिल्हा बैठकी होतात.


**पान नंबर १८ वर...**

# परिवर्तनाच्या उंबरठ्यावर सहकार चळवळ

**नवीन राष्ट्रीय सहकार धोरण सहकार चळवळीसाठी एक ऐतिहासिक पाऊल आहे. त्याच धर्तीवर राज्याचे नवीन सहकार धोरणदेखील येऊ घातले आहे. त्याबरोबरच महाराष्ट्र सहकार कायदा बदलाची देखील चर्चा सुरू झाली आहे. त्या निमित्ताने सहकार क्षेत्राकडून असलेल्या अपेक्षांचा ऊहापोह...!**

भारताची कृषिप्रधान देश म्हणूनच जगभरात ओळख आहे. देशातील सर्वाधिक लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे.

स्वातंत्र्यलढ्यात जसा स्वदेशीचा विचार होता, तसा ग्रामीण आर्थिक स्वावलंबनाचा आधार 'सहकार' आहे. भारतात आज सुमारे आठ लाख ५० हजार सहकारी संस्था कार्यरत असून सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचे सभासद सुमारे ३० कोटींच्या आसपास आहेत. महाराष्ट्रात सुमारे दोन लाख २५ हजार सहकारी संस्था असून, त्यांची एकत्रित सभासद संख्या सुमारे सुमारे सहा कोटीएवढी आहे. विशेषतः ग्रामीण भागात सर्वाधिक लोक सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, जलसिंचन योजना, विकास सोसायट्या, जिल्हा मध्यवर्ती बँका, ग्रामीण पतसंस्था, दूध संस्था, तर शहरी भागात नागरी बँका आणि गृहनिर्माण सहकारी संस्था यांच्याशी थेट निगडित असून ते अशा सर्व सहकारी संस्थांचे लाभार्थी देखील आहेत. सहकाराच्या माध्यमातून घराघरात समृद्धी आणण्यात, त्यांच्या जीवनाला अर्थपूर्णता देण्यात, त्यांच्या शिक्षण, नोकरी, आरोग्यसंदर्भात सकारात्मक परिवर्तन घडविण्यात सहकाराची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.



**भालचंद्र कुलकर्णी**
९८२२८ ८२५०९

ग्रामीण रोजगारात सहकारी संस्थांचा वाटा सुमारे ३० टक्के असल्याचे मानले जाते. ग्रामीण अर्थव्यवस्थेत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सोसायट्या या प्रामुख्याने पतपुरवठ्याचा कणा आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने आपल्या दुसऱ्या कार्यकालात टर्ममध्ये जुलै २०२१ मध्ये सहकार क्षेत्रासाठी गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र सहकार मंत्रालय सुरू केले. त्यानंतर लगेचच माजी केंद्रीय मंत्री व सहकार क्षेत्रातील जाणकार असलेल्या सुरेश प्रभूंच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सहकार धोरण समिती नेमली गेली. यापूर्वी २००२ मध्ये राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर झाले होते, ज्यात आता मूलभूत बदल करणे आवश्यक झाले होते. दि. २४ जुलै २०२५ रोजी जाहीर झालेले नवीन राष्ट्रीय सहकार धोरण हे सहकार चळवळीसाठी एक ऐतिहासिक पाऊल आहे. सहकार क्षेत्रांच्या पारदर्शकतेबरोबरच संपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्याचा विचार या धोरणात करण्यात आला असून, सहकारी संस्थांना एकत्रित डेटाबेसमध्ये आणून त्यांचे कामकाज सुलभ व विश्वासार्ह केले जाणार आहे. प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था (पॅक्स) व जिल्हा सहकारी बँका या संस्थांमध्ये 'कोअर बँकिंग सोल्युशन्स' लागू करून त्यांना राष्ट्रीय आर्थिक प्रवाहाशी जोडले जाणार आहे. या धोरणात महिलांच्या बचत गटांना सहकारी संस्थांमध्ये सामावून घेणे व तरुणांसाठी सहकारी स्टार्टअप्सला प्रोत्साहन देण्याचे जाहीर करण्यात आले आहे. कृषी, दुग्ध, मत्स्य, प्रक्रिया उद्योग, विपणन, कर्जपुरवठा आदी विविध सेवांचा एकत्रित लाभ देणाऱ्या बहुद्देशीय सहकारी संस्था स्थापन करण्यावर भर दिला आहे. नवीन सहकार धोरणात 'सहकारातून समृद्धी' या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यावर भर दिल्याचे दिसते.

केंद्र सरकारच्या धोरणाला अनुसरून सर्व राज्यांनीही धोरण डिसेंबर २०२६ अखेर पूर्ण करावयाचे आहे. महाराष्ट्र राज्याने सुद्धा नवे सहकार धोरण असावे, यासाठी केंद्रीय गृहमंत्री व सहकारमंत्री अमित शहा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सहकार धोरण ठरविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील व राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या नेतृत्वाखाली या समितीमध्ये सहकार क्षेत्रातील अनुभवी, तज्ज्ञ व शासनाचे वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश आहे. ही उच्चस्तरीय समिती सरकारला शिफारशी करेल.

बदलत्या परिस्थितीत सहकार क्षेत्रातील आव्हाने व त्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास करण्यासाठी तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०च्या कायद्यात काळानुरूप आवश्यक ते बदल करण्यासाठी देखील सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या अध्यक्षतेखाली १६ सदस्यीय नवीन समिती स्थापण्यात आली. विविध प्रकारच्या सहकारी संस्थांसाठी त्यांच्या त्यांच्या गरजांनुसार वेगवेगळे आणि सुटसुटीत कायदे, नियम असावेत अशी जुनी मागणी आहे, ती यानिमित्ताने चर्चिली जाईल, अशी अपेक्षा आहे.

*** मोठी आव्हाने –**

गेल्या काही दशकांमध्ये सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनातील अपारदर्शकता, आर्थिक गैरव्यवहार, तंत्रज्ञानाचा अभाव आणि बदलत्या गरजांशी जुळवून न घेणे या कारणांनी सहकार क्षेत्राला मोठी आव्हाने निर्माण झाली आहेत. राज्य शासनाने 'महाराष्ट्र राज्य सहकार धोरण' तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, हे धोरण केवळ नियमांमध्ये बदल करण्यापुरते मर्यादित नसावे तर ते संपूर्ण सहकार क्षेत्राला आधुनिकतेकडे नेणारे असण्याची गरज या क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केली आहे.

आज सहकारी संस्थांवर सर्वांत मोठा आरोप हा व्यावसायिकता आणि पारदर्शकतेच्या अभावाचा आहे. नागरी सहकारी बँकांमध्ये, पतसंस्थांमध्ये खात्यांची माहिती अद्ययावत नसणे, सभासद, खातेदारांना योग्य डेटा न मिळणे, कर्जवाटप प्रक्रियेत प्रामाणिकपणाचा अभाव आणि भ्रष्टाचार या गोष्टींनी सहकाराची प्रतिमा काही प्रमाणात मलिन झाली आहे. नव्या सहकार धोरणात संपूर्ण संगणकीकरण, ऑनलाइन लेखापरीक्षण, पारदर्शक व्यवहार आणि डेटा-आधारित व्यवस्थापन यांना अग्रक्रम देण्याची गरज आहे. यासाठी संपूर्ण डिजिटायझेशनची आणि त्याहीपुढे 'एआय' तंत्रज्ञानाची देखील गरज प्रकर्षाने पुढे येत आहे. या अडचणींवर मात करण्यासाठी विविध उपाययोजनांची गरज राज्याच्या धोरणात दिसायला हवी. कृषी कर्जवाटप दुप्पट करण्याची उद्दिष्टे, जोखीम व्यवस्थापन प्रणाली, वित्तीय शिस्त आणि व्यवस्थापनासाठी सर्वंकष प्रशिक्षण हेदेखील मुद्दे नव्या धोरणात समाविष्ट व्हायला हवेत. सहकार खात्याचा जनसंपर्क आणि प्रसिद्धी विभाग स्वतंत्रपणे असण्याची देखील गरज आहे. अद्ययावत वेबसाइट आणि त्यावरून सहकारी संस्थांना सर्व प्रकारच्या ऑनलाइन सुविधा असाव्यात, ही देखील एक मागणी या नव्या धोरणाच्या निमित्ताने पुढे आली आहे.

सभासदांचा सक्रिय सहभाग, पारदर्शकता, आधुनिक व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि वित्तीय शिस्त याला महत्त्व देणारे धोरण असावे. निवडणुकांत पारदर्शकता, संचालक मंडळासाठी उत्तरदायित्वाची तरतूद आणि कायदेशीर सुधारणा हे मुद्देदेखील विशेषत्वाने असायला हवेत. महाराष्ट्र ही सहकाराची गंगोत्री आहे, त्यामुळे नवे धोरण अन्य राज्यांना दिशादर्शन करणारे ठरावे. नव्या धोरणामुळे आणि सहकार कायद्यातील प्रस्तावित सुधारणांमुळे सहकार क्षेत्र भ्रष्टाचारमुक्त, सर्वसमावेशक, व्यापक असावे तसेच भविष्यातील आव्हानांना सामोरे जात सहकार चळवळीचे परिवर्तन करणारे ठरावे, हीच अपेक्षा.

**– भालचंद्र कुलकर्णी**

**(लेखक सहकार भारतीचे राष्ट्रीय प्रकाशन प्रमुख आहेत.)**

*****

# सहकार चळवळीमुळे महाराष्ट्र समृद्ध, विकसित झाला – साहेबराव खामकर



**पुणे** – सहकारामुळे ग्रामीण भागात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकास झाला असून जनसामान्यांची प्रगती झाली आहे, असे सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशचे साखर कारखाना प्रकोष्ट प्रमुख साहेबराव खामकर यांनी सांगितले. सहकार भारतीच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

सहकारामुळे महाराष्ट्र समृद्ध झाला असून सहकारातील काही दोष निवारण्याच्या दृष्टीने सहकार भारतीचे जे ब्रीद वाक्य आहे. 'बिना संस्कार, नही सहकार' हे रुजविण्याची अत्यंत गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. रावळगाव साखर कारखान्याचे अध्यक्ष बबनराव गायकवाड यांनी सांगितले, की सहकार क्षेत्रातील सर्व उद्योग हे व्यावसायिक पद्धतीने चावविले पाहिजेत. तसेच विशेषतः साखर उद्योगावरील काही नियंत्रणात सरकारकडून शिथिलता आणली पाहिजे.

प्रारंभी पुणे महानगर साखर कारखाना प्रकोष्ट समन्वयक बाळ भिंगारकर यांनी प्रास्ताविकात सहकार भारतीच्या कार्याचा आढावा घेतला. वाय. जी. पवार यांनी मनोगतामध्ये सहकारामुळे ग्रामीण भागातील तरुणांना रोजगार उपलब्ध होऊन त्यांच्या संसाराला हातभार लागला, असे मत व्यक्त केले. केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्य सरकार नवीन सहकार धोरण आणणार आहे, असे ते म्हणाले.

पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर यांनी शुभेच्छा दिल्या. आबासाहेब शिंगोटे, शहाजीराव बोरुडे, नवदीप सोशल फाउंडेशनचे सचिव प्रताप खामकर प्रा. गहिनीनाथ हुमे, रवींद्र साळुंके आदी उपस्थित होते. पुणे जिल्हा पतसंस्था प्रकोष्ट सहप्रमुख विनोद अष्टुल यांनी आभार मानले.




पान नंबर १६ वरून...

## सहकार चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी...

सामूहिक निर्णय प्रक्रियेतून कार्यकर्ता निर्माण ही प्रक्रिया राबविण्यासाठी प्रदेश, विभाग व जिल्हास्तरावर कार्यकर्ता अभ्यासवर्ग होतात. २५०च्या वर कार्यकर्ते आपापला उद्योग, व्यवसाय सांभाळून प्रवास करतात. महिलांच्या सक्षमीकरणाकडेही विशेष लक्ष दिले जाते. स्वयंसहायता बचत गटाच्या लाखो महिला आज आहेत. केंद्र सरकारमध्ये सहकार क्षेत्राच्या विकासासाठी स्वतंत्र मंत्रालय असावे, सहकार विषयाचा अभ्यास व्हावा; त्यातून सहकार नेतृत्व पुढे यावे, युवकांना सहकाराचे शिक्षण मिळावे, विविध प्रकोष्टांमध्ये येणाऱ्या अडचणी सोडवाव्यात, अशा अनेक मागण्या सहकार भारतीने केल्या होत्या. या मागण्यांची पूर्तता देशाचे विकासपुरुष पंतप्रधान श्री नरेंद्रजी आत्मनिर्भरतेकडे जात मोदी यांनी 'सहकार से समृद्धी' अशी घोषणा करून सहकार भारतीच्या वरील मागण्यांची पूर्तता करण्यासाठी दमदार पाऊल टाकले आहे.

देशातील युवकांनी सहकार क्षेत्राचा अभ्यास करून सहकार चळवळीत सहभागी व्हावे, प्रत्येक गावातील सहकारी संस्थेत कार्यरत व्हावे, आवश्यकता असेल तर नवीन सहकारी संस्था स्थापन करून या संस्थेमार्फत २०० प्रकारचे व्यवसाय करता करता येतात, यात सहभागी होऊन ग्रामविकास प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन सहकार भारती वर्धापन दिनानिमित्त करीत आहे.

**– दिलीप रामू पाटील,**
**राष्ट्रीय मंत्री व मध्य भारत क्षेत्र प्रमुख. सहकार भारती**
**मो.नं. – ८७८८३ ९००३२**

*****

# प्रशिक्षण व संस्कारातून सहकार रुजवणे हे सहकार भारतीचे काम - अर्थतज्ज्ञ डॉ. पी. बी. कुलकर्णी




**शिराळा, सांगली –** प्रशिक्षणातून व संस्कारातून सहकार रुजवणे हे सहकार भारतीचे मुख्य काम आहे, असे अर्थतज्ज्ञ प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी यांनी सांगितले. सहकार भारती स्थापनादिनानिमित्त सहकार भारती शिराळा तालुका मार्फत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सहकार भारती सांगली जिल्ह्याचे अध्यक्ष सुमंत महाजन होते.

स्वागत सुमंत माळी यांनी केले. भारतमाता व सहकार भारती संस्थापक स्व. लक्ष्मणराव इनामदार यांच्या प्रतिमेचे पूजन करून नमन करण्यात आले. तालुका अध्यक्ष डॉ. पंकज पाटील यांनी प्रास्ताविक करून सहकार भारतीच्या व्याप्तीचा आढावा घेतला. पतसंस्थेचे सरव्यवस्थापक तानाजी बामणे यांनी पाहुण्यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.

✼ सहकार क्षेत्राचा अभ्यासक्रम तयार करावा –

अर्थतज्ज्ञ प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांनी सहकार चळवळ आणि सहकार भारतीच्या कामावर प्रकाशझोत टाकला. ते म्हणाले, सन १९७८ साली लक्ष्मणराव इनामदार, आरबीआयचे संचालक सतीश मराठे, अण्णासाहेब गोडबोले इत्यादींनी सहकार भारतीची स्थापना केली आहे. सहकार क्षेत्रात काम कारणारी संघटना असून भारतातील ६०० पेक्षा जास्त जिल्ह्यांत काम करत आहे. लाखो सक्रिय कार्यकर्ते व सभासद आहेत. संस्कार आणि प्रशिक्षण यातून सहकारी कर्मचारी, कार्यकर्ते आणि त्यातून सहकार संस्था सर्वार्थाने सक्षम करणे हाच उद्देश आहे. सहकारासारखे चांगले काही नाही. प्रशिक्षणात बदल होणे गरजेचे आहे. यासाठी देशपातळीवर समिती गठीत होऊन त्यामध्ये सहकारातील तज्ज्ञ व्यक्तींचा सहभाग महत्त्वाचा आहे. समितीतून सहकार अभ्यासक्रम तयार करून तीन वर्षांची पदवीसारखी योजना केली पाहिजे. केंद्र शासनाने गुजरात राज्यात त्रिभुवनदास विद्यापीठ स्थापन केले आहे. त्याप्रमाणे प्रत्येक राज्यात सहकार विद्यापीठ अथवा त्यांचे केंद्र स्थापून सहकार अभ्यासक्रम सुरू केला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

केंद्र शासनाचे सहकाराबाबतचे धोरण, योजना इत्यादी माहिती सांगून ते म्हणाले, केंद्र शासन विकास सोसायट्या सक्षम, सुदृढ होण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्याचा लाभ घेऊन सोसायटीच्या माध्यमातून विविध उद्योग उभे करून शेतकरी, सर्वसामान्य माणूस व ग्रामीण भागाचा कायापालट करण्याची ताकद विकास सोसायट्यांमध्ये आहे. सहकार संस्थामध्ये तुलनेत महिलांची संख्या कमी आहे. त्यात वाढ होऊन महिला सबलीकरण होणे महत्त्वाचे आहे

कार्यक्रमाला संजय पाटील, तुकाराम पाटील, युवराज माईंगडे इत्यादीसह सहकारातील अभ्यासक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचलन माळी यांनी तर आभार तुकाराम खामकर यांनी मानले.




# सहकार भारतीचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

**शिरपूर, धुळे –** शेतकरी बांधव यांनी एकत्र येऊन सन १९४५ मध्ये सहकारी तत्त्वावर पीक संरक्षण सोसायटीची स्थापना केली होती. सोसायटीमध्ये सहकार भारतीचा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्था अध्यक्ष भूपेंद्रसिंह पाटील, सचिव भिकाजी सोनवणे, तसेच कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला. सहकार भारतीचे प्रदेश उपाध्यक्ष दिलीप लोहार, संघटन प्रमुख शशिकांत चौधरी, सहसंघटन प्रमुख शांताराम भिल, जनकल्याण पतसंस्थेचे नीलेश बडगुजर, महात्मा फुले पतसंस्था संचालक युवराज माळी उपस्थित होते.

# सहकार भारतीचे उपक्रम सर्वांना प्रेरणादायी - अमरसिंह देशमुख यांचे मत

**आटपाडी, जिल्हा सांगली –** सहकार भारतीचे उपक्रम सर्वांना प्रेरणादायी असल्याचे मत जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अमरसिंह देशमुख यांनी व्यक्त केले आहे. सहकार भारती स्थापनादिनानिमित्त विद्यानगर मोफत वाचनालय आणि सहकार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श पतसंस्था सचिव पुरस्कार प्रदान सोहळ्यात ते बोलत होते.

येथील सिद्धनाथ सहकारी पतसंस्थेचे सचिव महेश भांडवले आणि सिरतुल पतसंस्थेचे सचिव सतीश साळुंखे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. राज्य सहकारी पतसंस्था महासंघाचे संचालक डॉ. रवींद्र भोसले, सहकार भारती प्रदेश संघटक संजय परमणे, नगराध्यक्ष उत्तम जाधव आदी व्यासपीठावर होते. डॉ. भोसले यांनी सांगितले, की सहकारी पतसंस्थानी बुडीत कर्जदारापासून संस्थेचे संरक्षण करण्यासाठी यादी तयार करावी. त्यामुळे संस्थेला भविष्यात अडचणी येणार नाही. समाजातील सामान्य नागरिकांची पत वाढविण्यात पतसंस्थांनी भूमिका बजवावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

परमणे यांनी सांगितले, की प्रशिक्षण आणि संस्कारातून सहकाराचा विचार रुजवणे, हे सहकार भारतीचे मुख्य उद्दिष्ट आहे. सहकार क्षेत्रातील विविध संस्थांना एकत्र आणून संस्था सक्षमपणे चालाव्यात, यासाठी संघटना प्रयत्नशील आहे. या वेळी माजी सभापती ब्रह्मानंद पडळकर, महेश चांडवले, सतीश साळुंखे यांनी मनोगत व्यक्त केले.

एस. एन. पाटील यांनी प्रास्ताविक, सुनील भिगे यांनी स्वागत केले. प्रा. विजय शिंदे यांनी सूत्रसंचालन आणि दत्तात्रय स्वामी यांनी सहकार गीत आणि पसायदान सादर केले.

# सहकार भारती, पिंपरी-चिंचवड व सारस्वत बँकेच्या वतीने वर्धापनदिन साजरा



**पुणे :–** सहकार भारती पिंपरी-चिंचवड महानगर व सारस्वत सहकारी बँक शाखा, रावेत यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार भारतीचा ४७ वा स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. सहकार भारती प्रदेश गृहनिर्माण प्रकोष्ठ प्रमुख अश्विनी बुलाख प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. रा. स्व. संघ जिल्हा कार्यवाह नरेंद्र पेंडसे, सारस्वत सहकारी बँकेच्या झोनल हेड अक्षया नेरुरकर, शाखाप्रमुख रिधिमा भारद्वाज, प्रदेश सह-कोषाध्यक्ष औदुंबर नाईक व्यासपीठावर होते.

भारतमाता आणि सहकार भारती संस्थापक स्व. लक्ष्मणराव इनामदार यांचे प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सहकार चळवळीचे महत्त्व आणि सहकार भारती सहकार क्षेत्र कसे संस्कारित करत आहे याबाबत माहिती सांगण्यात आली.

बुलाख यांनी सांगितले, की गृहनिर्माण संस्थेची व्यवस्थापकीय समिती ही केवळ औपचारिक यंत्रणा नसून, तीच सोसायटीचा दैनंदिन कारभार, आर्थिक व्यवहार, कायदेशीर निर्णय आणि पुनर्विकास प्रक्रियेचा महत्त्वपूर्ण आधारस्तंभ आहे. 'कोरम'चे महत्त्व, समितीची सदस्य संख्या, डिम्ड कन्व्हेयन्सचे महत्त्व, थकबाकीदार, लेखापरीक्षण, रेकॉर्ड्स, नियमबाह्य गोष्टी, वारस नोंदणी बाबींवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात भोसरी तालुका व पिंपरी-चिंचवड महानगर गृहनिर्माण प्रकोष्ठ कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

अध्यक्ष डी. के. जाधव यांनी स्वागत तर प्रास्ताविक हरिश्चंद्र ढेकणे, सहकार गीत शिरीष लिपारे आणि सूत्रसंचालन डॉ. सचिन हापसे यांनी केले. मिलिंद पाटील यांनी आभार मानले. सहकार भारती कार्यकर्ते व पिंपरी-चिंचवड परिसरातील नागरिक उपस्थित होते. शांती मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

# स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये सहकार भारती स्थापना दिवस उत्साहात साजरा



**चंद्रपूर –** सहकार भारती, चंद्रपूर व स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार भारती स्थापना दिवस व स्वामी विवेकानंद जयंती सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे व स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे अध्यक्ष रमाकांत लुलू, प्रमुख अतिथी म्हणून सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश सचिव विनोद भीमनवार, प्रमुख वक्ते म्हणून आतीश कानापूरवार, अतिथी म्हणून सहकार भारतीचे नागपूर विभाग सहप्रमुख विजय गोटे, सहकार भारतीचे जिल्हा अध्यक्ष सतीश वासमवार, स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे उपाध्यक्ष गुरुदास मंगर मंचावर उपस्थित होते.

भारतमाता, स्वामी विवेकानंद व स्व. लक्ष्मणराव इनामदार यांचे प्रतिमेसमोर दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख अतिथी विनोद भीमनवार यांनी सहकार चळवळीचे महत्त्व विशद केले तर प्रमुख वक्ते आतीश कानापूरवार यांनी स्वामी विवेकानंद यांचा जीवनपट श्रोत्यांसमोर मांडला.

प्रास्ताविक सतीश वासमवार, गीत भारती चुनडे, संचालन प्रगती माढई यांनी तर पुष्पा गोटे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला सहकार भारती कार्यकर्ते व चंद्रपुर परिसरातील गणमान्य नागरिकांची उपस्थिती होती. रसिका घरोटे यांनी सादर केलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## 'सहकार से समृद्धि' संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय स्तरावर कार्यशाळा यशस्वी

**नवी दिल्ली –** 'सहकार से समृद्धि' या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय स्तरावर कार्यशाळा नुकतीच उदयपूर येथे घेण्यात आली. सहकारी संस्थांचे सचिव, राज्य आणि केंद्रशासित प्रदेश वरिष्ठ अधिकारी आणि निबंधक कार्यशाळेत सहभागी झाले होते. सहकार क्षेत्राचे विस्तारीकरण, चळवळीबाबतच्या विचाराला चालना देणे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

सहकारी संस्थांसमोरील अडचणी, काही संस्था मागे पडण्याची कारणे, सहकार क्षेत्रातील यशोगाथा प्रसारित करणे, तसेच आगामी काळात विविध उपक्रमांचे आयोजन यांबाबत देखील विस्ताराने चर्चा करण्यात आली.

देशातील विविध राज्यांत सहकार क्षेत्राचा व्यापक स्वरुपात विस्तार करण्याबरोबरच ग्रामीण भागाची अर्थवाहिनी म्हणून विकसीत करण्यासाठी उपाययोजना यांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली.

# सहकाराचा संवेदनशील शिल्पकार हरपला



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाची बातमी महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रासाठी अत्यंत दुःखद आणि वेदनादायक ठरली. त्यांच्या जाण्याने केवळ एक अनुभवी नेता नव्हे, तर सहकाराला सामाजिक चळवळीचे स्वरूप देणारा संवेदनशील मार्गदर्शक काळाच्या पडद्याआड गेला आहे.

महाराष्ट्राच्या सार्वजनिक आणि राजकीय जीवनात अजित पवार यांचे स्थान अतिशय महत्त्वाचे होते. त्यांचा संपूर्ण प्रवास राज्याच्या सहकार चळवळीशी घट्टपणे जोडलेला होता. सहकारी साखर कारखाने, सहकारी बँकिंग, पतसंस्था, कृषी आधारित विविध कार्यकारी सहकारी संस्था या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांनी आपल्या कार्याची प्रभावी छाप उमटवली.



**विद्याधर अनास्कर**
**मो.नं. ९८५०९७४०७५**

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत १९९१ मध्ये त्यांनी बाबालाल काकडे यांच्या विरोधात विजय मिळवून सहकार क्षेत्रात प्रवेश केला. त्यानंतर दीर्घकाळ त्यांनी या बँकेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. २०२३ पर्यंत ते जिल्हा बँकेचे संचालक म्हणून कार्यरत होते. १९९८ ते २०११ या कालावधीत त्यांनी राज्य सहकारी बँकेचे संचालक म्हणून काम पाहिले. ११ डिसेंबर १९९८ ते १७ ऑक्टोबर १९९९ या कालावधीत त्यांनी राज्य सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाची धुराही समर्थपणे पेलली. त्यांच्या कार्यकाळात जिल्हा बँकेचा व्यवसाय, शाखाविस्तार तसेच ग्रामीण भागातील पतपुरवठा यांमध्ये लक्षणीय वाढ झाली.

पुणे जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांशी त्यांचा निकटचा संबंध होता. साखर महासंघ, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट आणि शासनाच्या माध्यमातून अडचणीत असलेल्या सहकारी साखर कारखान्यांना मदतीचा हात देण्याची भूमिका त्यांनी सातत्याने निभावली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उसाची बिले वेळेवर मिळावीत, यासाठी कारखान्यांची उत्पादनक्षमता वाढवणे, आधुनिकीकरण करणे आणि आर्थिक स्थैर्य निर्माण करणे, यावर त्यांचा नेहमीच ठाम भर राहिला.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ऊस उत्पादन वाढविण्यासाठी नुकतेच त्यांनी शासनाकडून ५०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करून घेतली होती. तसेच, राज्य सहकारी बँकांच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी अत्यंत कमी व्याजदराची कर्ज योजना जाहीर केली होती. साखर कारखानदारांनी आर्थिक शिस्त पाळावी, याबाबत त्यांचा कटाक्ष असे. व्यवसाय आणि राजकारण यांची सरमिसळ न करण्याच्या भूमिकेवर ते कायम ठाम राहिले.

कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी दूध संघ, तसेच विविध सहकारी संस्थांच्या बळकटीकरणासाठी त्यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले. सहकारी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागात उद्योजकता वाढावी, शेतकरी व युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

'सहकार ही केवळ आर्थिक रचना नसून ती एक सामाजिक चळवळ आहे,' हा विचार त्यांच्या भाषणांतून आणि निर्णयांतून वारंवार व्यक्त होत होता. राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून सहकार मजबूत ठेवण्याची भूमिका त्यांनी कायम जपली आणि त्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. एकूणच राज्यातील सहकारी संस्थांची वाढ, ग्रामीण पतपुरवठा आणि शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण यामध्ये अजित पवार यांचे योगदान अत्यंत मोलाचे आणि स्मरणीय राहील.

**– प्रशासक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक**

## सहकार क्षेत्राच्या विकासासाठी, विस्तारासाठी अजित पवार यांनी सतत प्रयत्न केले



**इंदापूर, पुणे जिल्हा –** तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सहकार क्षेत्राच्या विकासासाठी आणि विस्तारासाठी व्यापक स्तरावर प्रयत्न केले. सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेती आणि शेतकऱ्यांना मदत व्हावी, यासाठी त्यांनी सातत्याने भूमिका घेतली, असे माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

शहाजीनगर येथील नीरा भीमा सहकारी साखर कारखाना येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी भावना व्यक्त केल्या कारखान्याच्या अध्यक्षा भाग्यश्री पाटील, उपाध्यक्ष दादा घोगरे तसेच संचालक, पदाधिकारी, नागरिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ते म्हणाले, अजित पवार यांचा सर्व विषयांचा अभ्यास होता. राज्यातील कृषी प्रक्रिया उद्योगाच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने काम केले. साखर उद्योगाला सहकार्य करण्याची त्यांची मानसिकता होती. समाजातील विविध घटकांच्या प्रगतीसाठी काम केले.

त्यांच्या समवेत मंत्रीमंडळात प्रदीर्घ काळ केले. आमच्यामध्ये राजकीय मतभेद त्यावेळी असली तरी मैत्रीचे नाते कायम होते. पुन्हा आम्ही एकत्रपणे काम सुरू केले होते. पण त्यांच्या अचानकपणे जाण्याने राज्याचे भरून न येणारे नुकसान झाले आहे, असे ते म्हणाले.

## सहकार क्षेत्रात स्व. अजित पवार यांचे महत्त्वपूर्ण योगदान

**पुणे –** महाराष्ट्रातील सहकाराच्या प्रगतीसाठी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अमूल्य योगदान दिले आहे. तसेच पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वाटचालीत देखील महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, अशी भावना जिल्हा बँकेचे संचालक सुरेश घुले यांनी व्यक्त केली आहे.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्यालयात स्व. अजित पवार यांचा अस्थिकलश दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. यावेळी शासकीय अधिकारी, बँकेचे संचालक, पदाधिकारी, शेतकरी बांधव आणि नागरिक यांनी अस्थिकलशाचे दर्शन घेऊन भावना व्यक्त केल्या. यावेळी राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे, साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण आयुक्त अनिल कवडे आदी शासकीय अधिकारी उपस्थित होते.

# नवीन सहकार धोरणाविषयी चर्चासत्रात विविध विषयांवर चर्चा



**नांदेड –** केंद्र सरकारने नवीन सहकार धोरण जाहीर केले या पार्श्वभूमीवर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी सीमा अतनुरकर आणि सहकार भारती प्रदेश महामंत्री विवेक जुगादे व्यासपीठावर उपस्थित होते.

सहकार भारतीने सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व घटकांतील कार्यकर्त्यांबरोबर चर्चा करून अतिसूक्ष्म घटकांपर्यंत सहकार कसा जोडता येईल, याची माहिती मिळविणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे, असे जुगादे यांनी सांगितले. प्रमुख अतिथी पतसंस्थेचे अध्यक्ष मारोतराव कवळे गुरुजी, उपनिबंधक शाहूराज हिरे, सहकार भारती प्रदेश सचिव विनोद भीमनवार, नगराध्यक्ष रविकांत देशमुख, जिल्हाध्यक्ष प्रभाकर महाजन, महामंत्री दत्तात्रय उबाळे, संघटन प्रमुख प्रशांत तीर्थे उपस्थित होते.

# पूर्णवादी नागरी सहकारी बँकेचे नूतन वास्तूत स्थलांतर



**परभणी –** पूर्णवादी नागरी सहकारी बँकेच्या शाखेच्या नूतन वास्तू स्थलांतराचे उद्घाटन बँकेचे उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत पारनेरकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्ष डॉ. कालिदास चौधरी, जिल्हा व्यापारी महासंघ अध्यक्ष सूर्यकांत हाके, परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मुख्य कार्यकारी अधिकारी व्यंकटेश कुरूंदकर, श्रीमती ह.भ.प. डॉ. मीरा गरुड उपस्थित होते.

बँकेचे संचालक इंजि. महादेव हुलजुते, डॉ. विवेक पालवणकर, डॉ. सुरेंद्र कलंत्री, डॉ. आनंद वैद्य, विश्वंभर ठिगळे, ज्योतिश्वर भालेराव, सरव्यवस्थापक महेश पारगावकर, वसुली अधिकारी सतीश जाधव, प्रशासन अधिकारी सुधीर जोशी यांच्यासह बँकेचे सभासद, ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कुलकर्णी यांनी तर आभार शाखाधिकारी धनंजय बक्षी यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# बँक मुख्य कार्यकारी अधिकारी परिषदेत विविध विषयांवर चर्चा

**लातूर –** सहकार भारती, लातूर जिल्हा यांच्या पुढाकाराने मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नेतृत्व आणि संवाद कौशल्य या विषयावर नुकतीच परिषद घेण्यात आली. यासाठी लातूर अर्बन को. ऑप बँकेने पुढाकार घेतला.

लातूर जिल्हा, धाराशिव जिल्हा व अंबाजोगाई शहरातील अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. परिषदेत व्यंकटेश कुळकर्णी यांनी कर्ज प्रक्रिया, क्रेडिट अ‍ॅप्रेझल तर बँकिंग तज्ज्ञ गणेश निमकर यांनी ऑनलाइन माध्यमातून मार्च-एंड उपक्रम, प्रोव्हिजनिंग, ऑडिट तयारी व अनुपालन यांवर सविस्तर विवेचन केले. सहकार भारतीचे प्रदेश संघटनमंत्री शरद जाधव यांनी सहकार चळवळीतील मूल्याधारित नेतृत्व, कायदेशीर बदल व संस्थात्मक जबाबदाऱ्या यांवर विचार मांडले.

डॉ. हर्षल दंबळ (विभाग प्रमुख) तसेच प्रदेश सचिव, सहकार भारती सुनील मोतलग उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी स्तरावरील वास्तवाधारित चर्चा, निर्णयक्षम नेतृत्व आणि नियामक सजगता यासाठी अत्यंत उपयुक्त ठरली.

# परभणी जिल्हा पतसंस्था फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड

**परभणी –** जिल्ह्यातील सहकार क्षेत्राला अधिक बळकटी देण्यासाठी आणि पतसंस्थांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी नव्याने गठीत करण्यात आलेल्या 'परभणी जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन'ची पहिली सभा झाली. सुरुवातीला अर्थपूर्तीचे उपाध्यक्ष किशोर देशपांडे यांनी फेडरेशन स्थापनेबाबतची माहिती विशद केली. फेडरेशनच्या अध्यक्षपदी रत्नदीप रमेशचंद्र (सावजी) कळमकर तर उपाध्यक्षपदी अशोक सेलगांवकर व हरिकिशन शर्मा यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

जिल्ह्यातील पतसंस्था चळवळीला दिशा देण्यासाठी फेडरेशनची स्थापना करण्यात आली. निवडीनंतर पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला नवनिर्वाचित अध्यक्ष सावजी म्हणाले, की जिल्ह्यातील सर्व लहान-मोठ्या पतसंस्थांना येणाऱ्या अडचणी सोडवणे आणि त्यांच्यात समन्वय साधणे, हे फेडरेशनचे मुख्य उद्दिष्ट असेल. सर्वांना सोबत घेऊन जिल्ह्याच्या सहकार चळवळीला नवा आयाम देऊ.

ज्येष्ठ पत्रकार विजय जोशी, सर्जेराव लहाने, केदार गजमल, डॉ. प्रकाश अकोशे, किरण चव्हाण, संग्राम सोनी, दिलीप कुलकर्णी, दिलीप देशपांडे, किशोर देशपांडे जिल्ह्यातील विविध पतसंस्थांचे पदाधिकारी, संचालक आणि सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते उपस्थित होते.

# सहकार भारती अमरावती जिल्ह्याच्या वतीने नवीन सहकार धोरणावर चर्चासत्र



**अमरावती –** सहकार भारती अमरावती जिल्ह्याच्या वतीने राज्याच्या नवीन सहकार धोरणासंदर्भात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी अभिनंदन को - ऑप. बँक अध्यक्ष विजयकुमार बोथरा होते.

सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री व राज्य सहकार धोरण उच्चस्तरीय समितीचे सदस्य विवेक जुगादे यांनी सांगितले, की राज्याचे सहकार धोरण हे लोकसहभागातून ठरवावयाचे असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात कार्यरत व्यक्तींकडून सहकार भारतीच्या माध्यमातून सूचना मागवीत आहे. राज्याचे सक्षम सहकार धोरण बनवण्यासाठी सर्वांनी मौलिक सूचना द्याव्यात. विविध सहकारी संस्थांच्या प्रतिनिधीने मौलिक सूचना मांडल्या.

अभिनंदन को-ऑपरेटिव्ह बँकेचे माजी अध्यक्ष सुदर्शन गांग, अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक प्रकाश काळबांडे, अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती बाळासाहेब वानखेडे, अंजनगाव सुर्जी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साबळे, महात्मा फुले को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष लोखंडे व माजी अध्यक्ष राजेंद्र आंडे, जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेचे उपाध्यक्ष प्रदीप चौधरी, अभिनंदन को-ऑपरेटिव्ह बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी देठे, सहकार भारती अमरावती जिल्हाध्यक्ष रामेश्वर विधळे उपस्थित होते.

अमरावती जिल्ह्यातील विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक जिल्हा महामंत्री दामोदर पवार यांनी तर संचालन डॉ. गौरव विधळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अमरावती जिल्हा अध्यक्ष रामेश्वर विधळे, महामंत्री दामोदर पवार, संघटन प्रमुख प्रदीप मोहने, सतीश क्षीरसागर, दिलीप विधळे यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# धरणगाव अर्बन को-ऑप. बँकेच्या नूतन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**धरणगाव –** दि अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या दिनदर्शिका-२०२६ चे प्रकाशन बँकेच्या मुख्य कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात झाले. प्रमुख पाहुणे म्हणून धरणगावचे व्यापारी मुर्तुजाशेठ बोहरी व किशोर येवले यांनी दिनदर्शिकेचे प्रकाशन केले.

प्रास्ताविकात बँकेच्या प्रगतीचा आढावा सादर करण्यात आला. यावेळी बँकेचे पदाधिकारी, संचालक तसेच अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. नूतन वर्षाच्या माहितीपूर्ण दिनदर्शिकेचे सर्वांनी स्वागत करून आनंद व्यक्त केला.

# ‘जाणता राजा’ मल्टिस्टेटच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**यवतमाळ –** ‘जाणता राजा’ मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी मुख्य कार्यालयात कर्मचारी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आणि नवीन वर्षाच्या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला.

यवतमाळ अर्बन बँकेचे अध्यक्ष डॉ. नितीन खर्चे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अमित जयंत भिसे होते. उपाध्यक्ष वंदना नखाते, प्रकाश जाधव, ॲड. प्रवीण हर्षे, संचालक संतोष गावंडे, अजय दंडे, अमोल बोदडे व्यासपीठावर उपस्थित होते.

अध्यक्ष भिसे यांनी डॉ. खर्चे यांचे स्वागत केले. उपाध्यक्ष नखाते यांनी ॲड. प्रवीण हर्षे तर संचालक संतोष गावंडे यांनी प्रकाश जाधव यांचे स्वागत केले. पाहुण्यांच्या हस्ते संस्थेच्या नवीन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. दिवसभर चाललेल्या या सत्रात प्रकाश जाधव आणि ॲड. प्रवीण हर्षे सर यांनी कर्मचाऱ्यांना बँकिंग क्षेत्रातील तांत्रिक व कायदेशीर बाबी आणि प्रभावी ग्राहक सेवा यावर मार्गदर्शन केले. डॉ. खर्चे यांनी सहकार चळवळीतील शिस्तीचे महत्त्व अधोरेखित केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित 'शिवकल्याण राजा' या प्रेरणादायी काव्याचे गायन करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्यालय व्यवस्थापक चिन्मय पंडित,अधिकारी वैभव दुधे तसेच कर्मचारी रवींद्र लहेकर, अंजली शिरभाते सिमरन जैस्वाल, गणेश पहुरकर, पीयूष राऊत, विद्या चहांदे, जयश्री चित्रीव इत्यादींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय संचालक संतोष गावंडे यांनी करून दिला. सूत्रसंचलन मुख्यालय व्यवस्थापक चिन्मय पंडित यांनी तर समारोप सत्रात संस्थेचे संचालक अजय दंडे यांनी सर्व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करून भविष्यातील उद्दिष्टांबाबत प्रोत्साहन दिले. प्रशिक्षण शिबिरासाठी संस्थेचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# दत्त नागरी संस्थेची नवीन योजना सुरू - सागाव शाखेचा वर्धापनदिन साजरा



**शिराळा, सांगली** – सागाव परिसरातील ग्राहकांनी संस्थेवर विश्वास ठेवला आहे. तो विश्वास सार्थ करण्याचे काम संचालक मंडळ करत आहे. या अनुषंगाने येणाऱ्या काही दिवसांत 'दत्त नागरी संस्था आपल्या दारी' ही योजना सुरू होत आहे, अशी घोषणा संस्थेचे संस्थापक प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी यांनी केली. श्री दत्त नागरी सहकारी पत संस्था उरूण ईश्वरपूर शाखा सागावच्या सातव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

उपाध्यक्ष बी. टी. निकम, सागाव शाखा प्रमुख व सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष सुमंत महाजन प्रमुख उपस्थित होते. संस्थेचे शाखाधिकारी दीपक साळवी यांनी स्वागत केले. शिराळा शाखा प्रमुख उद्योजिका सुखदा महाजन यांनी प्रास्ताविक करून संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेतला. संस्थेच्या एकूण ठेवी १२४ कोटी ८५ हजार आहेत तर सागाव शाखेच्या ठेवी ८ कोटी १२ लाख असून ७ कोटी २७ लाख रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. सागाव गावात १२३० घरे आहेत. त्यापैकी ८०० पेक्षा जास्त घरात दत्त नागरी पोहोचली असून येणाऱ्या सहा महिन्यांत १२३० घरात दत्त पतसंस्था पोहोचेल, असा विश्वास व्यक्त केला.

संस्थापक प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी म्हणाले, की सागाव परिसरातील ग्राहकांनी विश्वास ठेवला आहे. हे आर्थिक उलाढालीवरून लक्षात येते. गावात कितीही संस्था आल्यातरी आमची स्पर्धा निकोप आहे. येणाऱ्या सहा महिन्यांत सागाव गावातील प्रत्येक घरात, कुटुंबात श्री दत्तचे व्यवहार असणार आहेत. आपण एक परिवार म्हणून काम करूयात असे आवाहन करून ते म्हणाले, की 'बालक बचत खाते' ही अभिनव योजना सुरू करत आहोत. ही योजना गुजरात राज्यात आपले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सुरू केली आहे. योजना महाराष्ट्रात प्रथम आपण सुरू करत असून बालकांच्या भविष्याचा विचार करून ही योजना सुरू करत आहे. या योजनेची सविस्तर माहिती देऊन ही योजना बालकांसाठी कशी उपयुक्त आहे, हे सांगितले.

कार्यक्रमाला उपसरपंच शशिकांत अण्णा पाटील, सदस्य नंदा पाटील, सुरेश मोकाशी, हंबीर कोरे, किरण पेडणेकर, विनोद दिवे, सुभाष कुंभार, प्रमोद नलवडे, प्रकाश देवकर, महादेव पाटील, सरकारी लेखापरीक्षक साळुंखे उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन कर्मचारी व धनवर्धिनी प्रतिनिधी यांनी केले तर श्वेता जाधव यांनी आभार मानले.

## महिला संचालकांच्या अडचणी सोडविण्यासाठी स्वतंत्र फोरम स्थापन होणार

**पुणे** – सहकार क्षेत्राची विश्वासार्हता आणि सामाजिक प्रतिमा अधिक बळकट करण्यासाठी महिला संचालक यांच्या मोठ्या प्रमाणावर सक्रिय सहभागाची आवश्यकता असल्याचे मत परिषदेत व्यक्त करण्यात आले. राज्य सहकारी बँकेच्या वतीने दोन दिवसीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत महिला संचालकांच्या अडचणी सोडविण्यासाठी स्वतंत्र फोरम स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

परिषदेत राज्यातील नागरी सहकारी बँका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ३५० पेक्षा अधिक महिला संचालक सहभागी झाल्या होत्या. आरबीआयचे सरव्यवस्थापक राजेंदर कुमार, उपसरव्यवस्थापिका पी. आर. राधाकृष्णन, नाबार्ड सरव्यवस्थापिका स्मृती भगत यांनी मार्गदर्शन केले. बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी महिला संचालकांची बँक व्यवस्थापनातील भूमिका यावर विवेचन केले. बँक सरव्यवस्थापिका सायली भोईर, नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सोनाली कदम यांनी आयोजन केले.

## दि अर्बन को-ऑप. बँक धरणगावला 'ग्रीन वर्ल्ड को-प्राइड २०२५' पुरस्कार प्रदान



**पुणे** – जागतिक सहकार वर्षाच्या निमित्ताने सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल दि अर्बन को-ऑप. बँक धरणगावला 'ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन' (पुणे) तर्फे दिला जाणारा ग्रीन वर्ल्ड को-प्राइड २०२५ हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, सुयोग्य आर्थिक नियोजन तसेच पारदर्शक व आदर्श कारभार याबद्दल बँकेची या मानाच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असून त्याबद्दल बँकेला सन्मानित करण्यात आले.

बँकेला पुरस्कार राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर हे या वेळी उपस्थित होते.

पुरस्कार स्वीकारण्यासाठी बँकेच्या वतीने बँकेचे अध्यक्ष प्रवीण कुडे, संचालक सचिन शहा, संजय कोठारी, सचिन बागुल तसेच बँकेचे अधिकारी ज्ञानेश्वर महाजन उपस्थित होते.

पुरस्कारामुळे दि अर्बन को-ऑप. बँक धरणगावच्या कार्याची राज्यस्तरीय पातळीवर दखल घेतली गेली असून, बँकेच्या प्रगतीत हा सन्मान प्रेरणादायी ठरणार आहे.

# सहकारात बँकेचे मूल्यांकन आकडेवारीत नव्हे तर सामाजिक कार्यात देखील व्हावे : सहकार आयुक्त दीपक तावरे



## पुणे पीपल्स को-ऑप. बँकेचे अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण

**पुणे –** सहकारी बँकांचे मूल्यमापन करताना ते केवळ आकडेवारीत करणे योग्य नाही. तर सामाजिक कामात देखील करायला हवे. सुरुवातीला पुणे पीपल्स बँकेची ओळख ही 'रिक्षावाल्यांची बँक' अशी होती. आजही बँकेच्या विविध कार्यांतून सामाजिक दृष्टिकोन स्पष्ट होत आहे, असे मत राज्याचे सहकार आयुक्त व सहकारी संस्था निबंधक दीपक तावरे यांनी व्यक्त केले.

पुणे पीपल्स को-ऑप. बँक अमृतमहोत्सवी वर्षात (७५) पदार्पण करीत असून त्या निमित्ताने येथे आयोजित विशेष कार्यक्रमात अमृत महोत्सवानिमित्त बोधचिन्ह अनावरण आणि पुणे पीपल्स पुरस्कार प्रदान सोहळा पार पडला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. पराग काळकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

रिझर्व बँक ऑफ इंडियाचे सरव्यवस्थापक संजय कुमार, ज्येष्ठ बँकिंग तज्ज्ञ विद्याधर अनास्कर, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष नीलेश ढमढेरे, राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे, सहकारी संस्था पुणेचे विभागीय सहनिबंधक योगिराज सुर्वे यांसह बँकेचे अध्यक्ष श्रीधर गायकवाड, उपाध्यक्ष बिपीनकुमार शहा, व्यवस्थापकीय समिती अध्यक्ष ॲड. सुभाष मोहिते, संचालक सीए जनार्दन रणदिवे, बबनराव भेगडे, सुभाष नडे, डॉ. रमेश सोनवणे, सुभाष गांधी, मिलिंद वाणी, वैशाली छाजेड, निशा करपे, संजीव असवले, डॉ. विश्वनाथ जाधव स्वीकृत तज्ज्ञ संचालिका श्वेता ढमाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी संजय भोंडवे, व्यवस्थापकीय मंडळ सदस्य सीए अजिंक्य रणदिवे, कौस्तुभ भेगडे, उदय जगताप, राजेंद्र गांगर्डे, अरुण डहाके आदी उपस्थित होते.

**※ विविध पुरस्कार प्रदान –**

मनोरुग्ण महिलांसाठी अजोड कार्य करणाऱ्या माउली सेवा प्रतिष्ठान, अहिल्यानगरचे संस्थापक डॉ. राजेंद्र धामणे व डॉ. सुचेता धामणे यांना 'पुणे पीपल्स' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रुपये १ लाख १ हजाराचा धनादेश, पुणेरी पगडी, शाल, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

डॉ. काळकर म्हणाले, जीवनात जे जे मिळेल ते समाजापर्यंत नेण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करायला हवा. डॉ. धामणे दांपत्याने हे प्रत्यक्ष कृतीत उतरवले आहे. बँकेने त्यांना पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. सहकार चळवळीने समाजातील शेवटच्या व्यक्तीचा विकास साधला पाहिजे, हे देखील बँकेने करून दाखवले आहे.

**※ मानवतावादी दृष्टीकोनातून काम करावे –**

डॉ. धामणे म्हणाले, संस्थेचा विश्वस्त असणे म्हणजे 'ते माझे नाही' हे समजून काम करणे होय. सहकार क्षेत्रात ही भावना महत्त्वाची आहे. सामाजिक कार्य हे मानवतावादी दृष्टिकोनातून व्हायला हवे. सामाजिक व्रतस्थतेचा यज्ञ सुरू असून पुरस्कारामुळे याची जबाबदारी अधिक वाढते.

**※ बँकेच्या व्यवसायात मोठी वाढ –**

ही केवळ बँक न राहता समाजसेवेचे व्रत व्हावे, जनसामान्यांचा तो एक विश्वस्त न्यास असावा, या भूमिकेतून बँक सुरू झाली. आज अखंड ७४ वर्षे व्रतस्थपणे खातेदारांच्या सेवेत कार्यरत आहे. संचालक मंडळाच्या नेतृत्वाखाली गेल्या १७ वर्षांत एकूण व्यवसाय ४०० कोटींवरून रु. २७५० कोटी इतकी प्रगती केली आहे. ०% एनपीए, सभासदांना १२ ते १५ टक्के दराने लाभांश ही बँकेची वैशिष्टे आहेत. बँक अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. मार्च २०२६ अखेर किमान ५०० कोटी व्यवसायवाढीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. आगामी २/३ वर्षांत बँकेचा एकूण व्यवसाय रु. ५००० कोटी करण्याचा संकल्प आहे, असे गायकवाड यांनी सांगितले.

**※ विविध घटकांना आधार हीच बँकेची भूमिका –**

व्यवस्थापकीय समिती अध्यक्ष ॲड. मोहिते म्हणाले, छोटे उद्योजक, छोटे व्यापारी व ठेवीदार यांना हक्काचे ठिकाण वाटावे, आधार वाटावा, याकरिता बँकेची स्थापना झाली. संचालक मंडळाच्या प्रयत्नातून अमृतमहोत्सवी वर्षात स्वत:च्या मालकीच्या वास्तूत मुख्य कार्यालय स्थलांतरित होणार आहे. बँकेला डायरेक्ट मेंबरशिप व शेड्युल्ड दर्जा मिळविण्यात आम्ही यशस्वी होऊ. विश्वस्त भावनेने संचालक मंडळाचे काम सुरू असून तळागाळातील माणसासाठी कामाचा संकल्प आहे. सहकारी बँक विश्वासावर चालते, हे जाणून याप्रमाणे बंधने घालून काम करीत आहोत. बँकेचे २७ हजार २७६ सभासद असून लाखाच्या पुढे खातेदार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

पुणे पीपल्स को-ऑप. बँक लि., पुणे अमृतमहोत्सवी वर्षात (७५) पदार्पण करीत असून त्या निमित्ताने गणेश कला क्रीडा रंगमंच येथे आयोजित विशेष कार्यक्रमात अमृत महोत्सवानिमित्त बोधचिन्ह अनावरण आणि पुणे पीपल्स पुरस्कार प्रदान सोहळा पार पडला. मनोरुग्ण महिलांसाठी अजोड कार्य करणाऱ्या माउली सेवा प्रतिष्ठान, अहिल्यानगरचे संस्थापक डॉ. राजेंद्र धामणे व डॉ. सुचेता धामणे यांना पुणे पीपल्स पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# कॉसमॉस बँकेने दिली अंध युवकांना रोजगाराची संधी



**पुणे –** कॉसमॉस सहकारी बँकेने वर्धापनदिन निमित्ताने चार दृष्टिहीन युवकांना नोकरीची संधी उपलब्ध करून दिली आहे. नियुक्तीचे पत्र बँकेचे अध्यक्ष प्रल्हाद कोकरे यांनी देवदान गायकवाड, अभिजित मोरे, पूजा घाडगे आणि प्रज्वल बिरे यांना प्रदान केली.

या चारही युवकांना ट्रेनी ज्युनिअर ऑफिसर म्हणून नियुक्ती पत्र देण्यात आली. सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून बँकेने रोजगार उपलब्ध करून दिला. बँकेचा १२० वा वर्धापन दिन नुकताच साजरा झाला. याबाबत माहिती सांगताना व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष सीए मिलिंद काळे यांनी सांगितले, की दृष्टिहीन युवकांना मुख्य प्रवाहात स्वबळावर उभे राहण्याची संधी बँकेने उपलब्ध करून दिली आहे.

# सांगली अर्बन बँक आयोजित रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**सांगली –** सांगली अर्बन बँकेच्या ९१ व्या वर्धापन दिनानिमित्त बँकेचे सभासद, ग्राहक, खातेदार यांच्यासाठी तसेच बँकेच्या सर्व शाखांमध्ये रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली. यामध्ये एकूण ५८५ व्यक्तींनी रक्तदान केले.

प्रधान कार्यालयामध्ये श्री सत्यनारायण पूजा झाली. गुरुनाथ कोटणीस महाराज, दीपक (नाना) महाराज केळकर उपस्थित होते. स्वागत अध्यक्ष सीए श्रीपाद खिरे यांनी केले. पानसुपारी कार्यक्रमास बँकेचे सभासद, ग्राहक, खातेदार, हितचिंतक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत बँकेचे अध्यक्ष सीए श्रीपाद खिरे, संचालक व व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष गणेश गाडगीळ, उपाध्यक्ष संजय पाटील, संचालक सीए अनंत मानवी, एच. वाय. पाटील संजय धामणगांवकर, सतीश मालू, सीए सागर फडके, रणजित चव्हाण, कालिदास हरिदास, रवींद्र भाकरे, मनोज कोरडे, शैलेंद्र तेलंग, अश्विनी आठवले, स्वाती करंदीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक, सरव्यवस्थापक वासुदेव दिवेकर यांनी केले.

कार्यक्रमास दीपक शिंदे म्हैसाळकर, गुरुनाथ कुलकर्णी, माजी संचालक प्रकाश बिरजे, नगरसेवक उदय बेलवलकर, व्यावसायिक श्रीकांत तारळेकर, प्रफुल्ल तारळेकर, नानासाहेब बोर्गीकर, प्रा.नारायण उंटवाले, नारायण खाडिलकर, किरीटकुमार शहा, राजेंद्र देवल, मुकुंद करंदीकर, माजी नगरसेविका ऊर्मिला बेलवलकर, अण्णासाहेब उपाध्ये, जगदीश कालगांवकर, रामकृष्ण चितळे, चंद्रकांत जाधव, बाळासाहेब खुडे, चंद्रशेखर कुलकर्णी, मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शुरन्सचे निखिल खोत, एन. जे. इंडिया म्युच्युअल फंडचे विभागीय व्यवस्थापक श्रीकांत गबाळे, एचडीएफसी लाइफचे जयेश माने, इंडसइंड निप्पोनचे विभागीय व्यवस्थापक केदार शहा, संजय कोटणीस, बँकेचे माजी कर्मचारी संजीव पुराणिक, अशोक तिल्याळकर, सुमंत जोशी, अनिल बिरजे तसेच बँकेचे उपसरव्यवस्थापक आनंद एकबोटे, किरण गुमाजे, सहायक सरव्यवस्थापक सचिन कुलकर्णी आदि उपस्थित होते.

## फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची कार्यशाळा यशस्वी

**कोल्हापूर –** फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वतीने एकदिवसीय कार्यशाळा येथे आयोजित करण्यात आली होती.

श्रीमती मोनिका खन्ना (जॉइंट रजिस्टर सहकार मंत्रालय, भारत सरकार), डॉ. महेश कदम (विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था), रवींद्र पाटील (सहनिबंधक, सहकारी संस्था), डॉ. संजय होसमट (उपाध्यक्ष, कर्नाटक स्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी) यांच्या उपस्थितीमध्ये ही कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट को -ऑप. क्रेडिटचे संस्थापक अध्यक्ष सुरेश वाबळे होते.

फेडरेशनचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. व्ही. एस. अंकल कोटेपाटील, संचालक विठ्ठलराव वाडगे, जितेंद्र जैन, मारुती कंठेवाड, राहुल महाडिक, जयसिंह पंडित, व्यंकटराव गुंड, सुकुमार पाटील, नारायण खांडेकर, समीर सराफ, मोसिन शेख, कायदेशीर सल्लागार ॲड एस. एस. गडगे याच्यासह १५० पेक्षा जास्त प्रतिनिधी सहभागी झाले. तज्ज्ञ व्याख्याते मोहन किर्णिगे सर, मोसिन शेख, मंगेश देहेडकर यांनी मार्गदर्शन केले.

## इंडियन सोसायटी फॉर स्टडीज इन को-ऑपरेशन संस्था सदस्यांची नियुक्ती

**पुणे –** इंडियन सोसायटी फॉर स्टडीज इन को- ऑपरेशन संस्था सदस्यपदी संस्थेचे अध्यक्ष जी. एच. अमिन यांची निवड करण्यात आली. संस्थेची ४२ वी नियामक मंडळाची सभा नुकतीच झाली. त्यामध्ये विविध नियुक्त्या करण्यात आल्या. संस्थेचे आजीव सदस्य म्हणून डॉ. ए. पी. कन्सल यांची निवड करण्यात आली.

संस्था सदस्य म्हणून नाबार्डचे अध्यक्ष डॉ. के. व्ही. शाजि, वॅमनिकॉम संचालक डॉ. एस. के. मोहंती, सुभाष मोहिते आणि संस्थेचे आजीव सदस्य म्हणून डॉ. सी. पिचाई, ए. आर. प्रसन्नकुमार, प्रा. एच. एस. शैलेन्द्र, एस. बी. पाटील, डॉ. रूपा शहा, डॉ. अनिल कारंजकर, आनंद यादव, डॉ. एस. त्रही, आकिलनांदेश्वरी, आशिष सोनावणे, डॉ. देब प्रिया, अभिनवकुमार तिवारी, डॉ. सुनील सिन्हा यांचा समावेश आहे.

याखेरीज कायमस्वरूपी निमंत्रित सदस्य म्हणून डॉ. एम. एम. तापकीर, सावित्री सिंग, डॉ. एस. ओ. जुनारे, डी. एम. रासकर, डॉ. ए. आर. श्रीनाथ यांचा समावेश आहे.

# जुगलकिशोर पुंगलिया यांना 'सहकार' पुरस्कार प्रदान

**पुणे –** सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महेश सहकारी बँक संस्थापक अध्यक्ष आणि तिरुपती सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष जुगलकिशोर पुंगलिया यांना सहकार पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. या वेळी डॉ. संजय उपाध्ये, डॉ. भूषण पटवर्धन जाधवर ग्रुपचे प्राचार्य सुधाकर जाधवर उपस्थित होते. यावेळी सहकार क्षेत्रातील अभ्यासक व तज्ज्ञ उपस्थित होते.

# पत्रकार संघाच्या कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल जिल्हाध्यक्ष महाजन सन्मानित

**शिराळा, सांगली –** सांगली जिल्हा सहकार भारती (ग्रामीण)चे जिल्हाध्यक्ष सुमंत महाजन यांची महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या (शाखा शिराळा तालुका) कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल वाळवा तालुका सहकार भारतीमार्फत सत्कार करण्यात आला. अध्यक्षपदी श्री दत्त नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत चव्हाण होते.



सहकार भारती स्थापनादिन व सत्कार समारंभ कार्यक्रम झाला. स्वागत व प्रास्ताविक वाळवा सहकार भारतीचे कार्यालय प्रमुख संजय विभुते यांनी आढावा घेतला. तालुका संघटक बजरंग कदम यांनी स्थापनादिनाचे औचित्य साधून सहकार भारतीची वाढती व्याप्ती स्पष्ट केली. ते म्हणाले, की देशातील ६०० पेक्षा जास्त जिल्ह्यांत सहकार भारतीचे काम पसरले असून देशातील सर्व सहकारी संस्थांत काम करणारी एकमेव संघटना आहे. जिल्हाध्यक्ष सुमंत महाजन यांनी दोन नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीची घोषणा केली.

वाळवा तालुक्यात सहकार क्षेत्रात दीर्घकाळ काम करणारे दत्त नागरीचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत चव्हाण, प्रा. बी. ए. पाटील तसेच नव्याने नियुक्त झालेले तालुका उपाध्यक्ष अर्जुन धोत्रे (बनेवाडी), तालुका सह. संघटन प्रमुख जयकराव निकम (तुजारपूर) यांचा सत्कार सुमंत महाजन यांच्या हस्ते करण्यात आला. जिल्हाध्यक्ष सुमंत महाजन यांची पत्रकार संघाच्या कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तालुका अध्यक्ष पांडुरंग वाघमोडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सहकार भारती व १०४ माय एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने पापड महोत्सव होणार असून याची सविस्तर माहिती जिल्ह्याचे महिला प्रमुख सारिका मुळे व जिल्हा संघटक संग्राम कुलकर्णी यांनी दिली. सत्काराला उत्तर देताना प्रा. डॉ. चव्हाण म्हणाले, जिल्हाध्यक्ष सर्व क्षेत्रांत चांगले काम करतात, हे जिल्हा जाणतो. ते जिल्हाध्यक्ष झाल्यापासून सहकारी संस्थांमध्ये विविध कार्यक्रमांचा धडाका लावला आहे. पत्रकार म्हणून काम करताना लेखणीच्या माध्यमातून न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. सहकार भारती व श्री दत्त नागरी पतसंस्था एकमेकांच्या हातात घालून सहकार क्षेत्रात उठावदार कार्य करू या.

सुमंत महाजन, प्रा. बी. ए. पाटील, अर्जुन धोत्रे, जयकरराव निकम यांनी मनोगत केले. सारिका मुळे, संग्राम कुलकर्णी, डॉ. शिवाजी जाधव, अशोक पाटील, धनंजय पाटील, राजेंद्र देशमुख, अक्षय पिसे, संतोष माने, 'दत्त'चे प्रदीप ताटे इत्यादी उपस्थित होते. सूत्रसंचालन बजरंग कदम केले तर आभार 'दत्त'चे कार्यकारी संचालक महेश कबाडे यांनी मानले.

## स्वमालकीच्या जागेत महेश सहकारी बँक इचलकरंजी शाखेचे स्थलांतर

**पुणे –** येथील महेश सहकारी बँकेच्या इचलकरंजी शाखेचे स्थलांतर स्वमालकीच्या जागेमध्ये नुकतेच करण्यात आले आहे. सन २०१४ पासून ही शाखा कार्यरत आहे. आमदार राहुल आवाडे यांच्या हस्ते नूतन शाखेचे उद्घाटन करण्यात आले.

राज्य नागरी सहकारी बँक महासंघ उपाध्यक्षा वैशाली आवाडे, नगरसेवक अनिल डाळ्या बँक अध्यक्ष जुगलकिशोर पुंगलिया, संचालक गोपाल राठी, गणेश मुंदडा, कैलाश झंवर, गोपाल जाजू, मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद गावसाने, सरव्यवस्थापक राजशेखर यलशेट्टी उपस्थित होते. बँकेच्या राज्यभरात १६ शाखा कार्यरत असून ९५५.९६ कोटी ठेवी, ६८५.८५ कोटींची कर्ज, १७३.७३ कोटींचे भांडवल आणि स्वनिधी आहे. निव्वळ एनपीए प्रमाण शून्य टक्के आहे, अशी माहिती सांगण्यात आली.

यावेळी इचलकरंजी सहकारी बँकेचे संचालक, पदाधिकारी, हितचिंतक, खातेदार, अधिकारी उपस्थित होते.

## भ्रमंती मनाला सुखद अनुभव देणारी - डॉ. राधा मंगेशकर

**पुणे –** समृद्ध संस्कृती, ऐतिहासिक वारसा आणि निसर्गनिर्मित अद्‌भुत ठिकाणी फिरण्याचा अनुभव मनाला सुखदायी असतो. प्रवासातील अनुभव आत्मविश्वास, सहनशीलतेला चालना देतात. त्यामुळे पर्यटन अधिक आनंददायी होते, असे मत गायिका व सोलो ट्रॅव्हलर डॉ. राधा मंगेशकर यांनी व्यक्त केले.

भारतीय पर्यटन विकास सहकारी संस्थेच्या वतीने आयोजित गेट सेट गो हॉलिडेज व सचिन इंटरनॅशनल प्रस्तुत तीन दिवसीय सहाव्या पुणे पर्यटन महोत्सवाचे उद्घाटन झाले. गायिका मनीषा निश्चल, संस्थेचे अध्यक्ष प्रवीण घोरपडे, सचिव प्रथमेश कुलकर्णी, चंदन पठारे, अमित कुलकर्णी, निरंजन कुलकर्णी, हेमंत जानी, सजेश पिल्ले, सतपाल सिंग, सुयोग सकपाळ, शेखर ढमाले, अमोद ब्रह्मे, आशिष हिंगमिरे, संतोष माने, हर्षद खोंडे व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ. मंगेशकर म्हणाल्या, जेव्हा एकटीने फिरायला सुरुवात केली, तेव्हा ते आवडू लागले. त्यामुळे निर्णय घेण्याची क्षमता वाढली. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भय पूर्णपणे नष्ट झाले. आत्मविश्वास वाढला. जेव्हा तुम्ही एखादे सुंदर ठिकाण, वास्तू किंवा तेथील कलाकृती पाहता, तेव्हा तुमचे स्वतःचे खरे विचार तुम्हाला कळतात. त्या भावनांमध्ये कोणाचेही विचार लादलेले नसतात, असेही मंगेशकर यांनी नमूद केले. प्रथमेश कुलकर्णी यांनी प्रास्ताविक, सारंग भिडे यांनी सूत्रसंचालन व संतोष माने यांनी आभार मानले.

## कॉसमॉस सहकारी बँकेचा १२० वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

**पुणे –** कॉसमॉस सहकारी बँकेचा १२० वा वर्धापनदिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. सीए दिलीप सातभाई, बँकेचे अध्यक्ष प्रल्हाद कोकरे, सहव्यवस्थापकीय संचालिका आरती ढोले, तसेच संचालक, खातेदार, व्यवस्थापन मंडळ, अध्यक्ष सीए मिलिंद काळे आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

विशेष उल्लेखनीय काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार या वेळी करण्यात आला. पाहुणे सातभाई यांनी आर्थिक जागरूकता आणि गुंतवणूक यावर सविस्तर विवेचन केले. बँकेच्या व्यवस्थापकीय संचालिका अपेक्षिता ठिपसे यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले. बँकेने ४० हजार कोटींचा प्रगतीचा टप्पा पूर्ण केला असल्याचे जाहीर केले. संचालिका ढोले यांनी आभार तर प्राची घोटकर यांनी सूत्रसंचालन केले.

# बाळासाहेब पांडे नागरी सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी जयंत पांडे



**यवतमाळ –** येथील बाळासाहेब पांडे नागरी सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी जयंत पांडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे तसेच संचालक म्हणून प्रदीप वानखडे यांची निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या संचालक मंडळाची सभा नुकतीच झाली त्यामध्ये वरील नियुक्ती करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अजित डेहणकर यांनी काम पाहिले. संस्थेचे उपाध्यक्ष सुभाष जतकर आणि संचालक या वेळी उपस्थित होते.

## स्व. चिंतामणी पांडे जयंतीनिमित्त मातोश्री वृद्धाश्रमात चादरी वाटप

**यवतमाळ –** कै. बाळासाहेब पांडे नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. चिंतामणी पांडे यांच्या जयंतीनिमित्त मातोश्री वृद्धाश्रम येथे चादरी वाटप करून सामाजिक मायेची उबदार बांधिलकी जोपासण्यात आली.

चिंतामणी पांडे यांचे गतवर्षी निधन झाले. त्यांच्या जयंतीनिमित्त मातोश्री वृद्धाश्रम येथे 'विनम्र अभिवादन' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. संचालक कवडुजी नगराळे यांनी स्व. पांडे यांच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगितले. कै. बाळासाहेब पांडे नागरी सहकारी पतसंस्था शहरात अग्रगण्य संस्था आहे. डिजिटल स्पर्धेत अनेक गोष्टी साध्य करायच्या आहेत. यासाठी एकत्रित कार्य करावे लागेल. यापुढेही संचालक, सभासद, अधिकारी, कर्मचारी हेच ध्येय ठेवून कार्य सुरू ठेवतील, असा निर्धार करण्यात आला.

सूत्रसंचालन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल बोदडे यांनी केले. उपाध्यक्ष अतकर, संचालक राजेश निशाणे, अशोक ठोकळ, प्रदीप वानखडे, गिरिधर बैसानी, बादल राठोड, राजेश वैद्यवार, कैलास शिंदे, संजय इंगोले तसेच संस्थेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


## भंडारा जिल्हा कार्यकारिणी बैठकीत आगामी कार्यक्रमाच्या नियोजनावर चर्चा

**भंडारा –** आगामी काळात घेण्यात येणारे अनेकविध उपक्रम आणि कार्यक्रम याचे नियोजन करण्यासाठी भंडारा सहकार भारती जिल्हा कार्यकारिणीची बैठक नुकतीच झाली. प्रदेश सचिव विनोद भीमनवार, ग्रामीण प्रकोष्ट प्रमुख अनिल मेंढे, जिल्हाध्यक्ष शिवराम गिरेपुंजे तसेच पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. जिल्ह्याच्या सर्व तालुक्यांमध्ये कार्यकारिणी तयार करणे, कार्यक्रम तयार करणे, त्याचे नियोजन यादृष्टीने चर्चा करण्यात आली. तसेच सदस्य नोंदणी अभियान राबविणे आदी उपक्रम करण्यात येणार आहेत. या वेळी जिल्हा संघटक सुभाष आजबले, महामंत्री मनीष कापगते आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## यवतमाळ अर्बन बँकेत प्रजासत्ताकदिन साजरा

**यवतमाळ –** यवतमाळ अर्बन बँकेच्या वतीने प्रजासत्ताकदिन उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. बँकेचे अध्यक्ष डॉ. नितीन खर्चे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. बँक कर्मचारी संघटना आणि संस्कार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कर्मचारी संघटना उपाध्यक्ष आनंद पांडे यांनी प्रास्ताविक तर रमा कुंटे यांनी वैयक्तिक गीत सादर केले. संस्कृती तिवारी यांनी आभार आणि कविता राठोड यांनी सूत्रसंचालन केले.


## उद्योजिका संगीता पावगी यांचे निधन



**पालघर –** सहकार भारतीचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि सहकार भारती प्रशिक्षण संस्थेचे संचालक सदानंद पावगी यांच्या पत्नी आणि उद्योजिका संगीता पावगी यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या मागे पती, दोन मुले, दोन सुना आणि नाती असा परिवार आहे. सन १९९२ मध्ये सौकुल एंटरप्राईज हा सुरक्षा उपकरणे पुरवठ्याचा स्वत:चा व्यवसाय सुरू केला. आणि अल्पावधीतच त्यांनी तयार केलेल्या उत्पादनांना मागणी वाढत राहिली. विविध सामाजिक संस्थामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता.

यशस्वी महिला उद्योजिका म्हणून त्यांची ओळख होती. विशेषत: महालक्ष्मी मंडळाच्या माध्यमातून गेली ३८ वर्षे त्यांनी महालक्ष्मी मुखवटा आणि पूजनाची परंपरा जपली होती. त्यांच्या निधनाने सामाजिक राजकीय आणि उद्योग क्षेत्रामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

## नागपूर नागरिक बँकेचे माजी अध्यक्ष रमेश मंत्री यांचे निधन



**नागपूर –** नागपूर नागरिक सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष तसेच उद्योजक भारतीय जनता पक्षाचे नेते रमेश मंत्री यांचे नुकतेच निधन झाले. ते ७३ वर्षांचे होते. त्यांच्या मागे मुलगा तसेच बंधू असा परिवार आहे. बँकेचा शाखा विस्तार आणि व्यवसाय वाढ यासाठी त्यांनी अनेक वर्ष काम केले. तसेच सलग १५ वर्ष त्यांनी बँकेचे अध्यक्षपद सांभाळले. बँकेला शेड्यूल्ड बँकेचा दर्जा आणि मल्टीस्टेट सहकारी बँक म्हणून नावारूपाला आणली. याखेरीज त्यांनी काही वर्ष बँकेचे संचालकपद सांभाळले. बँकेची प्रथम एटीएम सेवा सुरू करण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. तसेच नॅशनल फेडरेशन ऑफ को –ऑपरेटिव्ह बँक अँड सोसायटीचे संचालकपद त्यांनी भूषविले. सहकार भारतीच्या व्यासपीठावरून सहकारी बँकिंग विषयक अनेक प्रश्नांवर त्या त्या वेळी भूमिका स्पष्ट केली आहे. याबरोबर उद्योग क्षेत्रात त्यांनी काम केले आहे. त्यांनी एनव्हीसीसीचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले.

# राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या उपस्थितीत नागरी बँक कार्यशाळा संपन्न



राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते सहकार भारतीच्या नागरी सहकारी बँकांच्या दैनंदिनीचे प्रकाशन करण्यात आले.




**छत्रपती संभाजी नगर –** सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेच्या वतीने मराठवाड्यातील नागरी सहकारी बँकांची एक दिवसीय कार्यशाळा येथे आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेसाठी ३२ बँकांचे ८० अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक आणि पदाधिकारी उपस्थित होते.

राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते नागरी बँकांच्या सन २०२६ च्या दैनंदिनीचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी मराठवाडा अर्बन बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष सत्यनारायण लोहिया उपस्थित होते. रिझर्व्ह बँकेच्या नागपूर विभागाचे संचालक सचिन शेंडे यांचे मार्गदर्शन झाले. याशिवाय सीए उदय कर्वे डॉ. अमित आंद्रे, सीए जयंत जोशी यांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले.

सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेचे अध्यक्ष संजय बिर्ला, उपाध्यक्ष शरद जाधव, संचालक उदय पेंडसे, संध्या कुलकर्णी, सहकार सुगंध मासिकाचे संपादक भालचंद्र कुलकर्णी, प्रशिक्षण प्रमुख व्यंकटेश कुलकर्णी, सुनिल मोतलग यांच्या प्रयत्नाने कार्यशाळा यशस्वी झाली.

यावेळी नागरी बँकांना रिझर्व बँकेकडून असलेल्या अपेक्षा व अडचणी यांची सविस्तर चर्चा या कार्यशाळेत करण्यात आली. याबाबत रिझर्व बँक सकारात्मक पावले उचलत असल्याचे संचालक शेंडे साहेबांनी स्पष्ट केले.



**नागरी बँकांसाठी कार्यशाळा**

**१६ फेब्रुवारी – कोल्हापूर**

सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांसाठी १६ फेब्रुवारी रोजी कोल्हापूर येथील हॉटेल फर्न, शाहू मार्केटयार्डसमोर, कोल्हापूर येथे कार्यशाळा होणार असून यासाठी बँकांचे संचालक व पदाधिकारी अपेक्षित आहेत. कार्यशाळेचे शुल्क व अन्य माहितीसाठी सौ. अश्विनी आठवले यांना ९५५२११०९०९ या नंबरवर संपर्क साधावा.

**२६ फेब्रुवारी – नागपूर**

विदर्भातीलनागरी सहकारी बँकांसाठी २६ फेब्रुवारी रोजी नागपूर येथील हॉटेल सेंटर पॉईंट, रामदास पेठ, नागपूर येथे कार्यशाळा होणार असून यासाठी बँकांचे संचालक व पदाधिकारी अपेक्षित आहेत. कार्यशाळेचे शुल्क व अन्य माहितीसाठी रवींद्र चिंचवडकर यांना ९४२२१०९२३८ या नंबरवर संपर्क साधावा.

# योगिराज पतसंस्थेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

पुणे – दहावी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक मुरकुटे यांच्या हस्ते करण्यात आला. येथील योगिराज सहकारी पतसंस्थेच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

श्रीराम समर्थ पतसंस्थेचे संचालक सुधाकर धनकुडे यांच्या हस्ते शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर तापकीर म्हणाले की, ११ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. उपाध्यक्ष राजेश विधाते यांनी मनोगत आणि मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गंगणे यांनी आभार मानले.

## पुढील अंक महिला विशेषांक

**सहकार सुगंध मासिकाचा मार्च महिन्याचा अंक जागतिक महिला विशेष दिन या विषयावर आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या महिला वर्गाची माहिती वाचकांना व्हावी, यासाठी विशेष मुलाखती अथवा लेख सहकार सुगंध मासिक कार्यालयाकडे २० फेब्रुवारीपर्यंत पाठविण्यात यावे. – संपादक**

# कर्ज वितरणाच्या नविन संधी व पतसंस्थानी बदल स्विकारायला हवेत



सहकारी पतसंस्था चळवळीने काळानुसार बदलल्यास सर्वच क्षेत्रात संधी आहेत. समस्यांचे रुपांतरण संधीत करणे आवश्यक आहे.

**※ कर्ज वितरणाबाबत –**

सोने तारण, गोदाम माल तारण, FD-OD या सुरक्षित कर्जाला ही मर्यादा आहेत. गृह कर्ज, व्यवसायिक कर्ज, व्यवसाय वाढ यापलीकडे आपण जात नाही. परंतु बदलत्या काळानुसार नवीन कर्जाची क्षेत्र आपण टुर्स अँड टुरिझम, नॉलेज बेस स्टार्टअप, ग्रामीण व शेतीशी निगडीत उद्योग, टेक्नॉलॉजी बेस उद्योग, एज्युकेशनल लोन, आरोग्यसंरक्षक हेल्थ इन्शुरन्ससाठी कर्ज – या कर्जावर लक्ष दिल्यास तरुण कर्जदार मिळतील. सोबतच आपल्या भागातील उद्योग निर्मितीला मदत होईल.

**※ बदल स्विकारावा लागेल –**

थकबाकीदार व थकबाकी हा सर्वत्र भेडसावणारा प्रश्न ही यातून कमी होईल. कारण यापूर्वी केलेली कर्ज वितरणे उत्पादकता वाढीसाठी दिली नाही, तर ग्राहकाची गरज, संबध पाहून अनुत्पादक कामासाठी वरील कर्जे कारणे टाकून ती दिल्यामुळे थकीत जाऊन अडचणीत आलो आहोत. कर्ज वितरणातील बदल स्वीकारुन महिला, नवउद्योजक यांना उद्योग उभारणीसाठी कर्जे दिली व टुर्स अँड टुरिझम या क्षेत्रात काम करणाऱ्यांबरोबर संर्पक केल्यास लहान लहान कर्जे मिळतील. एज्युकेशनल कर्जामुळे सभासदांची मुले उच्चशिक्षीत झाली तर व्यवसाय वाढण्यास मदत होणार आहे.

**※ उद्योग निमिर्तीला चालना दिल्यास व्यवसाय वाढ –**

आपल्या भागातील तरुण महिला व पुरुषांना उद्योग सुरु करण्यास प्रोत्साहित करुन त्यांना उद्योगासाठी ट्रेनिंग, ब्रँडिंग, मार्केटिंग, टेक्नॉलॉजी, फंडिंग यांसाठी संस्थेत मार्गदर्शन केंद्रे उभारुन त्यांना उद्योजक म्हणून घडवल्यास आपोआप व्यवसाय वाढ होईल. कारण उद्योग निमिर्तीतून आपल्या भागात पैसा येईल व ठेवीदारही वाढतील.



**वासुदेव काळे**
**९८२२८ ३७०२५**

**※ लोकल टु होकल संकल्पना –**

आपल्या भागातील गरजा पुरवणारी यंत्रणा भागात उभी करण्यास तरुण महिला पुरुषांना प्रोत्साहित करुन कर्ज वितरण केले तर सामाजिक दायित्त्वाबरोबरच कर्ज सुरक्षित होतील. कारण नवीन पिढीला सिबील कळते, बँक खाते सिल झाल्याचे तोटे कळतात, त्याचे परिणाम समजतात. याहीपेक्षा त्यांना भविष्यात मोठा काळ काम करायचे असल्यामुळे ते सजगतेने कर्जफेड करतील.

**※ वितरणातील विलंब व अपुरे वितरण –**

दिलेली कर्ज थकण्याचे सर्वात मोठे कारण हे आहे हे लक्षात येते का?

काळानुसार बदल न स्विकारता रेंगाळत, विलंबाने केलेले कर्ज वितरण हे थकबाकीकडे वळते. तसेच त्यांच्या गरजेपेक्षा कमी कर्ज वितरण केल्यास कर्जदार उर्वरीत रकमेची गरज भागवण्यासाठी दुसरे दार ठोठावतो. त्यामुळे कर्ज भरताना टाळाटाळ अथवा विलंब होतो. याचा विचार करुन कर्ज वितरण प्रणाली सोपी, सुटसुटीत व एक खिडकी करुन कर्जदारी योग्य ती शहानिशा डिजीटल माध्यमातून त्वरीत करुन लवकरात लवकर व त्याची गरज ओळखून योग्य ते सक्षम तारण घेवून कर्जदाराला वितरण केल्यास तो आपला हप्ता रेग्युलर भरेल.

**※ वसुलीची सक्षम यंत्रणा उभारा –**

कर्ज वितरणानंतर पहिल्या हप्त्यापासून फॉलअप, कॉलिंग, प्रत्यक्ष भेट यात सातत्य ठेवल्यास कर्ज थकित जाण्याचे प्रमाण अत्यल्प होते. यासाठी स्वतंत्र यंत्रणा पतसंस्थेत कार्यान्वित करायला हवी. तसेच देशाचे व राज्याचे व्हिजन विकसित भारत, विकसित महाराष्ट्र २०४७ आहे, याकडे लक्ष देवून अभ्यासपूर्वक लोन लॅन्डिंग क्षेत्र शोधा व वितरण करा. आजही समस्यात संधी आहेत, फक्त दृष्टिकोन बदलावा लागेल. यासाठी बिझनेस डेव्हलपमेंट अधिकारी तोही तरुण घ्यायला हवा. सहकारी अधिकारी कार्यकुशल व कार्यमग्न असतात. व्यवसाय वाढीसाठी नवीन व तरुण अधिकारी घेवून योग्य प्रशिक्षण द्या, वितरणा बरोबरच व्यवसायही वाढेल याची खात्री आहे.


**– वासुदेव काळे**

**अध्यक्ष – श्री सिद्धीविनायक पतसंस्था परिवार, श्रीरामपूर**

**संचालक – महाराष्ट्र राज्य सह. पतसंस्था फेडरेशन.**

**अध्यक्ष–सहकार भारती, उत्तर नगर जिल्हा**

**मो. नं. – ९८२२८ ३७०२५**


****


व्यापारी मित्र अमृतपर्व 25 K वर्गणीदार

**कर व व्यापारी विषयक कायद्यातील क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत माहितीसह आर्थिक गुंतवणूक, आरोग्याविषयी माहिती देणारे व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ**

स्थापना १९५०

# व्यापारी मित्र

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

**संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा**

Payment Getway link

**भारतात कुठेही निश्चित अंक मिळण्यासाठी मॅगझीन पोस्टिंगसह वर्गणीदर**

| ३ वर्षांसाठी | २ वर्षांसाठी | १ वर्षांसाठी |
|---|---|---|
| २९०० | २००० | १०५० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४

फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290

E-mail : sampadak@vyaparimitra.com

# आदर्श पतसंस्थेने एक हजार कोटी एकत्रित व्यवसायाचा टप्पा ओलांडला




**रायगड** – आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेने एक हजार कोटी रुपयांचा एकत्रित व्यवसायाचा टप्पा ओलांडला आहे. एक हजार कोटी रुपयांचा पल्ला गाठणारी आदर्श ही रायगड जिल्ह्यातील पहिली पतसंस्था ठरली आहे, अशी माहिती आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश पाटील व अध्यक्ष अभिजित पाटील यांनी सांगितली.

आदर्श पतसंस्था बँकिंग क्षेत्रात आता अर्बन बँकांप्रमाणे काम करत आहे, असे नमूद करून ते म्हणाले, पतसंस्थेची स्थापना १९९६ मध्ये झाली. अवघ्या २७ वर्षांमध्ये रायगड जिल्ह्यात १००३ कोटी रुपयांचा व्यवसाय पूर्ण केला आहे. ठेवी रु. ५५८ कोटींच्या असून रु. ४४५ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. सन २४-२५ या आर्थिक वर्षापर्यंत पतसंस्थेने रु. ७५२ कोटी ७७ लाख रुपयांचा एकत्रित व्यवसाय केला होता. मार्च २६ पर्यंत रु. १००० कोटी रुपयांचा एकत्रित व्यवसाय करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. दहा महिन्यांत २५० कोटी रुपयांचा एकत्रित व्यवसाय केला. आज 'आदर्श'चा एकत्रित व्यवसाय १००३ कोटी रुपयांचा झाला आहे.

'आदर्श'चे कार्यक्षेत्र राज्यस्तरीय आहे. रायगडसह रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, पुणे, मुंबई या जिल्हांमध्ये कार्यक्षेत्र आहे. पतसंस्थेच्या एकूण २२ शाखा आहेत. एक स्वतंत्र गोल्ड शाखा सुरू केली. दोन शाखा पुण्यात आहेत. पुण्यातील एक पतसंस्थेचे विलीनीकरण केले. सर्व शाखा नफ्यात आहेत. भविष्यात राज्यातील पहिल्या पाच पतसंस्थांमध्ये 'आदर्श'ला नेण्याचे आमचे उद्दिष्ट आहे, असे संस्थापक सुरेश पाटील यांनी सांगितले.

मार्च २०२६ पर्यंत 'आदर्श'चा ग्रॉस एनपीए ०१ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्याचा प्रयत्न आहे, असे 'आदर्श'चे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी सांगितले. सर्व शाखांमधील कर्मचाऱ्यांनी प्रामणिकपणे काम केले. ठेवी जमा केल्या, चांगली कर्ज वसुली केली. सभासदांना चांगली सेवा दिली. ग्राहकांचा विश्वास संपादित केला. त्यामुळे पतसंस्थांबाबत अविश्वासाचे वातावरण असताना आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेवर मात्र ग्राहकांचा विश्वास वाढतच आहे. 'आदर्श'च्या व्यवसायात झपाट्याने वाढ होत आहे.

## कल्याण जनता बँकेच्या पुणे कार्यालयात प्रशिक्षण केंद्राचे उद्‌घाटन उत्साहात

**डोंबिवली** – दि कल्याण जनता सहकारी बँकेच्या पुणे विभागीय कार्यालयामध्ये प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन नवीन वर्षाच्या सुरुवातीला नुकतेच करण्यात आले. प्रशिक्षण केंद्र हे बँकेचे संस्थापक संचालक स्व. प्राध्यापक अशोक प्रधान यांच्या नावाने सुरू करण्यात आलेले आहे. उद्घाटनप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प. महाराष्ट्र प्रांत सहकार्यवाह महेश कर्पे व तळेगावचे नूतन नगराध्यक्ष संतोष हरिभाऊ दाभाडे (पाटील) हे उपस्थित होते.

दि कल्याण जनता सहकारी बँक लि.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक

बँकेचे अध्यक्ष यशवंत पांगारकर विद्यमान संचालक, मधुसूदन पाटील, डॉक्टर रत्नाकर फाटक, पंकज दांडेकर, सीए किशोर गुजर तसेच माजी अध्यक्ष व संचालक मोहन आघारकर, वसंत काणे, निशिकांत बुधकर, लक्ष्मीकांत उपाध्याय उपस्थित होते.

प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी तर स्व. अशोक प्रधान यांच्या योगदानाचे स्मरण संचालिका डॉ. वैदेही दप्तरदार यांनी केले. प्रशिक्षण केंद्राच्या मार्फत भविष्यामध्ये बँकिंग क्षेत्रामधील वेळोवेळी होणाऱ्या बदलांची माहिती बँकेव्यतिरिक्त अन्य बँकांनाही होण्यासाठी प्रशिक्षण केंद्र उपयुक्त ठरेल, असा आशावाद व्यक्त करण्यात आला. सूत्रसंचालन अमृता काळे यांनी केले. यावेळी दि कल्याण जनता सहकारी बँकेचे संचालक, पदाधिकारी उपस्थित होते.

## नागरी सहकारी बँकांना परवाने देण्याबाबतचा आरबीआयचा प्रस्ताव

**मुंबई** – नागरी सहकारी बँकांना नव्याने परवाना देण्याबाबतचा एक प्रस्ताव आरबीआयने मांडला आहे आणि त्यामध्ये किमान ३०० कोटी रुपयांच्या भांडवलासह कठोर नियामक नियमाचा समावेश करण्यात आला आहे.

मध्यंतरीच्या काळात म्हणजेच सन २००४ पासून आरबीआयने परवाने देण्याचे काम थांबविले होते. बँकिंग क्षेत्रामध्ये गेल्या २० वर्षांच्या कालावधीत झालेले सकारात्मक बदल आणि भागधारकांकडून वाढती मागणी लक्षात घेता नवीन नागरी सहकारी बँकाच्या परवान्याबाबत एक पत्र प्रसृत केले होते. दि. १३ फेब्रुवारीपर्यंत भागधारकांकडून अभिप्राय मागविण्यात येत आहेत. मध्यंतरीच्या काळात काही बँकाचे परवाने रद्द करण्यात आले होते तर काही बँकांचे एकत्रीकरण करण्यात आले होते, अशी माहिती सांगण्यात आली.

## सहकार सुगंध मासिकाच्या स्टॉलला उत्स्फूर्त प्रतिसाद

चंद्रपूर – चंद्रपूर जिल्हा सहकार भारतीच्या वतीने नुकतेच एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. नवीन सहकार धोरण या विषयावरील चर्चासत्राला सहकार क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांचा प्रतिसाद मिळाला. या निमित्ताने सहकार सुगंध मासिकाचा स्टॉल कार्यरत होता. अनेकांनी मासिकाविषयी चौकशी करून सकारात्मक प्रतिसाद दिला. यावेळी चंद्रपूर मध्यवर्ती बँकेचे संचालक रोहित बोम्मावार यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.




**पतसंस्था प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी दीपप्रज्वलन करताना आरबीआयचे संचालक सतीश मराठे, सहकार आयुक्त दीपक तावरे, सहकार भारती प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, सहकार सुगंध मासिकाचे संपादक भालचंद्र कुलकर्णी आणि अन्य मान्यवर.**

# सहकारी पतसंस्थांच्या कामकाजासाठी प्रशिक्षण गरजेचे - सहकार आयुक्त दीपक तावरे




**पुणे** – प्रशिक्षणातूनच सहकारी पतसंस्था अधिक सुरळीत चालू शकतील आणि अधिकाधिक प्रमाणात लोकाभिमुख कामकाज होण्यास हातभार लागणार आहे, असे मत राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी सांगितले. याच वेळी त्यांनी सहकारी पतसंस्थांच्या प्रशिक्षणाचे महत्त्व विशद केले.

महाराष्ट्र वीज कामगार महासंघाशी संलग्नित महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधील पतसंस्थांच्या संचालकांचा दोन दिवसांचा प्रशिक्षण कार्यशाळा येथे आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे उद्घाटन सहकार आयुक्त दीपक तावरे, भारतीय रिझर्व बँकेचे व नाबार्डचे संचालक सतीश मराठे यांच्या हस्ते तसेच सहकार भारतीचे प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, सहकार सुगंधचे संपादक भालचंद्र कुलकर्णी, महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे महामंत्री अरुण पिवळ यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

भारतीय रिझर्व बँकेचे संचालक मराठे यांनी एकूणच भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रकाश टाकला. भारताची अर्थव्यवस्था अतिशय सुदृढ असून सहकार क्षेत्राच्या वाढीसाठी भरपूर वाव असल्याचे त्यांनी सांगितले. सहकार भारती प्रदेश महामंत्री जुगादे यांनी येणाऱ्या सहकार धोरणाविषयी उपस्थितांना माहिती देत लोकसहभागातून सहकार धोरण बनविण्यासाठी सहकार भारती कटिबद्ध असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला भारतीय मजदूर संघाचे पदाधिकारी सुभाष सावजी यांच्यासह महाराष्ट्रातील संलग्नित पतसंस्थांचे पदाधिकारी व संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवशक्ती सहकारी पतसंस्थेचा ३५ वा वर्धापनदिन साजरा

**रायगड, शिवथर** – येथील शिवशक्ती सहकारी पतसंस्थेने ३५ वा वर्धापनदिन नुकताच उत्साहात साजरा केला. पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयात मुख्य कार्यक्रम पार पडला. पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन साबळे यांनी संस्थेच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा घेतला.

सन १९९१ मध्ये केवळ ६० हजार रुपयांच्या भांडवलावर संस्थेचे कामकाज सुरू करण्यात आले. सध्याच्या स्थितीमध्ये ११८ कोटींच्या ठेवी असून ९३ कोटींचे कर्ज वाटप करण्यात आले आहे तर भाग भांडवल ७ कोटी इतके आहे. संस्थेचे संस्थापक हणमंत साबळे यांनी मनोगतात संस्था स्थापन झाल्यापासून ते आतापर्यंतच्या वाटचालीची माहिती सांगितली. उपाध्यक्ष मधुकर नलावडे, विद्यमान अध्यक्ष प्रभाकर साबळे यांनी मनोगत व्यक्त केले. या सोहळ्यात आयसीएआर संस्थेचा पुरस्कार प्राप्त करणारे श्रीराम जाधव यांचा विशेष सत्कार करण्यात आला. संचालक शशिकांत सावंत यांनी आभार मानले. संस्थेचे पदाधिकारी संचालक, अधिकारी, खातेदार, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाला अजितदादा पवार यांचे नाव

**पुणे** – पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाला अजितदादा पवार यांचे नाव देण्याचा निर्णय दूध संघाच्या संचालक मंडळाने घेतला आहे. संघाच्या संचालक मंडळाची नुकतीच बैठक झाली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला. संघाचे अध्यक्ष स्वप्नील ढमढेरे होते. या सभेत संचालकानी भावना व्यक्त केल्या. सभेला संचालक गोपाळ म्हस्के, विष्णु हिंगे, बाळासाहेब नेवाळे, बाळासाहेब खिलारी, केशर पवार, भगवान पासलकर, दिलीप थोपटे, राहुल दिवेकर, भाऊसाहेब देवाडे, अरुण चांभारे, कालिदास गोपाळघरे, निखिल तांबे, लता गोपाळे, चंद्रकांत भिंगारे उपस्थित होते.

## राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी ऑनलाईन करता येणार

**पुणे** – राज्यातील विविध जिल्ह्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था याबरोबर अन्य विविध स्वरुपाच्या ७६ सोसायट्यांची नोंदणी यापुढील काळात ऑनलाईन करता येण्याची सुविधा साधारणपणे येत्या महिनाभरात राज्याच्या सहकार विभागाकडून करण्यात येणार आहे.

राज्याच्या विविध भागात सहकारी बँका, पतसंस्था याबरोबर विविध कार्यकारी सोसायटी आणि गृहनिर्माण सोसायटी यांचे कामकाज सहकार विभागाच्या वतीने नियंत्रित करण्यात येतो आणि सोसायटीची स्थापना करायची असल्यास त्याची नोंदणी सहकार खात्याकडे करणे बंधनकारक आहे. सध्या राज्यात विविध प्रकारच्या ७६ सोसायट्या कार्यरत आहेत. तसेच राज्याच्या विविध जिल्ह्यात २ लाख २५ हजारांपेक्षा अधिक सहकारी संस्था आहेत.

यामध्ये सहकारी बँका ३ हजार ३७०, गृहनिर्माण संस्था एक लाखापेक्षा अधिक तर विविध कार्यकारी सोसायटी संख्या १५ हजारपेक्षा अधिक आहे आणि पतसंस्था ५० हजार पेक्षा जास्त आहे. सहकार विभागाने नागरिकांच्या सोयीसाठी ऑनलाईन नोदणी सुविधा उपलब्ध केली आहे. सध्या प्रायोगिक तत्वावर चाचणी सुरू असून नजीकच्या काळात राज्यात लागू करण्यात येणार आहे, अशी माहिती अतिरिक्त निबंधक राजेश सुरवसे यांनी सांगितली.

## पूर्णवादी सहकारी बँकेस पुरस्कार प्रदान

**बीड** – येथील पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेस ग्राहकांसाठी केलेल्या नवनवीन उपाययोजनांबद्दल 'Leading Tech Innovation In Fraud Prevention' या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. पुरस्कार बँकेच्या वतीने बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कुलकर्णी व माहिती तंत्रज्ञान विभागातील अक्षय देशमुख यांनी स्वीकारला. खोपोली येथे बँकिंग परिषद आयोजित करण्यात आली होती.



परिषदेत पूर्णवादी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कुलकर्णी यांना सर्वोत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी पुरस्कार प्रदान करण्यात आला. बँकेस प्राप्त झालेल्या पुरस्कारांमध्ये बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी, उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत पारनेरकर तसेच संचालक मंडळ यांचे मार्गदर्शन व सर्व कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमाचा मोलाचा वाटा आहे, असे कुलकर्णी यांनी सांगितले.

## खामगाव अर्बन बँकेस आयकोनिक लीडर पुरस्कार प्रदान

**खामगाव** – खामगाव अर्बन बँकेस सलग दुसऱ्या वर्षी आयकोनिक लीडर पूरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. बँक अध्यक्ष प्रा. विजय पुंडे, मुख्य व्यवस्थापक संतोष जाधव आणि सहायक व्यवस्थापक आशीष दधीच यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

बँकेने खातेदारांना विविध प्रकारच्या सुविधा देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञांनाचा अवलंब करीत नवकल्पना आणि आधुनिक बँकिंग याचा पुरस्कार केला आहे आणि यापुढील काळातही विविध सेवा देण्यास तत्पर असणार आहे. तसेच ठेवीवर आकर्षक व्याज दर आणि कर्जावर माफक व्याज दर असणार आहे असे सांगण्यात आले.


## सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड
### (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. व्यंकटेश कुलकर्णी (प्रशिक्षण प्रमुख) – ९४०३० ८०७५१**

**श्री. माधवेंद्र कोरडे – (फक्त मेसेजसाठी) ९८५०५ ७१४०५**

*** प्रशिक्षण कार्यालय** – फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ ई–मेल : sahakarbharati1416@gmail.com

# नव्या नागरी सहकारी बँकांना परवाना - स्वप्न की वास्तव?

बँकिंगमध्ये कार्यरत असलेल्या सामान्य माणसाच्या जिव्हाळ्याच्या नागरी सहकारी बँकांची स्थिती चांगली असली तरी या क्षेत्रात नव्या बँकांना परवाने देण्यात येत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. सन २००४ पासून बँकिंग क्षेत्रात कोणत्याही नव्या नागरी सहकारी बँकांना परवाने देण्यात आलेले नाहीत.

मागील दोन दशकांत नागरी सहकारी बँकांची प्रगती विचारात घेऊन आणि या क्षेत्रातील जाणकारांच्या मागणीचा विचार करून एक ऑक्टोबर २०२५ रोजी रिझर्व बँकेच्या गव्हर्नर यांनी नव्या नागरी सहकारी बँकांना परवाने देण्याचा विचार सुरू आहे, अशी घोषणा केली होती. १३ जानेवारी २६ रोजी रिझर्व बँकेने एक सविस्तर परिपत्रक काढून नागरी सहकारी बँकांना परवाना देण्याविषयी चर्चा पत्र प्रकाशित केले आहे.



डॉ. अभय मंडलिक
९४०३० ८०७२५

या पत्रकात नागरी सहकारी बँकांची सद्य:स्थिती, अलीकडच्या काळात झालेले धोरणात्मक बदल आणि यापूर्वी नागरी सहकारी बँकांना परवाने देण्याच्या शिफारसी आणि त्याच्या अटी याची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

नागरी सहकारी बँकांना परवाने देण्याच्या बाजूने आणि परवाने देऊ नये याबाजूने असलेल्या मतांची ही दखल या पत्रकात घेण्यात आलेली आहे. नागरिकांकडून आणि या क्षेत्रातील जाणकारांकडून नवीन नागरी सहकारी बँकांना परवाने देण्याबाबतची मते रिझर्व बँकेने मागविली असून यासाठी १३ फेब्रुवारी २६ पर्यंतची मुदत देण्यात आलेली आहे. या पत्रकात नव्या नागरी सहकारी बँकांना परवाने देण्याचे बाबतीत जी माहिती देण्यात आली आहे, त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

१) सर्वसाधारणपणे पाच वर्षे व्यवस्थितपणे चालू असलेल्या पतसंस्थांचे नागरी सहकारी बँकांत रूपांतर करता येईल या पतसंस्थांचे भांडवल ३०० कोटींपर्यंत असावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

२) सन २०१५ साली सहकारी बँकांवरील उच्च अधिकार समितीने (आर. गांधी समिती, २०१५) किमान पाच वर्षांचे ट्रॅक रेकॉर्ड, आर्थिकदृष्ट्या सुदृढ आणि सुव्यवस्थित असलेल्या सहकारी पतसंस्थांसाठी नागरी सहकारी बँकांचे परवाने देण्याची शिफारस केली होती.

३) आर्थिक सहकारी संस्थांसाठी पाच वर्षांचा कालखंड हा कमी मानण्यात येतो. त्यामुळे किमान दहा वर्षे संस्थेचा इतिहास चांगला असावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. यात आर्थिक मापदंड आणि प्रगतिशील वाटचाल यांची अपेक्षा करण्यात आली आहे.

४) आर्थिक बाबीचे विश्लेषण करण्यासाठी पात्र अर्जदारांना त्यांच्या संस्थेचा पर्याप्त भांडवलाचा (सी.आर.ए.आर.) आकडा १२% इतका असणे अपेक्षित आहे.

५) संस्थेचे निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण तीन टक्क्यांपेक्षा कमी असावी अशी अपेक्षा आहे.

६) या परिपत्रकात चर्चेसाठी पुढील प्रमुख मुद्द्यांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. अ) नवीन नागरी सहकारी बँकांचे परवाने पुन्हा सुरू करण्याची ही योग्य वेळ आहे का? ब) जर नवीन नागरी सहकारी बँकांना परवाने द्यावयाचे असतील तर पात्रतेचे व्यापक निकष काय असावेत? क) नागरी सहकारी बँकांसाठी परवाने देण्याची प्रक्रिया नव्याने सुरू करायची का?

७) या परिपत्रकात ३१ मार्च २०२५ रोजी नागरी सहकारी बँकांची संख्या १४५७ असून यात टायर वनमध्ये ८३८, टायर दोनमध्ये ५३५, टायर तीन मध्ये ७८, आणि टायर चारमध्ये सहा नागरी सहकारी बँका आहेत, अशी माहिती देण्यात आलेली असून बँकांच्या ठेवी, कर्ज एनपीए आणि पर्याप्त भांडवलाची माहिती ही देण्यात आलेली आहे.

८) रिझर्व बँकेने दिलेल्या माहितीनुसार सध्या ८२ बँका पर्यवेक्षी निर्बंधाखाली आहेत. ९ ) सन २०२४ पासून सुरू झालेल्या अम्ब्रेला ऑर्गनायझेशनबद्दल माहिती देण्यात आली असून यामार्फत सामायिक सेवा आणि तंत्रज्ञानातील तफावत दूर करणे. तसेच लहान बँकांना त्यांच्या गुंतवणूक आणि तरलता व्यवस्थापन यामध्ये मदत करणे अपेक्षित असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

**❋ नव्या नागरी सहकारी बँका, स्वप्न की वास्तव?**

१ रिझर्व बँकेच्या या परिपत्रकानुसार नव्या नागरिक सहकारी बँकांबाबत रिझर्व बँकेचा दृष्टिकोन सकारात्मक असल्याचे जाणवते.

२) नागरी सहकारी बँकांना सध्या विविध बँका आणि बँकेतर वित्त कंपन्या यांच्या स्पर्धेचा विचार करता नव्या बँकांचा भांडवली पाया अत्यंत मजबूत असणे आवश्यक आहे.

३) नव्या नागरी सहकारी बँकांना सुरुवातीच्या काळात कोणत्याही प्रकारच्या सवलतींची अपेक्षा करता येणे, शक्य नाही.

४) या परिपत्रकाप्रमाणे अस्तित्वात असलेल्या मल्टिस्टेट पतसंस्था किंवा राज्यातील पतसंस्था यांच्या बाबतीतच विचार होण्याची शक्यता दिसून येत आहे.

५) सहकारी संस्था स्थापन करून नव्याने नागरी सहकारी बँक अस्तित्वात येणे, प्राप्त स्थितीत अवघड वाटते.

६) नव्या बँकांच्या प्रवेशामुळे स्पर्धेमध्ये निश्चित वाढ होईल.

सन १९९० मधील खासगी बँकांच्या प्रवेशाच्या वेळी जे घडले ते सहकार क्षेत्रात नव्याने घडण्याची शक्यता आहे. यात आक्रमक मार्केटिंग, सुरुवातीपासून व्यापक तंत्रज्ञानाचा वापर आणि बँकिंग क्षेत्रातील तज्ञ मंडळींना घेऊन बँक सुरू करण्याची शक्यता या बाबी विचारात घेतल्या आहेत.

७) नागरी सहकारी बँकिंगमधील सकारात्मक पाऊल असे नव्या नागरी सहकारी बँकांच्या आगमनाचे वर्णन करता येईल.

८) नव्या नागरी सहकारी बँकांना परवानगी हा विषय सध्या चर्चेच्या पातळीवर असल्यामुळे याकडे सकारात्मक दृष्टिकोनातून बघावे. बँकिंगमधील, विशेषतः नागरी सहकारी बँकिंगमधील तज्ञ व्यक्तींनी मते रिझर्व बँकेकडे आवर्जून कळविणे आवश्यक आहे. सहकारी बँकांच्या संघटना, जिल्हा असोसिएशन आणि सहकार भारती यांनी सकारात्मक पद्धतीने बाजू लावून धरल्यास नव्या नागरी सहकारी बँका या स्वप्न न राहता वास्तव ठरेल, असा विश्वास आहे.

**– डॉ. अभय मंडलिक**

**– लेखक बँकिंग विषयाचे अभ्यासक असून खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक आहेत.**

❋❋❋❋❋

# बँक खात्यातील व्यवहाराबाबत जागरूकता आवश्यक



**वंदना धर्माधिकारी**
**९८९०६ २३९१५**

पैशाचे आकर्षण सगळ्यांनाच असते. म्हणून दुसऱ्याचे पैसे आपण चोरायचे, ढापायाचे, लुटायचे, फसवून घ्यायचे, असा विचार येणेदेखील अयोग्य आहे. मानसिकता चुकीची होताना चुकीचे ध्येय उराशी बाळगले जाते, तेव्हा ध्येयपूर्तीसाठी प्रयत्न केले जातात. ते असतात चुकीच्या मार्गाने – चोरी, दरोडेखोरी, घाला घालणे, लुटालूट, दमबाजी करून इत्यादी. बहुतांशी लोकांची साठवलेली पुंजी बँकेत असते. बँकांवर समाजाचा विश्वास आहे, आपले पैसे सुरक्षित असल्याची खात्री आहे. बँकेतील रक्कम सुरक्षित असे जरी असले तरी तंत्रज्ञानाच्या जमान्यात तिथेही नको त्या गोष्टी होऊन खात्यातील रक्कम काढली जाते, कधीही बँक खाते हॅक केले जाऊ शकते.

बँक खाते हॅक होते म्हणजे कोणातरी अनधिकृत व्यक्तीला, म्हणजे हॅकरला खात्याचा ताबा मिळतो. या लोकांना बँकिंगसह, टेक्नोलॉजी, इन आणि आउट सर्व ज्ञात असल्याने सहजगत्या खात्यातील रक्कम खाते रिकामे करण्यात हॅकर्स एकदम पटाईत असतात. अशा लोकांचे गट असल्याने अल्पावधीत या देशातल्या व्यक्तीकडून दुसऱ्या देशातील हॅकरकडे माहिती शेअर केली जाते.

जगभरातील सर्व प्रकारच्या बँकांना असा मोठा धोका अपग्रेडेड टेक्नोलॉजीने दिला आहे. सदोदित कुठे काय थोडेसे छिद्र सापडले, की लगेच त्याच्या इवल्याशा नंबरवरून शोध घेणारे आहेत. तसेच खातेदाराच्या हातून चुकूनमाकून काहीतरी नको ते केले जाते आणि त्या खात्याची संपूर्ण कुंडली शोधून काढणारे हॅकर्स रथी महारथी मंडळींपेक्षा हुशार असतात. खातेदारास खात्यातून पैसे गेल्यावर लक्षात येते, तो आला, त्याने खाते रिकामे केले. या मंडळींचा शोध घेणे महाकर्म कठीण असते. कुठल्याही देशातून कुठल्याही देशातील, शहरातील, खेड्यातील कुठलेही खाते त्यांना मिळाले तर त्या खातेदारावर संकट आलेच समजा. ना ओळख, ना पाळख, नावगाव कशाचा पत्ता नाही, तरीपण पैसे गेले ना याच्याकडून त्याच्याकडे. कष्टाची कमाई, काटकसर करून भविष्यासाठी केलेली साठवण अशी वाहून जाऊ शकते.

त्यातही मोबाइलवर सगळे आर्थिक व्यवहार आल्याने त्याची जपणूक करून, योग्य तऱ्हेने सर्व हाताळणे खूप महत्त्वाचे आहे. तिथे बँकिंग सोपे केले आहे. एका क्लिकवर, तसेच स्क्रीनवरील क्युआर कोड घेऊन क्षणार्धात कृती होते. हल्ली खरेदी अशीच होते. मोबाइलने प्लास्टिक कार्डस् व्यवहारांना एकदम मागे टाकले. मोबाइल बँकिंगने प्लास्टिक मनीला मागे टाकले. कार्ड सांभाळायची गरज नाही. मोबाइल विविध ॲप्स – पेटीएम, गुगल(पे)–जीपे, फोनपे, कॅशलेस पेमेंट मोड, इतर ॲप्लिकेशन्स प्रामुख्याने युपीआय – (Unified Payment System) संबोधले जाते. एखाद्या ॲपचा वापर करून पैसे ट्रान्स्फर करणारी सर्वाधिक वापरली जाणारी पेमेंट सिस्टीम आहे. यांना थर्ड पार्टी पेमेंट ॲप्स असेही संबोधले जाते. बटण प्रेस केले की लगेच गेले पैसे.

अनधिकृत व्यक्तीला वैयक्तिक माहिती, पासवर्ड, आपण केलेल्या व्यवहारात मोबाइलवर येणारा ओटीपी, आपल्या ऑनलाइन ट्रान्स्फर करणाऱ्या ॲप्सचे पिन कोड्स, कार्डच्या मागील बाजूस असलेला सीव्हीवी, एमपिन, युपीआय पिन, असे काही नंबर्स मिळाले की फार वेळ लागत नाही खाते रिकामे करायला. लगेचच खात्यात डेबिट पडते आणि खातेदाराला मेसेज येतो. तो बघून धक्का बसल्यावर पुढील उरलीसुरली रक्कम पण जाते अनेकदा.

अशा प्रकारच्या फसवणुकीस बँक हॅकिंग फ्रॉड, अकाउंटंट टेकओव्हर, ऑनलाइन बँकिंग फ्रॉड, फिशिंग, विशिंग, मालवेअर ॲटॅक, वायर ट्रान्स्फर फ्रॉड, आय आयडेंटिटी थेफ्ट, सायबर चोरी, सायबर फ्रॉड इत्यादी नावांनी संबोधले जाते. असा हल्ला जर झाला, तर खूप मोठे आर्थिक नुकसान खातेदाराचे होते. त्वरित बँकेला सांगायचे, आपल्या खात्यातील व्यवहार बंद करायचे. ताबडतोब पुढील काही नंबर्स वर झालेले सांगायचे. बँक शाखेत जबाबदार व्यक्तीशी संवाद साधून खाते ब्लॉक करायला सांगायचे, त्याने पुढील होणारा तोटा थांबवता येतो. सरकारने काही नंबर्स यासाठी दिलेले आहेत. उदा.: – ११२, १९३०, १९४५. आपल्या सगळ्या ऑनलाइन ॲप्सचे ऑपरेशनल नंबर्स–पिन नंबर्स बदलायचे. खाते ब्लॉक केले जाते. शोध घेणे, काही परत मिळविता आले तर चांगलेच. बँक प्रयत्न करतेच!

**– वंदना धर्माधिकारी,**
ईमेल – Vandana10dyahoo.co.in
**मो.नं.** - 9890623915

*****

**पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे**
स्थापना ४ सप्टेंबर १९१७
मुख्य कार्यालय – ४ ब, बी.जे.रोड, पुणे – ४११ ००१
फोन नं. : ०२० २६३०४१०० www.pdccbank.com

**१०७ वर्षांचा गौरवशाली इतिहास असणारी देशातील अग्रगण्य जिल्हा बँक**

**बँकेच्या विविध कर्ज योजना**
- शेतीपूरक कारणासाठी अ. मु. कर्ज
- वाहन कर्ज
- सोनेतारण कर्ज
- शेतीकर्ज – शासकीय अनुदानित कर्ज योजना – १०.५०%
- व्यावसायिक कॅश क्रेडिट
- ग्राहक उपयोगी वस्तू कर्ज
- औद्योगिक कर्ज
- गृह कर्ज

**बँकेच्या अत्याधुनिक सुविधा**
- एनी ब्रँच बँकींग
- आरटीजीएस
- एनईएफटी
- मोबाईल बँकींग
- यूपीआय सुविधा
- ई–कॉमर्स
- लॉकर सुविधा उपलब्ध

किफायतशीर व्याजदर · जलद कर्ज पुरवठा · सुलभ कर्ज प्रक्रिया

**बँकेची आर्थिक स्थिती ३१/०३/२०२५ अखेर**
- ठेवी – १४७६६.८४ कोटी
- कर्जे – १२०५९.०३ कोटी
- एकूण व्यवसाय –२६८२५.८७ कोटी

**आकर्षक व्याजदर**
दि. २३/०६/२०२५ पासून ठेवीवरील व्याजदरात वाढ २ वर्षांकरिता ७.००% (ज्येष्ठ नागरिकांना अधिक १% व्याजदर)

**विद्यमान संचालक मंडळ**
मा.प्रा.डॉ. दिगंबर गणपत दुर्गाडे – अध्यक्ष
मा. सुनील काशिनाथ चांदेरे – उपाध्यक्ष
मा. अनिरुद्ध यशवंत देसाई – मुख्य कार्यकारी अधिकारी

अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा.


THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL
दि यवतमाळ अर्बन
को-ऑप.बँक लि.,यवतमाळ
Regd.No.YML/BNK/114
विदर्भ
मराठवाड्यातील
अग्रणी
सहकारी
बँक
दत्तोपंत ठेंगडी
गृह कर्ज
*सिबिल स्कोअर नुसार व्याजदर लागू
फक्त 8.25%*
व्याजदर
अधिक माहीती करिता नजिकच्या शाखेशी संपर्क साधावा.

## सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
## महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




**सहकार भारती प्रकाशित**
**सहकार सुगंध निर्मित...**




# सहकार महर्षी

**सहकार चळवळीतील प्रत्येकाने आवर्जून वाचावा असा ग्रंथ**

सहकार महर्षी ग्रंथ - प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | - | रु. १५००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | - | रु. १३५०/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | - | रु. १२००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

**UPI ID SahakarSugandha@SBI**
सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

**बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!**

## सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती – संपादक

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

### पश्चिम महाराष्ट्र विभाग

| | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |

### कोकण विभाग

| | | |
|---|---|---|
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |

### उत्तर महाराष्ट्र विभाग

| | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| धुळे | श्री. कृष्णा जाधव | 8482993517 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| नाशिक | श्री. नितीन बीबीकर | 9665778497 |

### मराठवाडा विभाग

| | | |
|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर | श्री. योगेश भोसले | 9421704116 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| नांदेड | श्री. संदीप चिलकेवार | 7507921655 |

### विदर्भ विभाग

| | | |
|---|---|---|
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार महर्षी ग्रंथ | १५००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |

**पुस्तकांसाठी संपर्क : ८८०५९ ८१६७३**

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून-
**वार्षिक रु. ७००/- त्रैवार्षिक रु. १८००/-**

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 078011100000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. **sahakar.sugandha@gmail.com**

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**


"हे यश तुमचं आहे."
1003+ कोटी
ठेवी 558
कर्ज 445
आदर्श पतसंस्था, अलिबाग
हा प्रवास आकड्यांचा नाही,
हा हजारो कुटुंबांचा, महिला, शेतकरी, युवक,
व्यापारी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या
विश्वासाचा प्रवास आहे.
आपण विश्वास ठेवला... आणि आम्ही तो जपला!
आदर्श एक विश्वास...!
आमचे प्रेरणास्थान
श्री. सुरेश पाटील, संस्थापक
आदर्श पतसंस्था अलिबाग
आमच्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्व सभासद, ठेवीदार, ग्राहक व हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार.
श्री. अभिजित पाटील अध्यक्ष
श्री. कैलास जगे उपाध्यक्ष
सौ. मीनाक्षी पाटील सी.ई.ओ.
संचालक मंडळ व सर्व कर्मचारी वृंद
ग्राहक सेवा क्रमांक : 9112305888/9112306888
adarshapatsanstha
www.adarshapatsanstha.com
स्कॅन करा आणि आदर्श परिवारामध्ये सहभागी व्हा.



स्वत:च्या कुटुंबासाठी हवे

**स्वत:चे घर,**

ठेवा विश्वास जनसेवेच्या

**'घरकुल' कर्जावर !**

# जनसेवा घरकुल कर्ज

रो हाऊस, बंगला, फ्लॅट
खरेदीसाठी किफायतशीर कर्ज उपलब्ध.
(सिबिल स्कोरनुसार व्याजदर)

* आकर्षक व्याजदर
* तत्पर सेवा
* अल्प प्रोसेसिंग फी
* रू. 2 कोटींपर्यंत कर्ज

* अटी लागू

**संपर्क क्र. - 84 85 87 12 52**

## जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.

जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !

**मुख्य कार्यालय** : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

www.janasevabankpune.net

प्रधानमंत्री आवास योजना
(शहरी २.०) अंतर्गत सबसीडीस पात्र
आपले गृहकर्ज साकार करणं
आता होईल सोपं!



**गृहकर्ज व्याजदर**

**7.75%*** (पासून पुढे)

सिबील आधारित व्याजदर

**कॉम्बो ऑफर**

(भारत सरकार सबसीडीस पात्र)
पीएम सूर्यघर मोफत
वीज योजना अंतर्गत



**गृहकर्ज घेतलेस रुफटॉप सोलर पॅनल कर्ज व्याजदर सुध्दा**

**7.75%*** (पासून पुढे)

* नियम व अटी लागू

अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.
मोबाईल : ७८८८००९७१८

Since 1935
SUB
SUB का साथ, आपका विकास

# सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली

(शेड्युल्ड को-ऑप. बँक)

प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली ४१६४१६, फोन : (०२३३) १३७६२३६ /३७/३८



## सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंध निर्मित

# नागरी सहकारी 2026 बँक / पतसंस्था दैनंदिनी

नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या सर्व परिपत्रकांचा मराठीत संक्षिप्त गोषवारा तसेच QR कोडच्या मदतीने RBI ची सर्व मूळ परिपत्रके उपलब्ध असणारी एकमेव दैनंदिनी व नागरी सहकारी पतसंस्थेच्या दैनंदिनीमध्ये गेल्या तीन वर्षातील सर्व महत्वाच्या परिपत्रकांचा समावेश

**देशभरातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांच्या संख्येनुसार आर्थिक स्थितीच्या उपयुक्त माहितीसह...**





**नागरी सहकारी बँक दैनंदिनी २०२६**

किंमत रु. 500/-
अधिक प्रतींसाठी
विशेष सवलत
आजच नोंदणी करा!

किंमत रु. 400/-
अधिक प्रतींसाठी
विशेष सवलत
आजच नोंदणी करा!


**नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी २०२६**





सहकार भारतीचे मुखपत्र 'सहकार सुगंध' कार्यालय : ऑफिस नं. १५, विष्णुप्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - ४११०३० मो. : 8805981673 ईमेल : sahakar.sugandha@gmail.com


safe age
Security Products Pvt. Ltd.
OM SALES CORPORATION
All our Products are BIS Standards
Our Certificates
ISO 14001 : 2004
IS 5244 : 2014
CM/L-7500087614
IS 550 : 2014
CM/L-3978088
IS 11188 : 2014
CM/L-2870669
IAF
ISO 9001 : 2008
Electronic safe
Depository safe
Gold Safe
Fire Resistant Cabinet
Fire Resistant Filing Cabinet
Industrial Locker
Compactor
Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947
Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com
Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.
Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur
We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri,
Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar,
Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded,
Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara,
Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,



50+ YEARS OF MOMENTUM
अर्थ सहकारेण कल्याणम्
THE KALYAN JANATA SAHAKARI BANK LTD.
MULTI-STATE SCHEDULED BANK
Transform stability into growth & possibility with
LOAN AGAINST PROPERTY
Instant Loan with lowest RoI*
No Charges on prepayment
Minimal Processing Fees*
* T&C APPLY
TOLL FREE: 1800 233 1919
kalyanjanata.bank.in
KJSBank

Registered - SAHAKAR SUGANDHA - PRGI NO. MAHMUL/2005/16099
Magazine Post Contract No. : BP/EP 40280299 Customer ID : 3000071496
(Publication Date - 05/02/2026) Posting on 07/02/2026 Posting at BMI Pune PSO, Pune 411001

